शिक्षण अथपासून इथपर्यंत...!








स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

BHAIRAVNATH SHIKSHAN PRASARAK MANDAL

# अभिव्यक्ती

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव २०२१-२२

श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे

**श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेज, लांडेवाडी**

# - आम्ही गुणवंत -

## प्रथम वर्ष बी.एड्.



आढळराव अक्षता भिवाजी
प्रथम क्रमांक



खेडेकर प्रणिता तानाजी
द्वितीय क्रमांक



गाडवे राकेश जयवंतराव
द्वितीय क्रमांक



शेवाळे स्नेहा नवनाथ
तृतीय क्रमांक



चपटे नंदा भागुजी
तृतीय क्रमांक

## द्वितीय वर्ष बी.एड्.



लोंढे संदिप अंबादास
प्रथम क्रमांक



भुजबळ सुजाता सुरेश
द्वितीय क्रमांक



पिंगळे अर्चना शंकर
द्वितीय क्रमांक



शेटे संध्या सुधीर
तृतीय क्रमांक



शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिक्षक कर्मचारी

देखणे ते हात ज्यांना, निर्मितीचे डोहळे । मंगलाने गंधलेले, सुंदराचे सोहळे ।।
देखणी ती पाऊले, जी ध्यासपंथे चालती । वाळवंटातूनसुद्धा, स्वस्तिपद्मे रेखिती ।।



मा.खासदार

## श्री.शिवाजीराव आढळराव पाटील

संस्थापक-अध्यक्ष,
श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी

# - विविध उपक्रम -



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियतकालिक स्पर्धेत विद्यापीठ स्तरीय द्वितीय व पुणे ग्रामीण विभागात प्रथम क्रमांक पुरस्कार स्विकारताना




अभिव्यक्ती नियतकालिक पारितोषिक सन २०२०–२१



श्री.बाळकृष्ण वाटेकर यांचा शिक्षकदिनी सत्कार करताना



जागतिक पर्यावरण दिन सांस्कृतिक उपक्रम साजरा करताना



शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमांतर्गत कृती संशोधन तोंडी परिक्षा घेताना



न्यू इंग्लिश स्कूल लांडेवाडी, विज्ञान प्रयोगशाळेस भेट



महाविद्यालयीन गणेशोत्सव साजरा करताना

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# अभिव्यक्ती

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव २०२१-२२

शिक्षण अथपासून इथपर्यंत...!

## अभिव्यक्ती नियतकालिक समिती (सन २०२१-२२)


- **विशेष साहाय्य आणि सल्ला :**
  श्री. अक्षय शिवाजीराव आढळराव पाटील
  सचिव, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ

- **अध्यक्ष :**
  डॉ. संजय श्रीरंग चौधरी
  प्राचार्य

- **संपादक :**
  प्रा. शामल संजय चौधरी

- **संपादन साहाय्य :**
  प्रा. तेजस्वी यशवंत फदाले
  प्रा. विजया प्रदिप आढळराव
  प्रा. योगिता शैलेश आढळराव

- **विद्यार्थी प्रतिनिधी :**
  माने दिपमाला विनायक (प्रथम वर्ष)
  गाडवे राकेश जयवंतराव (द्वितीय वर्ष)



■ **अभिव्यक्ती**
दि प्रेस अॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स
नियम ८, फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती

■ **प्रकाशन स्थळ :**
श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेज, लांडेवाडी (चिंचोडी)

■ **प्रकाशकाचे नाव :**
डॉ. संजय श्रीरंग चौधरी
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेज, लांडेवाडी
ता. आंबेगाव, जि. पुणे. ४१० ५०३
दूरध्वनी क्रमांक : ०२१३३ (२३५१०५)

■ **संपादकाचे नाव :**
प्रा. शामल चौधरी
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेज, लांडेवाडी
ता. आंबेगाव, जि. पुणे. मोबाईल : ९७६३७२९१५२

■ **मुद्रक व मुखपृष्ठ**
श्री. प्रियेश गांधी
मधुबन प्रिंट सोल्युशन
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.मो. ९९६०५७०१००

■ **अक्षरजुळणी**
श्री. सागर किसन कोकणे
मधुबन प्रिंट सोल्युशन मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.

■ **मालकी**
श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेज,
लांडेवाडी (चिंचोडी), ता. आंबेगाव, जि. पुणे.
(श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ यांचेतर्फे)
मी प्राचार्य डॉ.संजय चौधरी असे जाहीर करतो की,
वर नमूद केलेला तपशील माझ्या
माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.
– प्राचार्य डॉ.संजय श्रीरंग चौधरी

## महाविद्यालाची वैशिष्ट्ये

- पुणे विद्यापीठात सुवर्णपदक विजेते विद्यार्थी
- पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाअंतर्गत 'कमवा व शिका योजना' व विविध मार्गदर्शनपर योजना
- अनुभवी, तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन
- विविध उपक्रम, सेमिनार्स, परिसंवाद
- सुसज्ज, तंत्रज्ञानयुक्त वर्गखोल्या
- प्लेसमेंट सुविधा
- यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा शालेय व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रम
- सर्व शैक्षणिक व भौतिक सुविधा
- सुसज्ज ग्रंथालय, संगणक कक्ष
- २५ एकर निसर्गरम्य परिसर
- भव्य जलतरण तलाव
- १ एकर क्षेत्रात बोटॅनिकल गार्डन



या अंकातील एकूण पृष्ठे
(रंगीत पानांसह) ९२ आहेत.

अभिव्यक्ती या महाविद्यालयीन
नियतकालिकातील लेख तसेच कवितांमधून
व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही,
तसेच लेखन मजकुराची जबाबदारी त्या त्या कवी–लेखकाची आहे.
(फक्त खासगी वितरणासाठी)

## श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ
## संस्था कार्यकारिणी

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवाजीराव आढळराव पाटील | : | अध्यक्ष |
| सौ. कल्पना शिवाजीराव आढळराव पाटील | : | उपाध्यक्ष |
| श्री. अक्षय शिवाजीराव आढळराव पाटील | : | सचिव |
| श्री. अपूर्व शिवाजीराव आढळराव पाटील | : | सहसचिव |
| सौ. माधुरी अक्षय आढळराव पाटील | : | खजिनदार |
| श्री. प्रमोद पांडूरंग थेऊरकर | : | सदस्य |
| सौ. नताली अपूर्व आढळराव पाटील | : | सदस्य |

## श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेज
## महाविद्यालय विकास समिती

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवाजीराव आढळराव पाटील | : | अध्यक्ष |
| डॉ. संजय श्रीरंग चौधरी | : | सचिव |
| सौ. कल्पना शिवाजीराव आढळराव पाटील | : | सदस्य |
| श्री. अक्षय शिवाजीराव आढळराव पाटील | : | सदस्य |
| श्री. अपूर्व शिवाजीराव आढळराव पाटील | : | सदस्य |
| प्रा. शामल संजय चौधरी | : | सदस्य |
| प्रा. तेजस्वी यशवंत फदाले | : | सदस्य |
| प्रा. यमुना शिवाजी यरोळकर | : | सदस्य |
| श्री. सुनिल शिवाजी शेवाळे | : | शिक्षकेतर प्रतिनिधी |



# प्राचार्य मनोगत...!



**डॉ. संजय श्रीरंग चौधरी – प्राचार्य**

श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना सन १९८७ मध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी लांडेवाडी या छोटयाशा खेडयात केली ते त्यांनी एक स्वप्न उराशी बाळगून. माया गावातील, तालुक्यातील मुला – मुलींना दर्जेदार शिक्षण आपल्या गावातच मिळावे म्हणून त्यांनी पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षणाबरोबरच शिक्षक– शिक्षणाची सोय आंबेगाव तालुका व परिसरातील विदयार्थ्यांसाठी व्हावी यासाठी २००८ – ०९ मध्ये श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेजची सुरुवात केली आणि त्याला परिसरातील व बाहेरगावातील विदयार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला आणि आजतागायत हे बी.एड्. कॉलेज तेवढयाच ताकदीने कार्यरत आहे.

महाविदयालयाचा प्राचार्य या नात्याने महाविदयालयातील या वर्षीचा 'अभिव्यक्ती' चा हा अंक तुम्हा वाचकांच्या हाती देत असताना खूप आनंद होत आहे. २०२२ हे वर्ष आपण सर्वजण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करीत आहोत. भारत स्वातंत्र्य होऊन ७५ वर्ष पूर्ण झाली आहेत. या ७५ वर्षामध्ये शिक्षणव्यवस्थेमध्ये अनेक स्थित्यंतरे झाली. पूर्वीच्या शिक्षण पध्दतीपासून ते आजच्या २१ व्या शतकापर्यंत शिक्षणातील बदलते प्रवाह व आत्मनिर्भर भारतातील शिक्षणाची भूमिका मांडण्याचा एक छोटासा प्रयत्न या अंकातून आम्ही करत आहोत.

व्यक्त होण्यासाठीच 'अभिव्यक्ती' हे व्यासपीठ आम्ही उपलब्ध करुन दिले आहे. आपल्या व्यथा, संवेदना व्यक्त करण्यासाठी कवितेचे दालन आहे.

बी.एड्. प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये अनेक अभ्यासपुरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमाने प्रशिक्षण पूर्ण करावयाचे असते. विदयार्थीरुपी मुर्तीमध्ये देवत्व आणणारा भावी शिक्षक तयार करावयाचा असतो. याचसोबत संस्थेची व महाविदयालयाची परंपरा व वैशिष्टये जपावी लागतात. महाविदयालयात अभ्यासक्रमांबरोबरच वर्षभरात अनेक कार्यक्रम, उत्सव, चर्चासत्रे, कार्यशाळा, तज्ञ व्याख्यात्यांचे मार्गदर्शन, सामाजिक जाणीव निर्माण व्हावी यासाठी काही सामाजिक उपक्रम इ.चे आयोजन केले जाते. त्यातच भावी शिक्षकांच्या विचारांना विशिष्ट दिशा मिळण्यासाठी, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी 'अभिव्यक्ती' हा एक उपक्रमच.

महाविदयालयाच्या यशस्वी वाटचातील आमच्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या रुपाने चालता बोलता ज्ञानकोश, प्रेरणास्त्रोत, उर्जास्त्रोत आमच्या पाठीशी असल्यामुळेच सध्याच्या या खडतर वाटचालीत आम्हाला लढण्याची प्रेरणा मिळते. 'अभिव्यक्ती' च्या संपादिका प्रा. शामल चौधरी हे असंच एक व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या आणि सर्व प्राध्यापकांच्या अथक परिश्रमातून हा अंक साकारला आहे. अभिव्यक्तीच्या अंतरंगात डोकावताना या अंकाच्या रुपाने आम्ही केलेल्या प्रयत्नांना योग्य तो प्रतिसाद दयाल या अपेक्षेसह हा अंक आपणास सादर करीत आहे.

# संपादकीय...!



**प्रा. शामल संजय चौधरी**

'अभिव्यक्ती' २०२१ – २२ हे श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेजचे दरवर्षी प्रकाशित होणारे नियतकालिक आपल्या हाती देताना संपादक म्हणून मला विशेष आनंद होत आहे.

सन २०२२ मध्ये आपणा सर्वांनी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव मोठया दिमाखात साजरा केला. या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून या वर्षीच्या अभिव्यक्तीच्या अंकासाठी भारतीय शिक्षणाची ७५ वर्षांची वाटचाल हा विषय निवडला आहे. आपल्या देशातील शिक्षणव्यवस्थेचा विचार करता गुरु – शिष्य ही परंपरा आपल्याकडे फार प्राचीन काळापासून आहे. पूर्वी बालक थोडा मोठा झाला की आठव्या वर्षी त्याची मुंज करुन त्याला गुरुकडे पाठवले जात असे व चौदा वर्ष गुरुगृही राहून युवक झाल्यावर हा ज्ञानी घरी परतत असे. अशी ही गुरु–शिष्याची परंपरा पुरातन काळापासून आपल्या भारतात अस्तित्वात होती.

भारतावर विविध परकिय शक्तींनी आक्रमणे केली. मुघल, डच, ब्रिटिश यांनी भारतावर राज्य केले. पूर्वीपासून चालत आलेल्या शिक्षणव्यवस्थेवर या परकीयांच्या आक्रमणानंतर फार मोठा परिणाम झाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. इंग्रज भारत देश सोडून गेले. जवळपास १५० वर्ष ब्रिटीशांनी भारतावर राज्य केले. त्यानंतर शिक्षणव्यवस्थेचे विविध कालखंड तयार झाले प्रत्येक कालखंडामध्ये शिक्षणव्यवस्थेमध्ये काहीना काही सुधारणा होत गेल्या. जसे की राधाकृष्ण आयोग, कोठारी कमिशन, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९६८, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६, सुधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९९२, राष्ट्रीय अभ्यासक्रम अराखडा २००१ व आताचे येऊ घातलेले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.

थोडक्यात असे म्हणता येईल की शिक्षण सर्वच पातळयांवर, विविधस्तरावर विविध क्षेत्रातून बदलत चालले आहे. काळाप्रमाणे जसा समाजात सामाजिक, सांस्कृतिक बदल होत असतो तसा शिक्षणातही बदल घडून येत असतो. तो शिक्षण घेण्याच्या पध्दतीत तसेच देण्याच्या पध्दतीतही होत असतो. भारत देश स्वतंत्र झाल्यापासून आतापर्यंत म्हणजेच ७५ वर्षात दूरसंचार क्षेत्रात खूप मोठी क्रांती घडून आलेली आहे. रेडिओ, टी.व्ही., संगणक, मोबाईल यांच्यात मोठया प्रमाणात बदल घडून आलेत. यासर्व माध्यमांचा शिक्षणातही मोठया प्रमाणात वापर होत आहे आणि म्हणूनच एकविसाव्या शतकातील भारतीय शिक्षणासमोर अनेक आव्हाने येऊ घातली आहेत भारतातील सर्व स्तरातील लोकांना आव्हाने पेलून येणाऱ्या संधी पदरात पाडून जीवनात यशस्वी होण्यासाठी मार्गक्रमण करावयाचे आहे. आणि शिक्षणाचा हा अखंड प्रवास पुढेही चालत ठेवायची जबाबदारी शिक्षक म्हणून आपल्यावर आहे. सदर अंकामध्ये आम्ही तेच मांडण्याचा एक लहानसा प्रयत्न

केला आहे.

अभिव्यक्ती या आमच्या महाविदयालयीन नियतकालिकात बी.एड्. प्रशिक्षणार्थींनी, प्राध्यापकांनी या विशेषांकात भरघोस योगदान दिले आहे. हा अंक आमचा एक छोटासा प्रयत्न असला तरी खूप आनंद देणारा आणि माहितीपूर्वक होता.''भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव : शिक्षण अथपासून इतिपर्यंत हा शब्द प्रयोग न करता शिक्षण अथपासून इथपर्यंत असा शब्द प्रयोग जाणिवपूर्वक करण्यात आला आहे. कारण शिक्षण ही चिरंतर चालणारी प्रक्रिया आहे तीला इतिपर्यंत म्हणणे उचित नाही.'' नियतकालिकाचे संपादन करताना येणारे अनुभव हे मजेशीर व खूप काही शिकवणारे असतात. सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाच्या नियमानुसार हा अंक तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. बी.एड्. अभ्यासक्रमाचे स्वरुप पाहता वेळेच्या उपलब्धतेनुसार हा अंक आम्ही जुळविला आहे.

अभिव्यक्ती या शीर्षकाशी प्रमाण ठेवून हा अंक जुळविला आहे. स्वत:ला व्यक्त करणे, स्वत:च्या विचारांसह लेखनात उतरविणे हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे.

रंग, रेषा, चित्र, लेखन, शिल्प, गायन, वादन, नृत्य इथून तर थेट अभियनापर्यंत अभिव्यक्तीचा प्रवास कल्पिता येतो.

अभिव्यक्ती हे मूल्य स्वातंत्र्य भावनेशी निगडीत आहे. Right of Expression या संकल्पनेत आपल्या भारतीय राज्यघटनेत अत्यंत महत्त्व असून आजकाल समाजात अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरुन विचारमंथन होत आहे.

शिक्षणशास्त्र महाविदयालयाच्या या अभिव्यक्तीत प्रशिक्षणार्थींनी, प्राध्यापक यांनी सहभाग घेऊन गद्य, पद्य विभागात आपले लेखन समाविष्ट केले आहे.

सदर अंकासाठी मराठी आणि इंग्रजी या भाषेतून साहित्य उपलब्ध झाले आहे. अंकासाठी साहित्य जमविताना ते शिक्षक, विदयार्थी, पालक आणि सर्वसामान्य व्यक्तींसाठी उपयोगी पडेल हा दृष्टीकोन ठेवला आहे.

अभिव्यक्तीमधील साहित्याचा दर्जा राखून त्यात गुणवत्तापूर्ण वाढ होण्याची काळजी घेतली आहे. ललित लेखनाच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यासाठी विदयार्थ्यांचा कल हा गद्य लेखनाकडे दिसतो. त्यातही बरेच गद्य संकलित प्रकारचे आहेत. किंवा त्यात फेरबदल केला असल्याचे प्रथमदर्शनी जाणवते मात्र पुढे पुढे प्रसिध्दीनंतर लेखक, कवी असे करत नाही. ते केवळ अनुभवास प्राधान्य देऊ लागतात.

भारतीय शिक्षणाची ७५ वर्षाची वाटचाल हा विषय या अंकात केंद्रवर्ती लेखन म्हणून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून योग्य बोध समाजाने घ्यायला हवा. हा अंक बनविताना अनेक प्रकारचे लेख आणि उतारे हे नाकारावेही लागले आहेत. मजकूरात भाषेचे भान राखण्याचा प्रयत्न केला आहे. हिंदी, इंग्रजी प्रभावातून लिहिली जाणारी मराठी अलीकडे भेडसावते आहे. त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्यात येऊन तसे बदल करण्याचा प्रयत्न केला आहे. संस्थेचे अध्यक्ष मा. खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, सचिव मा. अक्षय आढळराव पाटील यांचे विशेष सहाय्य व सल्ल्याने हा अंक निर्माण झाला आहे.

नियतकालीक समितीतील सर्व सहकारी प्राध्यापक, विदयार्थी, प्रसिध्दी विभाग यांनी संपादनात सहकार्य केले म्हणून अंक आकारास येऊ शकला. संस्थेच्या इमारतीची उत्कृष्ट छायाचित्रे ठिकठिकाणी वापरणे, चित्रांची निवड करणे असे काम करताना खूपच आनंद मिळाला.

मधुबन प्रिंटर्सचे प्रियेश गांधी, अक्षर जुळणीकार सागर कोकणे यांनी अंकाचे काम प्रत्यक्ष पार पाडले आहे. त्यांची मी अत्यंत आभारी आहे.

अभिव्यक्ती हे नाव अंकाच्या पूर्णतेसोबतच आकाराला आले आहे असे वाटते.

## अभिव्यक्ती
## – साहित्य विभाग –


| अ.क्र. | लेखाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण | काळे गौरी गुलाब | १२ |
| २ | स्वातंत्र्योत्तर शिक्षणाचा मागोवा | माने दिपमाला विनायक | १४ |
| ३ | शिक्षणाचे बदलते स्वरूप | जाधव माधुरी अमित | १८ |
| ४ | शिक्षणातील बदलते प्रवाह आणि आव्हाने | खेडेकर प्रणिता तानाजी | २० |
| ५ | प्रयोगशील शाळांतील शिक्षण | केंद्रे मेघा अशोक | २१ |
| ६ | 'दृकश्राव्य' माध्यमातून शिक्षण सिंहावलोकन व भविष्यवेध | प्रा.फदाले तेजस्वी यशवंत | २३ |
| ७ | विज्ञान व तंत्रज्ञान पाऊण शतकाची वाटचाल | चव्हाण आरती गणेश | २७ |
| ८ | भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण : एक ऐतिहासिक आढावा | गायकवाड अनिकेत हेमंत | ३० |
| ९ | समृध्द वारसा जपणारे शिक्षण | गुळवे प्राची रामदास | ३५ |
| १० | शालेय जीवनात मातृभाषेचे महत्व | प्रा. आढळराव योगिता शैलेश | ३७ |
| ११ | आत्मनिर्भर भारतातील शिक्षणाची भूमिका | शेवाळे स्नेहा नवनाथ | ४० |
| १२ | स्त्री समानतेविषयक कायदे | लोहोटे प्राजक्ता बबन | ४२ |
| १३ | स्वातंत्र्योत्तर काळात सेवांतर्गत प्रशिक्षणात झालेले बदल | भोसले रोहिणी श्रीपती | ४५ |
| १४ | कोरोना काळातील शिक्षण | मुजावर हिना रशिद | ४८ |
| १५ | शाळांच्या विकासासाठी लोकसहभाग हीच संजीवनी | आढळराव अक्षता भिवाजी | ५१ |
| १६ | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आकृतीबंध | प्रा. आढळराव योगिता शैलेश | ५४ |
| १७ | भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | प्रा. आढळराव विजया प्रदिप | ५६ |
| १८ | विज्ञान, तंत्रज्ञान व आधुनिक समाज | केदारी गोरक्षनाथ दादाभाऊ | ५८ |
| १९ | Virtual open Schools in India : A move towards future of education | Gadave Rakesh Jayvant | ६१ |
| २० | Holistic and Multidisciplinary education | Bhor Ekta Navnath | ६७ |
| २१ | National education policy 2020 & reforms in carriculum design | Belhekar Sonakshi Sunil | ७० |


## – पद्य विभाग –
## अनुक्रमणिका


| अ.क्र. | कवितेचे नाव | कवि/ कवियित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | स्त्री आणि समाज | प्रा. आढळराव योगिता शैलेश | ७३ |
| २ | साक्षरतेच्या वर्गाला | देवडे मोनिका प्रभाकर | ७४ |

# स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षण

**काळे गौरी कुलाब** बी.एड्.,द्वितीय वर्ष

आपली भारतीय संस्कृती जशी प्राचीन आहे तशीच आपली शिक्षण प्रणाली सुद्धा प्राचीन कालखंडापासून प्रचलित आहे. याच काळात गुरूकुल शिक्षण पद्धती होती. इ.स.पूर्व १२०० पर्यंतचा कालखंड हा साधारण या शिक्षण प्रणालीचा होता. या कालावधीस ऋग्वेदकाळ असेही म्हणतात. या कालखंडात शिक्षण सर्वांसाठी मुक्त म्हणजेच खुले होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चारही वर्णातील व्यक्तींना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. पुरूषांप्रमाणे स्त्रियांनाही शिक्षणाचा अधिकार होता. ऋग्वेदकालीन शिक्षण प्रणालीत शिक्षणाची ध्येय्ये होते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे ध्येय मानले जाई. गुरूचे गुरूकुलातच वास्तव असे. गुरू हा ज्ञानी, चारित्र्यसंपन्न, निपक्षपाती असावा अशी अपेक्षा असे. शिष्याची ओळख त्याच्या गुरू वरून होई. शिष्याला चांगल्या – वाईट वर्तणाची जबाबदारी गुरूवरच टाकली जाई.

उत्तर वैदिक (इ.स.पूर्व १२०० ते इ.स.पूर्व ६००) या कालखंडात धार्मिक, राजकीय व सामाजिक जीवनात मोठे बदल घडून आले या काळात ब्राह्मणांचे महत्त्व वाढले. यज्ञ, धार्मिक विधींचे महत्त्व वाढून वर्णव्यवस्था ठार झाली. स्त्रियांचा दर्जा घसरला. शिक्षण पद्धतीतही महत्त्वाचे बदल घडून आले. या काळात शुद्रांना शिक्षणाचा अधिकार नाकारण्यात आला. स्त्रियांच्या शिक्षणावरही अनेक निर्बंध घालण्यात आले. त्यानंतर गुरूकूल पद्धती जाऊन आश्रम पद्धती विकसित झाली. आश्रमात वेदशास्त्राबरोबरच नीतिशास्त्र, इतिहास, युद्धशास्त्र असे विविध विषय शिकविले जात. आश्रमातील विद्यार्थी आपल्या वर्णाला अनुसरून शिक्षण घेत. या काळात स्त्री शिक्षणाचा मात्र उत्तरोत्तर संकोच होत गेला राजघराण्यातील स्त्रिया शिक्षण घेत. सामान्य स्त्रिया मात्र शिक्षणापासून वंचित राहील्या.

बौद्धकालीन शिक्षण पद्धतीत गौतम बुद्धांच्या बौद्ध धर्माच्या स्थापनेपासून ते सम्राट हर्षवर्धनच्या राजवटीपर्यंत मानला जातो. हा कालखंड प्राचीन शिक्षणात महत्त्वाचा मानला जातो या काळात प्राथमिक शिक्षण बुद्ध मठात दिले जाई. उच्च शिक्षणासाठी तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला इत्यादी मोठमोठी विद्यापीठे स्थापन झाली. विद्यापीठांची स्थापना ही प्राचीन भारतीय शिक्षणाच्या विकासातील सर्वात प्रगत टप्पा मानला जातो. या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना द्वारपरीक्षा नावाची अत्यंत कठीण परीक्षा द्यावी लागत असे. बौद्ध संघातून सर्वांच्या संमतीने निवडलेल्या विद्वान व चारित्र्य संपन्न अशा भिक्षूकडे विद्यापीठाची प्रशासकीय सूत्रे दिली जात. बौद्ध विद्यापीठातून बौद्ध धर्माची शिकवण, तत्वज्ञान, भाषाशास्त्र, शिल्पकला, संगीत, खगोलशास्त्र, व्याकरण तसेच इतर धर्मांची शिकवण इत्यादी विषय शिकवले जात.

हिंदू विद्यापीठांमध्ये वेदशास्त्र वरील विद्यांव्यतिरिक्त हस्तकला, वास्तूकला, शिल्पकला, विज्ञान–तंत्रज्ञान औषधोपचार, शल्यचिकित्सा यांचेही शिक्षण दिले जाई या विद्यापीठांतून देश विदेशातील विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येत असत या विद्यापीठांमार्फत विद्येचा प्रसार होई.

मध्ययुगीन कालखंडात शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात आकुंचन झालेले आढळते. ब्राह्मणांच्या वर्चस्वामुळे सर्वसामान्यांना अज्ञानाच्या अंधारात गुरफटून रहावे लागले. अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरीती, प्रथा, परंपरा व विविध धार्मिक विधी यांचे प्रमाण वाढले. स्त्रियांवर अधिक बंधने टाकण्यात आली. या मध्ययुगीन काळास अंधकारमय कालावधी असेही म्हणतात. या कालावधीत विविध संत महात्म्ये होवून गेले. त्यांनी या अज्ञानमय समाजाला जागृत करण्याचे कार्य केले. त्यांनी सर्वसामान्य जनतेला वारकरी

संप्रदायाच्या माध्यमातून एकोप्याने आणण्याचे कार्य केले. व प्रथा परंपरांच्या जोखडातून त्यांना मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या कार्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार झाले. ते थोर संतपुरूष म्हणजे संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास, संत नामदेव इत्यादीमुळे.

ब्रिटीश कालखंडात म्हणजेच सतराव्या शतकानंतर पोर्तुगीज, डच, फ्रेंच इत्यादी राज सत्तांनी भारतात प्रवेश केला. याच राजसत्तांनी भारतात प्राथमिक शिक्षणाला सुरूवात केली. त्यानंतर इंग्रज भारतात आले त्यांनी व्यापार करत करत पूर्ण भारत देश स्वत:च्या अंमलाखाली आणला. त्यांनी भारतीयांना पाश्चिमात्य शिक्षण देण्यास सुरूवात केली. या कालावधीत विविध समाजसुधारक, क्रांतीकारक भारत देशाला लाभले. उदा. महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, बाळशास्त्री जांभेकर, जगन्नाथ शंकरशेठ अशा विविध समाजसुधारकांनी एकत्र येऊन स्त्री शिक्षणाचा विडा उचलला. महात्मा फुले यांनी १९४८ मध्ये मुलींची पहिली शाळा काढली. व स्त्रियांसाठी शिक्षणाचे द्वार उघडे करून दिले. या अशा प्रयत्नांमधुनच पहिल्या स्त्री शिक्षिका सावित्रीबाई फुले यांचा जन्म झाला. भारतीय पहिल्या महिला आनंदीबाई जोशी यांनी परदेशात जाऊन डॉक्टरकीची पदवी मिळवली.

पाश्चिमात्य शिक्षणातून भारतीयांमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधूता या मूल्यांची जागृती झाली. धार्मिक शिक्षण, मागे पडून धर्मनिरपेक्ष शिक्षणाचा विकास झाला. इंग्रजी शिक्षण घेतलेल्या, भारतीयांनी समाजातील अनिष्ट प्रथा नष्ट करून समाज सुधारणेचे कार्य केले. यातूनच भारतीयांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण होण्यास मदत झाली आणि स्वातंत्र्य चळवळी निर्माण होऊन भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य लाभले. शिक्षणाला एक नवी कलाटणी मिळाली.

म्हणूनच तर शशिकांत शांडिले म्हणतात.

दशा आणि दिशा दोन्ही बदलून गेली
शिक्षणाची जणू कथा बदलून गेली
शिक्षणाने अशा होईल कोण मोठा
शिक्षणाची पार प्रथा बदलून गेली

गावोगावी शाळेचा बाजार मोठमोठा
खऱ्या भविष्याची गती बदलून गेली
मरमर करून पुरवायचा किती पैसा
शिक्षणाची सारी नीती बदलून गेली

श्रीमंत गरिबांच्या वेगवेगळ्या शाळा
खऱ्या शिक्षणाची दशा बदलून गेली
खाजगीकरणाचा वाढला असा जोर
शिकवण्याची खरी दिशा बदलून गेली

भल्यासाठी मारतात विद्यार्थ्यांना गुरू
विद्यार्थ्यांची जूनी भिती बदलून गेली
पैशाविना झाले कठीण मोठे शिक्षण
शिक्षणाची आता स्थिती बदलून गेली.

# स्वातंत्र्योत्तर शिक्षणाचा मागोवा

**माने दिपमाला विनायक** बी.एड्.प्रथम वर्ष

**"Education is the most powerful weapon which we can use to change the world."**
कोणत्याही देशाच्या देशाच्या आर्थिक विकासात शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. व्या शतकाच्या शेवटच्या दशकात स्वातंत्र्यातील जी अनेक स्वप्ने दिली त्यांमध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षणात १९ भारतात सुरु झालेल्या स्वातंत्र्य चळवळीच्या काळात स्वातंत्र्य चळवळीने भारतीय जनतेला आमूलाग्र बदल करून स्वातंत्र्य, समता, लोकशाही, सर्वधर्मसमभाव इत्यादी आदर्शाप्रत नेणारे शिक्षण हे एक महत्त्वाचे स्वप्न होते. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या स्वप्नपूर्तीच्या हेतूने शिक्षणात कोण–कोणते बदल झाले, हे हेतू किती प्रमाणात यशस्वी झाले, या हेतूंमध्येच कोणते बदल केले गेले. या गोष्टी २० व्या शतकाचा उत्तरार्ध आपल्यापुढे ठेवतो.

एकोणिसाव्या शिक्षणाला महत्व प्राप्त होण्यास सुरुवात झाली. लोकशाही करण्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे गरजेचे आहे शतकामध्ये पूर्व–प्राथमिक बळकट आणि सर्व शिक्षणाचा आधारस्तंभ या भूमिकेतून प्राथमिक शिक्षणाकडे पाहिलं जातं. म्हणूनच भारतीय घटनेमध्ये वय वर्षे ६ ते १४ वयोगटांतील मुलांना मोफत सक्तीचे व सार्वत्रिक शिक्षण केले आहे.

सन १९४७ मध्ये भारतात एकूण १२,६९३ एवढ्या माध्यमिक शाळा होत्या व त्यात अंदाजे ३० लाख विद्यार्थी शिक्षण घेत होते. ही सहजासहजी झालेली नव्हती. वाढ जनतेमधील जागृती व माध्यमिक शिक्षणाचे आकर्षण ही या प्रगतीमागील कारणे होती. स्वांतत्र्योत्तर काळात माध्यमिक शिक्षणाचा प्रश्न काही महत्त्वाच्या समित्यांनी हाताळला. शिक्षणाच्या उद्दिष्टांचा व ध्येयांचा विचार केल्यानंतर केल्यानंतर ही ध्येये व उद्दिष्ट्ये किती वर्षात साध्य करावयाची, याचा विचार करावा लागतो. शिक्षणाच्या आकृतिबंधाचा विचार सुरु होतो. आज संपूर्ण भारतात १०+२+३ हा शैक्षणिक आकृतिबंध स्विकारण्यात आला आहे. मात्र याचे मळ स्वातंत्र्यापूर्वीच्या कलकत्ता विद्यापीठ आयोगाच्या (सॅडलर कमीशन) १९१७–१९ च्या शिफारशीमध्ये आढळते. १०+२+३ या आकृतिबंधाची कल्पना ही या आयोगाची मानली जाते.

स्वातंत्र्यानंतर भारतीय शिक्षणप्रणालीचा विचार करण्यासाठी अनेक आयोग व समित्या नेमल्या गेल्या. सन १९४८ मध्ये नेमलेल्या डॉ. राधाकृष्णन आयोगाने पुन्हा एकदा १०+२+३ या आकृतिबंधाची शिफारस सूचना शिक्षणाचा ठरल्या. विकास भारतातील विद्यापीठीय करण्यास कारणीभूत सन १९६४–६६ च्या कोठारी आयोगाने पुन्हा एकदा संपूर्ण शैक्षणिक अवलोकन केले. या आयोगामध्ये शैक्षणिक विस्तार व गुणवत्ता यावर भर दिला होता. कोठारी यांच्या मते ''भारताच्या वर्गखोल्यांमध्ये उत्पादकता स्वप्नांना केली. विद्यापीठ शिक्षण आयोगांनी केलेल्या नंतर प्राप्त सामाजिक आकार होतो. ''यामुळे राष्ट्रीय एकात्मता, आधुनिकीकरण तसेच सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांसाठी सुसंगत अशा शिफारशी करण्यात आल्या त्रिभाषा सूत्राचा विचार, शालेय शिक्षणाचे माध्यम मातृभाषा, आश्रम शाळात वाद, स्वतंत्र स्त्रीविभाग, पदवीपर्यंत मातृभाषेतून शिक्षण व पदव्युत्तर शिक्षण इंग्रजीतून, रात्रमहाविद्यालय सुरू करावीत,ठरावीक महाविद्यालयांना स्वायतता, प्रौढ साक्षरता वर्ग शिक्षक वेतनश्रेणीत सर्वत्र समानता,प्राथमिक शाळेत पुस्तके व साहित्य मोफत, पुस्तकपेढी योजना सुरू करावी. श्रमशिबिर व समाजसेवा कार्यक्रम सुरु करून बालकांचा सामाजिक विकास मुलांसाठी वसतिगृह, योजना, सर्व स्तरावर साधावा. आदिवासी विद्यार्थी कल्याण विज्ञान विषयाला महत्त्व, समाजाच्या

गरजेनुसार पाठयक्रम व त्यानुसार पाठयपुस्तक तयार करावीत. डॉ. कोठारी यांनीच १०+२+३ आकृतीबंध सुचवला. या आयोगाच्या अहवालाला (शिफारशीला) 'शिक्षण आणि राष्ट्रीय विकास' असे नाव देण्यात आले.


१८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणातील सुधारण्यांमध्ये वाढ केली पाहिजे तसेच शिक्षण आणि मानवी जीवन यांची सांगड घालून आवश्यक शेती, कारखाने, व्यापार, औषधे, सार्वजनिक आरोग्य, गृहण्यव्यवस्थापन, कला आणि कौशल्य इ कोर्सेसचा समावेश करण्यात आला. १९७७ च्या ईश्वरभाई पटेल समितीने या विषयाऐवजी अभ्यासक्रमामध्ये कार्यानुभव या विषयाचा समावेश केला. कृतिशिल उपक्रम हा या शिक्षणाचा पाया असून, ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या निम्न माध्यमिक स्तरापासूनच तयार करतात. यामध्ये महाराष्ट्र, (सक्षम) गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि केरळ इत्यादि समावेश आहे. शाळेच्या अभ्यासक्रमात लोहारकाम, मोल्डींग, वेल्डींग, टर्निंग, बिल्डिंग कन्ट्रक्टशन, ग्रामीण तंत्रज्ञान, वायरमन विविध विषयांचा समावेश आहे. राज्यांचा सर्वासाठी आणि शिक्षण, तांत्रिक व्यवस्थापकीय शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि समानतेसाठी शिक्षण हि १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्ट्ये होती. प्राथमिक भारतातील शिक्षणाला निरक्षरता अग्रस्थान या देऊन समस्येला सोडविण्याचा प्रयत्न खडू-फळा मोहिमेला मान्यता देऊन केला आहे. १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने सूचित केलेल्या शिक्षण पद्धतीचा सूक्ष्म अभ्यास करून त्यावर १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने नवीन पद्धती सूचित केली ती म्हणजे शिक्षणाचे समान स्वरुप (१०+२+३ आकृतिबंध) हे जगभर स्विकारण्यात आले. आताही बऱ्याचशा राज्यात (१०+२+३) या पद्धतीचा अवलंब केला गेला आहे. या धोरणात महत्वपूर्ण शिफारशी केल्या गेल्या. उदा. नवोदय उच्चशिक्षणात विद्यालय सर्वांना समान स्थापना, संधी. शिक्षणाचा गुणात्मक विकासावर भर, मुक्त विद्यापीठ प्रणाली, व निरंतर कार्यक्रमावर भर, स्त्री शिक्षणावर भर प्राथमिक पद्धती, स्तरावर खडफळा कृषीप्रधान मोहीम, शिक्षण शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, शालेय गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी योजना, ६ ते १४ वर्षापर्यंत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, मोफत व माध्यामिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षणाचा भर, शिक्षणाचे खासगीकरण इ साक्षरता आणि विकास या दोन बाबी एकमेकांवर अवलबून आहेत आणि एकमेकांशी जोडल्या आहेत. साक्षरतेशिवाय आधुनिकीकरण किंवा लोकशाहीकरण या गोष्टी साध्य करता आल्या नसत्या. निरक्षरतेचे निर्मूलन करण्यासाठी इ.स. १९८८ मध्ये भारत सरकारने राष्ट्रीय साक्षरता अभियानाची सुरुवात केली. पण त्यापूर्वी इ.स. १९७८ मध्ये त्यावर पुनर्विचार करुन त्याच्या विकासावर टिका करण्यात आल्या होत्या. इ.स. १९९१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण ४२% एवढे होते. म्हणूनच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संघटन (संस्था) यांच्या मदतीने भारताने सातव्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी २०,००० 'जनशिक्षणालये' यांची स्थापना केली. आणि आठव्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी 'सर्वशिक्षा अभियान' ची सुरुवात केली. अलीकडे, सरकारने २०२२-२०२७ या कालावधीसाठी ''न्यू इंडिया साक्षरता कार्यक्रम'' ही नवीन योजना मंजूर केली आहे. हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय घोषणांशी संरेखित करण्यासाठी प्रौढ शिक्षणाच्या सर्व पैलूंचा समावेश करेल अनौपचारिक शिक्षण राज्यघटनेतील ४५व्या सर्व मुलांना कलमाच्या

तरतूदीनुसार सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण मिळावे च्या शैक्षणिक धोरणात यासाठी १९८६ अनौपचारिक शिक्षणाचा एक कार्यक्रम अंतर्भूत करण्यात आलेला आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना सार्वत्रिक शिक्षण देणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश होता. ज्या मुलांना गरिबी व इतर कामधंदा या कारणास्तव नियमितपणे शाळेत हजर राहणे शक्य नव्हते. त्यांच्यासाठीच प्रामुख्याने शिक्षणाची ही योजना आखण्यात आली.

राष्ट्रीय प्रौढ शिक्षण हा कार्यक्रम २ ऑक्टोबर १९७८ रोजी सुरुवात करण्यात आला. प्रौढशिक्षण कार्यक्रम राबविणे हा याचा मुख्य उद्देश होता. १५ ते ३५ वर्षे वयोगटातील जवळजवळ १०० मिलियन प्रौढांना साक्षर बनविणे हा होता.

सध्याच्या घडीला महिला सर्व विभागांमध्ये अनेक महत्त्वाच्या भूमिकांमध्ये सहभागी होत आहेत. १९५१ मध्ये देशात साक्षर महिलांची टक्केवारी फक्त ९% होती पण आज भारताचे देशव्यापी महिला साक्षरतेचे प्रमाण ७१.५ % आहे. शैक्षणिक धोरणामध्ये स्त्री शिक्षणास उच्च प्राधान्य देण्यात येऊन अनेक राज्यांच्या सरकारांनी विद्यापीठ स्तरापर्यंत मुलींना शिक्षणशुल्क माफ केले. स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढण्यासाठी स्त्रियांसाठी स्वतंत्र शाळा व महाविद्यालये सुरू करण्यात आली. बेटी बचाओ, बेटी पढाओ, मोफत शिक्षण योजना यासारख्या भारतातील मुलींच्या शिक्षणात सुधारणा करण्यासाठी सरकारने अनेक धोरणे आखली आहेत.

सध्या एकूण १०६ विद्यापीठात दुरस्थ शिक्षण सुरु केले आहे. जेणेकरुन जे विद्यार्थी नियमित उपक्रमांना उपस्थित राहू शकत नाहीत तसेच जे विद्यार्थी दूर ठिकाणी राहतात अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या परिस्थितीनुसार शिक्षण पूर्ण करता यावे. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे शिक्षणामध्ये बराचसा बदल झालेला आढळून येतो. शिक्षण आणि संप्रेषण या संकल्पना पूर्णपणे बदलल्या आहेत. डिजिटल नेटवर्क, आंतरजाल (इंटरनेट), सॅटेलाइट (उपगृह) या नवीन तंत्रज्ञानाच्या पद्धतीमळे जागतिकीकरणाची दालने खुली झाली आहेत. म्हणूनच पारंपारिक शिक्षण पद्धतीमध्ये बदल होणे गरजेचे आहे. त्यासाठी भारताने काही कठोर सुधारणा करण्याची गरज आहे. शिक्षणात ई–लर्निंग सारख्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करून दुर्गम ठिकाणी प्रचंड लोकसंख्येपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे तसेच त्यामध्ये शिक्षण, शिक्षक आणि शासनाच्या विविध योजनांची भूमिका सध्याच्या बदलत्या परिस्थीतीनुसार बदलणे गरजेचे आहे.


EDUCATION
is the most
POWERFUL
weapon

# शिक्षणाचे बदलते स्वरूप

**जाधव माधुरी अमित** प्रथम वर्ष बी.एड्.

भारत म्हणजे 'भा' म्हणजेच 'तेज' आणि 'रत' म्हणजेच 'रममाण झालेला तेजात रममाण झालेला देश म्हणजेच 'भारत' देश होय. अशा या भारत देशाचा अमृत महोत्सव नुकताच पार पडला अनेक शुरविरांच्या बलिदानामुळेच भारत हा पारतंत्र्यातून स्वातंत्र्य झाला.

महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, या विभूत्यांच्या त्यागामुळेच आपण आज सोन्याचे दिवस अनुभवत आहोत. अशा या ''स्वातंत्र्यवीरांना करूया शत: शत: प्रणाम... त्यांच्या निस्वार्थ त्यागानेच भारत बनला महान''

आपल्या देशात अनेक घटना घडत गेल्या पण त्यातच खूप महत्त्वाची अन् अनेक रूपे घेतलेली महत्वाची गोष्ट म्हणजेच ''शिक्षण.'' डॉ. बाबासाहेब अंबेडकरांनी म्हटले आहे, ''शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे आणि ते प्राशन केल्यावर तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.'' अशा या शिक्षणाने अनेक विविध पैलू पार पडले आणि विविध पद्धतीत शिक्षणाचे स्वरूपही पलटत गेले. ते आपण थोडक्यात पाहू. 'सावित्रीबाई फुले' या प्रथम महिला शिक्षिकाच नव्हे तर त्या एक उत्तम कवयित्री, अध्यापिका आणि समाजसेविका होत. त्यांनी शिक्षण क्षेत्रात फार मोठी कामगिरी बजावली.

**प्रचीन शिक्षण प्रणाली :**

भारतीय संस्कृतीप्रमाणेच शिक्षण प्रणालीसुद्धा इ.स.पूर्व १२०० पर्यंत प्रचलित आहे. या काळात गुरूकुल शिक्षण पद्धती होती. जी व्यक्तिमत्त्व विकासावर आधारित होती आणि शिक्षण हे सर्वांसाठी खुले होते.

**उत्तर वैदिक काळातील शिक्षण :**

या काळात स्त्रियांचा दर्जा घसरल्यामुळे फक्त राजघराण्यातील स्त्रिया शिक्षण घेऊ शकल्या.

**बौद्धकालीन शिक्षण प्रणाली :**

या काळात प्राथमिक शिक्षण बौद्ध मठात दिले जाई. बौद्ध विद्यापीठातून बौद्ध धर्मांची शिकवण, तत्वज्ञान, संगीत, खगोलशास्त्र इ. विषयांची शिकवण दिली जाई.

**मध्ययुगीन कालखंड :**

इ.स. १२०० नंतरचा कालखंड हा अंध:कारमय कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळात ब्राह्मणांचे वर्चस्व अधिकाधिक असल्यामुळे शिक्षणाचे आकुंचन होत गेले. विखुरलेल्या समाजाला संघटीत करण्याचे कार्य मात्र या कालावधीतच झाले. आणि मग छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य स्थापन झाले.

सतराव्या शतकानंतर भारतात प्राथमिक शिक्षणाला सुरूवात केली. व्यापार सर्वांसाठी खुला झाला. इंग्रजांनी कारकुनी कामात मदत होईल अशा शिक्षणावर भर दिला.

**स्वातंत्र्योत्तर कालखंड :**

इ.स. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यानंतर साक्षरतेची गरज जाणवली. १९४८ ला राधाकृष्ण आयोग झाल्यामुळे शिक्षणात बरीच सुधारणा झाली. १९६४ ला डॉ.डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वप्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक असा शिक्षणाचा आकृतीबंध तयार झाला. त्यानंतर१९६८,१९८६,१९९२,२००१,२०२० मध्ये अनेक राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांचा उगम झाला आणि आता सध्याच्या २०२२ सालच्या शिक्षण पद्धतीत मोठ्या प्रमाणात बदल झाला आहे. रेडिओ, टी.व्ही. कॉम्प्युटर, मोबाईल या सर्व आधुनिक साधनांचा अधिकाधिक वापर होत आहे.

कोरोनाच्या समस्येनंतर देशात ऑनलाईन शिक्षण प्रणालीचा प्रवेश झाला. या काळात तरूणाईचा

कल हा सोशल मिडीयाकडे आकर्षित झाला आहे.

खरे पाहता, शिक्षण हा एक प्रकाश आहे. जो अंध: कारमय आणि अनुत्पादक समाजाला उज्ज्वल आणि उत्पादक बनवितो. सद्गुरू वामनराव पै म्हणतात, ''क्षणा क्षणाला शिकणे म्हणजेच शिक्षण'' माणसाने जन्माला आल्यापासून ते थेट सरणावर जाई पर्यंत शिकतच राहिले पाहिजे. परंतू सध्याची ही तरूणाई मात्र यांपासून वंचित राहताना दिसत आहे. आजकालच्या तरूणांनी सोशल मिडीयावर आपला स्टेटस सतत बदलत राहण्यापेक्षा आयुष्याचा स्टेटस बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवा आणि त्यासाठी मुलांना आत्तापासूनच ऑनलाईन वरून ऑफलाईन शिक्षणावर घेऊन येणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांना यशाच्या पायऱ्या चढण्यासाठी त्यांना उत्कृष्ट अशा गुरूचा सहवास असणे गरजेचे आहे. गुरूच्या सानिध्यात विद्यार्थी खुप लवकर प्रगतीचा कळस गाठेल. कारण...

गुरू हा संतकुळचीचा राजा
गुरू हा प्रणविसावा माझा
गुरूविण नाही देव दुजा
त्रैलोकी पाहता ।।धृ।।



# शिक्षणातील बदलते प्रवाह आणि आव्हाने

**खेडेकर प्रणिता तनाजी** बी.एड्.द्वितीय वर्ष

शिक्षण व शिक्षणामध्ये घडून येणारे बदल व त्या शिक्षणातील सततच्या नवनवीन बदलांमुळे विद्यार्थ्यांसमोर उभी राहिलेली आव्हाने कोणती आहेत ह्या विषयाची माहिती पाहणार आहोत.

आजचे २१ वे शतक हे आधुनिक, तंत्रज्ञानामध्ये झालेली प्रगती व त्यामुळे माहितीप्रधान युग, आधुनिक युग म्हणून ओळखले जाते. दिवसेंदिवस समाजामध्ये झपाट्याने विविध क्षेत्रात बदल होताना आपण पाहतो. जसे की सामाजिक, सांस्कृतिक बदल होत आहे. तसा शिक्षणातही खूप मोठ्या प्रमाणावर बदल घडून येत आहेत.

पूर्वीच्या शिक्षणपध्दतीपासून ते आताच्या २१ व्या शतकापर्यंत शिक्षणातील प्रवाह खूप बदलले आहेत. आज या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षण ऑनलाईन पध्दतीचे बनले आहे. सगळीकडे कॉम्प्युटर, लॅपटॉप, मोबाईल, टॅब याद्वारे अभ्यास केला जातो. शिक्षकदेखील ऑनलाईन क्लासेस, झुम मिटींग, गुगल मीट, गुगल क्लासेस, युट्युब या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुस्तके वाचून एखाद्या विषयाची सखोल माहिती मिळविणे किंवा विविध पुस्तकांचा अभ्यासामध्ये उपयोग करणे हे खूप कमी झाले आहे.

या ऑनलाईन शिक्षणपध्दतीने विद्यार्थ्यांना कोणत्याही विषयाची माहिती इंटरनेटवरुन त्यांना चटकन मिळते. त्यामुळे त्याचा त्यांना शिक्षणात उपयोग होत आहे. परंतु या सवयीमुळे विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता कमी झाली आहे. एखाद्या विषयाची माहिती मिळवताना, ज्ञान मिळवताना जी उत्सुकता विद्यार्थ्यांमध्ये पूर्वी असायची ती उत्सुकता, आवड आता कमी झाली आहे. आज सर्वच क्षेत्रात खूप प्रगती झाली आहे. या बदलत्या शिक्षणपध्दतीमुळे अनेक विद्यार्थ्यांना याचा फायदा देखील झाला आहे. जे विद्यार्थी शारीरिकदृष्टया कमजोर आहेत. जे शाळेपर्यंत पोहचू शकत नाहीत. ज्यांना शिक्षणाच्या सोई उपलब्ध नाहीत. असे विद्यार्थी या ऑनलाईन शिक्षणपध्दतीचा तंत्रज्ञानाच्या मदतीने फायदा करुन घेऊ शकतात व घरी बसून शिक्षण घेऊ शकतात. संगणक, मोबाईल, लॅपटॉप, टॅब यांद्वारे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व त्यामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली आहेत. कोणीही शिक्षणापासून वंचित राहत नाही.

कोरोना काळामध्ये आपण सर्वांनी पाहिले आहे की, सर्व शिक्षणपध्दती ही ऑनलाईन पध्दतीने सुरु होती. त्यावेळी या बदललेल्या शिक्षणातील तंत्रज्ञानाचा विद्यार्थ्यांना खूप फायदा झाला.

परंतु कोरोनानंतर जेव्हा सर्व सुरळीत जीवन सुरु झाले. तेव्हा मात्र या पध्दतींचा अतिरेक न करता नेहमीच्या पध्दतीने शिक्षण सुरु ठेवणे गरजेचे आहे. अनेक विद्यार्थी, तरुण पिढी ही माहिती तंत्रज्ञानाच्या मागे धावत आहे. त्यामुळे त्याच्या अतिवापराने मुलांचे नुकसान होत आहे. त्यामुळे या बदलत्या प्रवाहांमुळे शिक्षणासमोरील हे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

अशाप्रकारे काळाप्रमाणे बदलत चाललेले हे शिक्षणातील विविध प्रवाहांचा उपयोग आपल्याला आपल्या जीवनात करुन घ्यायचा आहे. तसेच त्या गोष्टींचा अतिरेक न करता समोर येणाऱ्या आव्हानांना तोंड देता यायला हवे. नवनवीन तंत्रज्ञान व नवीन शोध, नवीन अभ्यासक्रम यांचा वापर करुन शिक्षणाची उंची वाढविली पाहिजे व विद्यार्थ्यांनी त्याचा वापर करुन स्वत:च्या ज्ञानाची उंचीदेखील वाढविली पाहिजे.

# प्रयोगशील शाळांतील शिक्षण

**केंद्रे मेघा अशोक** बी.एड्.द्वितीय वर्ष

आधुनिक शिक्षण पदधतीमध्ये मार्काची स्पर्धा जीवघेणी झालेली आहे. बाल शिक्षणापासून स्पर्धात्मक वातावरणात मुलांची जडण–घडण होत आहे त्यामुळे मुलांचे एकात्मिक व्यक्तिमत्व विकसित होत नाही. मुलांचा सर्वांगिण विकास शिक्षणातून व्हायला हवा, असे सर्व शिक्षण तज्ज्ञांनी व शिक्षण पद्धतीनी सांगितले आहे. मुलांचा शारीरिक, बौद्धिक,भावनिक, मानसिक, अध्यात्मिक वैचारिक विकास कृतिशील शिक्षणातुनच घडून येतो. याच प्रयोगशील अथवा कृतीशील शिक्षणातून मुलांचा विकास घडतो. प्रयोगशील शाळातील शिक्षणाचा किंवा अभ्यासक्रमाचे मुख्य उदिष्ट ''एक चांगला माणूस घडविणे'' आहे. कृतीशील शिक्षण व नाविन्यपूर्ण प्रयोग राबविण्याची काळाची गरज आहे. असे रचनात्मक कार्य शाळा–शाळांतून उभे राहायला हवे.

आज महाराष्ट्रात अनेक प्रयोगशील शाळा आहेत. तेथे मुलांना जीवन व्यवहाराचे जगण्याचे शिक्षण मिळत आहे. विविध विषयाचे, शिक्षणाचे प्रतिबिंब मुलांमध्ये रूजविण्यासाठी, मुल्यजीवन कौशल्य रुजविण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन शाळा–शाळांमधून करायला हवे. या उपक्रमांमधुन मुलांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते. विविध शालेय स्पर्धापरीक्षा प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेतील. पण एक चांगला माणूस घडविण्यासाठी मुलाच्या व्यक्तिमत्त्वाला पैलु पाडणे गरजेचे आहे. मुलांच्या आजूबाजुला सकारात्मक वातावरण निर्माण करायला हवे. आज महाराष्ट्रातील अनेक शाळांमधून मुलांना कृतीशील शिक्षण दिले जाते. तसेच अनेक विविध शिक्षण संस्थांमधून मुलांना जीवन विकासाचे धडे मिळत आहेत. केवळ घोकंपट्टी करून जीवन जगण्यासाठी आवश्यक कौशल्य मुलांना प्राप्त करता येत नाहीत. त्यासाठी प्रत्येक जीवनानुभवातून, कृतीतून, प्रकल्पातून, क्षेत्रभेटीतून, प्रयोगांमधुन विविध विषयाचे ज्ञान मुलांना स्वयंप्रयत्नातून आत्मसात करून घ्यावे लागते.

महाराष्ट्रात सृजन आनंद विद्यालय, आनंद निकेतन, अक्षरनंदन कमला निंबकर, बालभवन अशा अनेक शाळामध्ये मुलांना अभ्यासक्रम व पाठयक्रम यांच्या पलीकडे जाऊन कृतिशील शिक्षण दिले जाते. महाराष्ट्रात सरकारी आणि खाजगी शाळा रचनावादी शिक्षण पद्धतीने प्रेरित होऊन प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत अंमलबजावणीच्या दिशेने पावले टाकत आहेत. शिक्षक या कृतीशील शिक्षणाचे धडे गिरवत आहेत. त्यांनी त्यानूसार शैक्षणिक साहित्यनिर्मिती केली विविध उपक्रम तयार केले, ते उपक्रम समाज माध्यमांच्या प्रभावी वापरामुळे इतर शिक्षकांपर्यंत वेगाने पोहचले आणि शालेय पातळीवर स्वागतार्ह बदल दिसूही लागले आहेत. शाळांच्या भिंती रंगवणे, जमीनीवर उपक्रम करण्यासाठी काही व्यवस्था करणे, उपक्रम मांडणे, शैक्षणिक साधने तयार करून वा विकत आणून त्याची संख्या वाढवणे. या बाबी सुरू झाल्या आहेत. या बदलाचे फायदेही दिसू लागले आहेत.

सिंधुदुर्गमधील देवगड तालुक्यातील शिरगाव येथील शाळेतील शमशुद्दिन अत्तार यांनी गणितीय संकल्पना समजून सांगण्यासाठी सातशेच्या घरात जी.आय.एफ. इमेजस तयार केल्या आहेत. सध्याची पिढी ही जन्मत: डिजिटल माध्यमात वाढलेली आहे. या माध्यमातील नवनवीन गोष्टींचे त्यांना अप्रुप असते. काही सेकंद हालचाल करणाऱ्या जी.आय.एफ. पाठ इमेजचा सध्या ट्रेंड आहे. एरवी मुलं आणि आपणही या इमेजस करमणुकीसाठी पाहतो. आतार सरांनी मात्र त्याचा शिक्षणास उपयोग करून घेतला. अतार सर त्यांच्या शाळेतील मुलांना तर या जी.आय.एफ. पाठवतातच पण त्यांच्या संपर्कातील अनेक शिक्षकांना या जी.आय.एफ. पाठवुन इतरही

मुलांचे गणित सोपे करतात. त्यांच्या गणितातील प्रयोगाची माहिती देणारे. sopeganit.in या नावाचे संकेतस्थळही आहे. शिवाय त्यांच्या शाळेत SOLE (सेल्फ ऑर्गनाईझ लर्निंग एन्व्हायरमेंट) हा उपक्रम राबवला जातो.

तंत्रज्ञानाने शिक्षण सोपं अन् मनोरंजक करण्याच दुसरं उदाहरण आहे. सोलापुरमधील बार्शी येथील जिल्हा परिषद शाळेतील रणजित डिसले सरांचे. डिसले सरांची ख्याती शिक्षणातील क्यु.आर. कोड आणि व्हर्च्युअल ट्रिप या प्रयोगासाठी आहे. आपल्याला बँकेच्या खातेपुस्तकातील तसेच वस्तुंच्या किमतीसाठी असलेला बारकोड माहित असतो. पण डिसले सरांनी याच पद्धतीचा वापर आपल्या मुलांना शिकविण्यासाठी केला. ती पद्धत पालक आणि मुलांमध्ये इतकी लोकप्रिय झाली कि, २०१५ पासून 'बालभारती ने त्यांच्या पाठ्यपुस्तकांमध्येही पुरक अभ्यासक्रमासाठी क्यु.आर. कोड छापण्यास सुरुवात केली. या क्यु.आर. कोडमध्ये पाठ्यपुस्तकातील घटकासंबंधीचा मजकुर सांकेतिक रुपात साठवलेला असतो. सोप्या शब्दात सांगायचं तर पाठयपुस्तकातील कवितांचे स्थळांचे व्हिडीओज, मुलाखती अशा गोष्टी त्या क्यु.आर. कोडमध्ये साठवता येतात. जाधव सर पहिलीच्या मुलांना अध्यायनाची गोडी लागावी यासाठी त्यांना मुळाक्षरांची ओळख, त्यांच्या परिसरातील प्राण्यांची व वस्तूंची त्याच्या भाषेतील नावे योजून सांगितले. जसे की क – केल्यातील (माकड), कोतळ (भोपळा) ख– खुबे (गोगलगाय) ग–गोड (गुळ) परिणामी मुलं वाचन–लेखन प्रक्रियेत चांगला प्रतिसाद देतात.

मेंढराप्रमाणे इंग्रजी माध्यमाचं अनुकरण करण्याने एकीकडे मराठी शाळा बंद पडत आहेत. त्या शाळांची पटसंख्या घसरत आहे. तर दुसरीकडे वर उल्लेख केलेल्या त्या त्या शाळांच्या यशाचं गमक त्यांच्या प्रयोगशीलतेत आहे. त्या शाळांमध्ये प्रयोगशीलता आहे म्हणजे नेमकं काय आहे? तर ह्या शाळांमध्ये अक्षर ओळख करून देण्यापासून भाषा, गणित, विज्ञान, इतिहास, भुगोल हे सगळेच विषय नव्या पद्धतीने शिकवले जातात. सांगण्याची पद्धत तर नवी असतेच, पण विविध शैक्षणिक साहित्याद्वारे मुलांना विषय सहज कळेल असं वातावरण उपलब्ध करून दिलं जातं. अनुभव कृती, साधनाचा वापर, विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी दिलेलं अवकाश, प्रकल्प पद्धतीचा वापर, निरीक्षणाच्या, विचार करण्याच्या पद्धती याकडे लक्ष दिले आहे. पालक व समाजाच्या अध्ययन–अध्यापनात सहभाग घेतला आहे.

अशा शाळांचा अभ्यास व संशोधन झाल्यास त्याचा उपयोग इतर सर्व–साधारण शाळांना होईल असे वाटते.



# दृकश्राव्य माध्यमातून शिक्षण सिंहावलोकन आणि भविष्यवेध

प्रा.फदाले तेजस्वी यशवंत

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय शिक्षण पध्दतीवर दिडशे वर्ष राज्य करणाऱ्या ब्रिटीशांच्या विचारांचा प्रभाव होता. ब्रिटीश सरकारच्या धोरणामध्ये भारतीय शिक्षण पध्दतीतून मोठ्या प्रमाणात कारकून निर्माण करावेत हा प्रमुख उद्देश होता. त्यामुळे उच्चस्तरीय व गुणवत्ता प्रदान करणाऱ्या शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात अभाव होता. या पध्दतीतून शैक्षणिक प्रगती झालेला समाज निर्माण होऊ शकला नाही. समाजातील अनेक घटक शिक्षणापासून वंचित राहत होते. ब्रिटीशांच्या गुलामगिरी व्यवस्थेत देशातील गुणवान, कतृत्त्ववान, अभ्यासू प्रज्ञाशील विद्यार्थ्यांना आपली गुणवत्ता सिध्द करण्याची संधी मिळाली नाही.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाल्यानंतर भारतीय शिक्षण व्यवस्थेत बदल घडवून आणणे अत्यावश्यक होते. स्वातंत्र्यानंतर विविध आयोग, विविध शिक्षण समित्या यांची स्थापना केल्यामुळे व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणे आखल्यामुळे स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षात प्रचंड मोठी शैक्षणिक क्रांती घडून आली.

अध्ययन क्रिया घडण्यास चालना देणारी क्रिया म्हणजे अध्यापन औपचारीक शिक्षणामध्ये शिक्षक नियोजनपूर्वक अध्यापन करतात. अध्यापनामुळे अपेक्षित वर्तनबदल घडून आले पाहिजेत यादृष्टीने अध्यापनाचे नियोजन शिक्षकांना करावे लागते व हे नियोजन करत असताना शिक्षकांना विविध माध्यमांचा वापर करावा लागतो तर या लेखातून दृकश्राव्य माध्यमातून शिक्षण सिंहावलोकन व भविष्यवेध या विषयावर प्रकाश टाकणार आहोत. सर्वप्रथम भारतातील दृकश्राव्य माध्यमाचा इतिहास व विकास पाहणार आहोत.

**भारतातील दृकश्राव्य माध्यमांचा इतिहास व विकास:-**

आपल्याला मिळणारे बाह्य जगाचे ज्ञान आपल्याला आपल्या इंद्रियामार्फत होत असते म्हणूनच शिक्षण प्रक्रियेत अनेक शैक्षणिक साधनांचा उपयोग व्हावा हे तत्त्व आज सर्वमान्य झाले आहे. याचे कारण विद्यार्थ्यांना विविध अनुभवांद्वारे शालेय विषयांचे ज्ञान प्रभावीपणे देण्यासाठी शैक्षणिक साधनच उपयुक्त ठरते.

शब्दांने ज्या वस्तूचे किंवा संकल्पनेचे वर्णन स्पष्ट करावयाचे त्याच्या जोडीला प्रत्यक्ष वस्तू पाहणे किंवा चित्रे दाखविणे यांच्या सहाय्याने अवबोधन चांगले होते. सॉक्रेटीसचा शिष्य प्लेटो या तत्त्वज्ञानी देखील यादृष्टीने विचार केला होता. परंतू खऱ्या अर्थाने यादृष्टीने विचार सुरु झाला. तो पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात.

रॅबेलाईस (१४८३ ते १५५३) याला प्रत्यक्ष वस्तू पाहणे त्याच्या खालोखाल त्या वस्तूची चित्राच्या सहाय्याने अवबोधन चांगले होते. याची खरी जाणीव झाली होती. तसेच या कालखंडात इरॅस्मस यास प्रात्यक्षिक दृक अभ्यासाची गरज पटली. त्यानंतर कोमेनियस याने पहिले चित्रमय पुस्तक तयार केले. त्या पुस्तकाचे नाव Orbis Pictus असे होते. त्यात १५० पाठ असून प्रत्येक पाठासाठी एक चित्र काढण्यात आले होते.

केवळ पाश्चिमात्य राष्ट्रांमध्येच दृकश्राव्य साधनांचा वापर केला जात होता असे नव्हे तर भारतामध्येदेखील अशा साधनांचा वापर केला जात होता. दहाव्या शतकापासून झाडांच्या पानावर चित्रे काढण्याची प्रथा रुढ होती. विशेषत: धार्मिक ग्रंथांच्या लिखाणामध्ये पौराणिक प्रसंगाचे चित्रण आढळून आले आहे. त्याबरोबरच बाहुल्यांचा खेळही फार पूर्वीपासून भारतात लोकप्रिय आहे.

महाराष्ट्रातील आंबेजोगाई याठिकाणी 'दासोपंतांची पासोडी' आहे. त्यावर श्लोकाच्या

स्पष्टीकरणासाठी चित्रे काढण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यात 'चित्रकथी' नावाची एक लहानशी जमात आहे. ही जमात चित्रे दाखवून कथा सांगते.

थोडक्यात शिक्षण प्रक्रियेत शैक्षणिक साधनांना अतिशय महत्त्वपूर्ण स्थान आहे. मानसशास्त्रज्ञांनी तर आज असा सिध्दांत प्रस्थापित केला आहे की, अध्ययन प्रक्रिया ही इंद्रीयजन्य अनुभूतींनी सुरु होते. मुले इंद्रिय अनुभूतींचा अर्थ लावतात आणि तदनंतर अर्थधारणा होत जाऊन त्याचे ज्ञानाशी साहचर्य घडून येते.

शिक्षणाच्या सर्व क्षेत्रात दृकश्राव्य शिक्षण साहित्याचा वापर करण्यात येऊ लागला आहे. भारतात दृकश्राव्य शिक्षणाचे दृष्टीने मुंबई राज्याने १९२० साली प्रारंभ केला. १९४८ च्या जानेवारीत अखिल भारतीय शिक्षण परिषदेने दृक शिक्षणावर विचार करुन त्यासंबंधी ठराव केला. त्यानंतर काही महिन्यातच भारत सरकारने वेगवेगळ्या स्तरांवर दृकशिक्षणाची पाहणी करण्यासाठी एक समिती नेमली.

इ.स.१९५१ मध्ये आखिल भारतीय दृक शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली. याप्रसंगी सुप्रसिध्द दृकश्राव्य शिक्षणतज्ञ श्री.टी.एल.ग्रीन यांना दृकश्राव्य शिक्षण विस्ताराबाबत विचार करण्यासाठी आमंत्रण देण्यात आले होते. या परिषदेने दृकशिक्षणाच्या सांगोपांगाचा अभ्यास केला आणि विकासाची दिशा ठरविली. १९५२ साली अखिल भारतीय दृक शिक्षण मंडळाची स्थापना झाली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत भारतातील दृक श्राव्य शिक्षणाला खूपच गती मिळाली. या योजनेनुसार जास्त साहित्य पुरवठा, फिल्म लायब्ररीची वाढ व शिक्षकांचे प्रशिक्षण यावर खूप भर दिला होता.

राष्ट्रीय दृक श्राव्य शिक्षण संस्थेची स्थापना १ एप्रिल १९५९ पासून करण्यात आली. राष्ट्रीय शिक्षण अनुसंशोधन संस्थेची स्थापना झाल्यावर दृक श्राव्य शिक्षण संस्था १९६५ साली या संस्थेशी संलग्न करण्यात आली. ती राष्ट्रीय शिक्षणशास्त्र संस्थेचा दृक शिक्षण विभाग म्हणून काम पाहू लागली.

**दृक श्राव्य शिक्षण साहित्याचे वर्गीकरण:–**

**अ) रेखाचित्रीय साधने:–**

१) छायाचित्रे, रंगचित्रे २) भित्तीपत्रके
३) तक्ते ४) आकृती
५) आलेख ६) नकाशे
७) व्यंगचित्रे ८) हास्यचित्रे

**ब) त्रिमितीदर्शक साधने–**

१) प्रतिकृती २) पदार्थ
३) नमुने ४) कळसूत्री बाहूली

**क) प्रदर्शनीय फलक–**

१) खडू फळा २) वार्ताफलक
३) खादी फलक ४) लोहचुंबक फलक
५) सिमेंट फलक ६) स्लेट फलक

**ड) प्रक्षेपित साधने:–**

१) चित्रपट २) सरळ चित्र
३) स्थिर चित्रफित ४) एपिडायास्कोप

**इ) तंत्रज्ञानविषयक दृक श्राव्य साधने–**

१) रेडिओ २)टेलिव्हीजन
३) टेपरेकॉर्ड ४) मोबाईल

**फ) क्रियात्मक साधने–**

१) शैक्षणिक सफरी व सहली
२) प्रात्यक्षिके ३) नाट्यीकरण

**दृकश्राव्य साधनांचा शिक्षणातील वापर:–**

स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षात प्रचंड मोठी शैक्षणिक क्रांती घडून आली. त्यामध्ये तंत्रज्ञानविषयक दृकश्राव्य साधनांचा फार मोठा वाटा आहे असे म्हणता

येईल.

**रेडिओ व दूरदर्शन:–**

२० व्या शतकाच्या सुरुवातीपासून रेडिओ व दूरदर्शन यांचा वापर शिक्षणासाठी केला जात आहे. रेडिओ व दूरदर्शनाचा वापर मुख्यत्त्वे खालीलप्रकारे केला जातो.

१) शालेय विषयांशी संबंधित ध्वनी, चित्रफिती व रेडियोवरुन प्रसारीत केले जाणारे कार्यक्रम यांच्या सहाय्याने वर्गात शिकविणे.

२) शाळांमध्ये शिक्षणाला पूरक असे कार्यक्रम प्रक्षेपित करणे.

३) सामान्य ज्ञान व माहितीपर शैक्षणिक कार्यक्रम दाखविणे किंवा प्रसारित करणे.

रेडिओवरुन (IRI) प्रसारित केले जाणारे कार्यक्रम दैनिक स्वरुपाचे असतात. हे रेडिओ धडे, एका विशिष्ट विषयाशी संबंधित असतात व त्यांचा प्रेक्षकवर्ग लक्षात घेऊन त्याची काठिण्यपातळी ठरविली जाते. या कार्यक्रमांमुळे शिक्षकांना तो विषय अधिक चांगल्या रितीने शिकविण्यास मदत होते. तसेच मुलांना ही तो विषय समजून घेणे सोपे जाते.

या पध्दतीमुळे दुर्गम भागातील शाळेतील विद्यार्थी व ज्याठिकाणी शिक्षकांची कमतरता आहे. अशा ठिकाणच्या विद्यार्थ्यांना ही शिक्षण घेणे सोपे जाते. रेडिओवरुन (IRI) प्रसारित केल्या जाणाऱ्या या कार्यक्रमांमुळे औपचारिक व अनौपचारिक दोन्ही प्रकारच्या शिक्षणाचा दर्जा व त्याची व्याप्ती, दोन्ही गोष्टींवर सकारात्मक प्रभाव पडला आहे. शिवाय रेडियो कमी खर्चिक असल्यामुळे मोठ्या लोकसंख्येला शिक्षणाचा लाभ मिळू शकतो.

दूरचित्रित केलेले कार्यक्रम अभ्यासक्रमास पूरक म्हणून किंवा स्वतंत्र पाठ म्हणून ही वापरले जाऊ शकतात. अशा कार्यक्रमांत आता अनेक अमूलाग्र बदल घडून आले आहेत. पूर्वी अनेकदा अशा कार्यक्रमात एखादा शिक्षक एखाद्या विषयावर विवेचन करताना दाखविला जाई. मात्र आता त्याची जागा विद्यार्थ्यांना जवळ वाटणाऱ्या मुद्यांनी व सुसंवाद साधाणाऱ्या कार्यक्रमांनी घेतली आहे. त्यामुळे हे कार्यक्रम विद्यार्थ्यांना अधिकाधिक खिळवून ठेवत आहेत. विद्यार्थ्यांची ग्रहणक्षमता व सुसंवाद वाढविण्यासाठी बहुतेक अशा शैक्षणिक कार्यक्रमांसह छापील व इतर प्रकारचे साहित्यदेखील पुरविले जाते.

आशिया–पॅसिफीक प्रदेशात शैक्षणिक प्रसारण मोठ्या प्रमाणात केले जाते. उदा.भारतात इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातील अनेक अभ्यासक्रम दूरदर्शन व व्हिडियो कॉन्फरन्सिंगच्या मदतीने शिकविले जाते.

काही विशिष्ट अभ्यासक्रमांशी संबंधित कार्यक्रम प्रसारित करण्याबरोबरच सर्वसामान्य शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करण्यासाठी ही दूरदर्शन व रेडिओचा वापर केला जाऊ शकतो. वास्तविक शैक्षणिक मूल्य असणारा व रेडियो किंवा दूरदर्शनवर प्रसारित केला जाणारा कोणताही कार्यक्रम 'सर्वसामान्य शैक्षणिक कार्यक्रम' म्हणून गणला जाऊ शकतो. उदा.अमेरिकेत प्रसारित केला जाणारा सीसेम स्ट्रीट हा कार्यक्रम किंवा कॅनडामधील फार्म रेडियो फोरम हा रेडियो चर्चा कार्यक्रम एकूणच शैक्षणिक कार्यक्रमात बातम्या, माहितीपट, प्रश्नमंजुषा कार्यक्रम, शैक्षणिक कार्टून्स अशा विविध कार्यक्रमांचा समावेश होतो. नॅशनल जिओग्राफिक चॅनेल, डिस्कव्हरी अशा वाहिन्या टेलिव्हिजनद्वारे लोकांपर्यंत पोहचविले जाते.

**माहिती संप्रेषण साधने (संगणक, इंटरनेट व मोबाईल) :**

माहिती व संप्रेषणाच्या (ICTS) साधनांमुळे विशेषत: संगणक व इंटरनेटमुळे शिक्षक व विद्यार्थ्यांना

ज्ञानाची नवी कवाडे उघडी झाली आहे. सध्या समाजमाध्यमामुळे ऑनलाईन शिक्षण संगणकाच्या मदतीने देता येते आणि ते अधिक संवादी असते. मोबाईल हे सुध्दा शिक्षणाचे उत्तम साधन आहे. अनेक कल्पक शिक्षक मोबाईल हे एक नवे साधन आपल्या दैनंदिन अध्यापनाच्या कामात वापरू लागले आहेत. दुर्गम भागात शैक्षणिक सुविधांचा असलेला अभाव या नव्या साधनाने काही प्रमाणात भरुन काढून ते मुलांना अध्ययनाच्या नव्या दिशा दाखवित आहेत.

माहिती तंत्रज्ञानावर भर देताना संगणक, इंटरनेट, मोबाईल या साधनांचे धोकेही आपण मुलांच्या लक्षात आणून दिले पाहिजेत. मोबाईलचा गैरवापर हे एक मोठे आव्हान झाले. आता येऊ घातलेले 5G हे तंत्रज्ञान प्रगती करेल यात वाद नाही, पण यामुळे याचा वापर करताना इतर काही सामाजिक धोके निर्माण होणार नाहीत याची काळजी शिक्षक म्हणून आपण घेतली पाहिजे.

आपला ४.५ वर्षांचा मुलगा किती सहजपणे मोबाईल हाताळतो याचे कौतुक रास्त आहे, पण त्याचबरोबर या यंत्राच्या सहाय्याने त्यांनी काय ऐकावे, काय पहावे हे आभासी जग याचा ताळमेळ मुलांना लावता येत नाही. माहिती तंत्रज्ञानावर भर देताना नवीन माध्यमाच्या दुष्परिणामांना तोंड देण्यासाठी काही उपाययोजना प्राधान्याने आखल्या गेल्या पाहिजेत. मोबाईलवरसुध्दा त्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणार नवनिर्मितीला वाव देणारे खेळ खेळायला प्रोत्साहित केले पाहिजे. किंबहुना त्यांच्या मनोरंजनाच्या, आनंदाच्या, रोमहर्षकतेच्या व्याख्या बदलायला आपण त्यांना उद्युक्त केले पाहिजे. टीव्हीप्रमाणे हे सुध्दा उत्कृष्ट शैक्षणिक साधन बनू शकते याचा वस्तूपाठ आता आपण शिक्षकांनीच द्यायला हवा.

थोडक्यात माहिती व संप्रेषणाच्या साधनांचा कितपत व कसा प्रभाव पडतो हे ती साधने कशी व कशासाठी वापरली जातात. यावर अवलंबून असते. या साधनांचा सर्वांनाच सारख्या प्रमाणात फायदा होईल असेही नाही. मात्र ही साधने योग्य पध्दतीने वापरली गेल्यास आपले शैक्षणिक विश्व नक्कीच उजळून निघेल हे मात्र नक्की.



# विज्ञान व तंत्रज्ञान पाऊण शतकाची वाटचाल

**चव्हाण आरती गणेश** बी.एड्.प्रथम वर्ष

दैनंदिन जीवनात विज्ञानाचे अनन्य साधारण महत्त्व आहे. विज्ञानाच्या साम्राज्यामुळेच मानवी जीवन सुखमय आणि आनंददायी झालेले आहे. संपूर्ण समाजाचा विकास हा विज्ञानाची कास धरल्यानेच होत आहे. मानवाच्या ठायी असलेली बौध्दिक क्षमता, जिज्ञासू वृत्ती आणि वैचारिक पात्रता यामुळे विज्ञानाचा विकास झाला आहे. तसेच आपल्या अन्न, वस्त्र व निवारा या प्राथमिक गरजा पूर्ण करताना आलेले अनुभव आणि त्यात वेळोवेळी होणारे बदलही लक्षात घेतले. अग्नीचा शोध लागल्यानंतर माणुस शिजवलेले अन्न खाऊ लागला.

आपल्या सभोवताली घडणाऱ्या व्यवस्थित आणि पध्दतशीर अभ्यास करुन स्वत:ला भेडसवणाऱ्या समस्यांचे समाधान केले. जसजसे अनुभव मानवाला येऊ लागले. तसतसे त्यांचे निरीक्षण व परीक्षण करुन त्याचे नवीन शोध लावले. काही नियम आणि तत्त्वे प्रस्थापित केली आहेत मानवाच्या गरजेतूनच विज्ञानाची निर्मिती झाली. मानव जसजसा उत्क्रांत होत चालला आहे. तसतसा विज्ञानाचा अधिक विकास होत आहे.

प्राचीन काळाचा विचार केला असता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी लोक पायी जात होते किंवा एखाद्या घोडा, गाढव यांसारख्या प्राण्यांचा वापर करत होते. विज्ञानाच्या जोरावर नवनवीन वाहनांची निर्मिती झाली. सायकल, बस, कार , विमान, रेल्वे यासांरखी वाहने तयार केली. आज आपण संपूर्ण जगदेखील फिरु शकतो. त्याचप्रमाणे एकमेकांना बोलण्यासाठी किंवा संवाद साधण्यासाठी पूर्वी पत्र वापरली जात होती. आता पत्रे नामशेष झालेली आहेत. मोबाईलच्या सहाय्याने मेसेज पाठवता येतो. आपण जगातील कुठल्याही व्यक्तीशी संवाद साधू शकतो.

तंत्रज्ञानातील सर्वात महत्त्वाची क्रांती ही इंटरनेट आहे.

• इंटरनेट १९६५ चा एक अतिशय जटील आणि क्रांतिकारी शोध, याने आपले जग बदलले आहे (इंटरनेटची व्याख्या) फायबर ऑप्टिक केबलिंगद्वारे एकमेकांशी जोडलेले हजारो नेटवर्क्स असलेले जागतिक संप्रेषण नेटवर्क म्हणून केले जाऊ शकते. इंटरनेट नेहमीच नवीन जटिल हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरमध्ये बदलत आहे. ते ऑफर करत असलेल्या सेवांव्यतिरिक्त

• इंटरनेट ही एकाच वेळी एक जागतिक प्रसारण क्षमता असलेली माहिती प्रसारित करण्याची एक यंत्रणा आहे आणि भौगोलिक स्थानाचा विचार न करता व्यक्ती आणि त्यांचे संगणक यांच्यातील सहयोग आणि परस्पर संवादाचे माध्यम आहे. इंटरनेट काय आहे. त्याचे घटक आणि इतिहास यासह त्याचे प्रात्यक्षिक आणि स्पष्टीकरण करणे.

• १९६० च्या दशकाच्या सुरुवातीला संगणक नेटवर्किंग क्रांतीची सुरुवात झाली, इंटरनेटचा शोध प्रथम लष्करी उद्देशाने लावला गेला आणि नंतर शास्त्रज्ञांमधील संवादाच्या उद्देशाने त्याचा विस्तार करण्यात आला.

गेल्या काही भारतात इंटरनेट आणि स्मार्टफोन दोन्ही खूप स्वस्त झाले आहेत. त्यामुळे सोशल मिडिया आणि ऑनलाईन स्ट्रिमिंग प्लॅटफॉर्मचे साम्राज्य वाढले आहे. परंतू टेलिव्हीजनचे महत्त्व तितकेच राहिले नाही. टेलिव्हीजन आजही अनेक लोक पाहत आहेत, परंतू या प्रगत तंत्रज्ञानाच्या आगमनाने रेडिओचा वापर खूपच कमी झाला आहे. आता रेडिओ हौसी लोक ऐकतात किंवा गाडी चालवताना लावतात.

रेडिओचा शोध १८८५ साली Guglielmo Marconi याने लावला. मात्र त्या आधीपासूनच जगातल्या विविध भागांत विविध बिनतारी प्रक्षेपणाचे प्रयोग सुरु होते. जगदीशचंद्र बोस यांनीही अशाच एका

प्रयोग सुरु होते. जगदीशचंद्र बोस यांनीही अशाच एका प्रयोगाचे प्रदर्शन कोलकत्यात १८८४ साली केले होते. पुढे या रेडिओ तंत्राचा वापर सैनिकी व इतर कामांसाठी व्हायला लागला. भारतात रेडिओची सुरुवात १९२३ साली रेडिओ क्लब इथे झाली. १९३६ साली त्याला ऑल इंडिया रेडिओ हे नाव मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारतात केवळ सहाच रेडिओ स्टेशन्स होती. ऑल इंडिया रेडिओ व आकाशवाणी हे नाव म्हैसूरच्या एम.व्ही. गोपाल स्वामी यांनी दिले. स्वातंत्र्यानंतर रेडिओची भरभराट झाली. हवामहल, सितारोंकी महफिल एकाहून एक सरस गाणी, कार्यक्रम, शास्त्रीय संगीत यामुळे आकाशवाणी अल्पावधीतच लोकप्रिय झाली. १९८२ साली भारतात रंगित दूरचित्रवाणी संच आले व रेडिओ मागे पडला.

विज्ञानामुळे आपली तर प्रगती झाली. त्यासोबत आपल्या देशाचीही प्रगती झाली. विज्ञानामुळे आपल्या देशाचा शस्त्रसाठा वाढला. आपला देश शक्तिशाली बनला. विज्ञानाच्या जोरावर आज व्यक्ती मंगळावर, चंद्रावर जाऊन आला आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने इतकी प्रगती केली आहे की, त्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत आहे.

तंत्रज्ञानामुळे माणसाचे आयुष्य केवळ ‘सुकर’ च केलेले नाही, तर अंर्तबाह्य बदलले आहे. आता येणाऱ्या तंत्रज्ञानातून प्रतिसृष्टी निर्माण करण्याचा ध्यास तंत्रज्ञांनी घेतला आहे. त्यातल्या ज्ञानातून मग जैविक संगणकाची संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकेल. तंत्रज्ञान म्हणजे भावना, जाणीव व ज्ञानेद्रियांचा विस्तार होता. मानवाच्या क्रांतीतून भाषेची क्रांती घडत गेली. ज्ञानाची प्रक्रिया भाषेमुळे अधिक सहज व सोपी झाली. गटेनबर्गने छपाईयंत्राचा शोध लावल्यानंतर मात्र तंत्रज्ञानाचा प्रसार व ज्ञानाची प्रक्रिया व त्यातून होणारे मानवी संबंध यात अमुलाग्र बदल होत होता.

आपण जे आज टंकलेखन यंत्र किंवा टाईपराईटर पाहतो, त्याची पहली आवृत्ती रेमिंग्टन कंपनीने १८७४ मध्ये बाजारात आणली. पण न्यूयॉर्क टाईम्सच्या वृत्तानुसार त्याच्याकडे कुणी लक्ष दिले नाही. काही वर्षानंतर ज्या लोकांनी त्याच्या जन्मावेळी दुर्लक्ष केले. तेच विचारु लागले की, याच्याशिवाय कुणाचे कसे अडले नाही? काही पत्रकार म्हणू लागले की, जगाला याची अत्यंत निकड आहे. जेव्हा त्याची गरज होती, तेव्हा ती कुणालाही जाणवली नाही. १७१४ साली इंगलंडच्या हेनरी मिल याने लिहिण्याच्या यंत्राचे पहिले पेटंट मिळवले व त्यातून रेमिंग्टनचा उदय झाला. मिलला पेटंट मिळालं पण प्रत्यक्षात यंत्र बनविण्यात त्याला यश आले नाही. त्यानंतरचे शोधक अधिक धाडसी निघाले. विल्यम बर्ट या अमेरिकेतील शोधकाने पेटंट घेतले आणि एक ओबडधोबड यंत्र तयार केले. १८२९ मधला तो टायपोग्राफर होता. त्यानंतर १८६७ मधील अंकलेखन शोलेनला दाखवले व त्यानंतर त्याने आपल्या विचाराने त्यात बदल केले व त्यात त्यांना यश मिळाले. १८७२ मध्ये पहिले यंत्र बाजारात आले.

शेवटी म्हणतात ना, यशाचे अनेक भागीदार असतात, अपयशाचा कोणीच धनी नसतो. तसेच टंकलेखन यंत्राचे झाले. यंत्राला अमाप लोकप्रियता मिळू लागली आणि त्यातून मोठे झालेले कित्येक जण रेमिंग्टन कंपनीला सोडून गेले. नवनवीन टंकलेखन बाजारात येत गेली. आज या जगात टंकलेखनाची जागा कोणी घेतली आहे, हे मी तुम्हाला सांगायची आवश्यकता नाही. संगणक, वर्ड प्रोसेसर, प्रिंटर आज ऑफिसेस, घराघरात रुळला आहे. येत्या पन्नास वर्षांत काय बदलेल हे आज सांगता येईल काय? कल्पना करणे हेच आपल्या हाती आहे.

त्यानंतर तंत्रज्ञानाचा वापर चालू झाला आणि

आला ई–मेल, ईमेल ने संदेश पोहचवणे सोपे झाले. अगदी काही सेकंदातच समोरच्या व्यक्तीला संदेश पोहोचू लागला. यामुळे फोटो, व्हिडीओ आणि आवाजही पाठवण्यात येऊ लागले. त्यानंतर खूप वेबसाईट आणि ॲप्स निघाले. पण सध्या २०१० पासून व्हॉटस्‌ॲप, मेसंजर अँड्रॉईड मोबाईल उपलब्ध झाले आणि संदेश पाठविण्याची व्याख्याच बदलून गेली, कारण सर्वसाधारण माणूस ॲपद्वारे मेजेस, फोटो, व्हिडिओ, आवाज, कॉल, लोकेशन आणि आतातर पैसे ही पाठवता येणे शक्य झाले. त्यानंतर फेसबुक, युट्युब ट्वीटर यांसारखे ॲपसुध्दा आले.

माध्यमांचा तंत्रज्ञानाच्या व मानवी क्षमतांच्या विस्ताराने अर्थ लावण्याचे महत्त्वाचे शोधकार्य त्यांनी केलेले आहे. त्याचबरोबर या क्षमतांच्या विस्तारातून मानवीसंबंध कसे बदलतात याची विस्तृत व सैंध्दातिक मांडणीसुध्दा त्यांनी केलेली आहे. तंत्रज्ञान हे मानवी संवेदनांचे एक प्रारूप असते व त्यास माध्यम लागते, हा माक्लुहानचा मुख्य मुद्दा आहे. माणसाच्या समाज जीवनामुळे त्याचा प्रसार अधिक सुलभ होतो. परंतू त्याच्यामुळे मानवी समाज जीवनही बदलू लागते. टोळीसदृश्य व कळपाने राहणाऱ्या व लिखित भाषेचे ज्ञान नसणाऱ्या माणसाला होणारे जगाचे ज्ञान हे यापेक्षा संपूर्ण वेगळे होते.

झपाट्याने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाने या प्रक्रियेला वेग तर दिलाच परंतू माणसाचे जीवनमान व शैलीही अमुलाग्र बदलली. जुन्या व्यवस्था कोलमडल्या व नवीन लोकशाही व्यवस्थांनी त्यांची जागा घेतली. समूहात राहूनसुध्दा माणसाला त्याच्या अलिप्तपणाचे, एकटेपणाचे भान होऊ लागले, कारण तंत्रज्ञानामुळे परस्परावलंबित्त्व घटत होते, जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करत त्याने माणसामध्ये व्यक्ती स्वातंत्र्याची आस व उद्याचा आशावाद निर्माण केला होता. हिटलरची मती गुंग व संमोहित करणारी भाषणे याच तंत्रज्ञानाचा वापर करुन लाखो लोकांना रेडिओवर प्रसारित केली गेली.

तंत्रज्ञान–माध्यम–माहितीचा हा संमोहित व व्यापून टाकणारा व आपल्या नकळत बदलत जाणाऱ्या आपल्या जाणिवा यांचे हर घटीका भान ठेवावे लागले, ते त्यातून बाहेर पडून, काही काळ का होईना, पण त्याचा प्रभाव झटकून देऊन तंत्रज्ञानाने निर्माण केलेल्या वास्तवाकडे आपल्या मेंदूतल्या जगणाच्या प्रोग्रॅमद्वारे बघावे लागेल. शांत व स्थितप्रज्ञ होऊन किंवा कुसुमाग्रजांच्याच शब्दात सांगायचे तर नवलाख तळपती दीप विजेचे जेथे उतरली तार कादळे जणू नगरात, परि स्मरते आणिक करते व्याकूळ केव्हा त्या माजघरातील मंद दिव्याची वात.



# भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्र शिक्षण : एक ऐतिहासिक आढावा

**गायकवाड अनिकेत हेमंत** ग्रंथपाल

आपल्या भारत देशामध्ये सद्यस्थितीत असलेली शिक्षण पध्दती ब्रिटिशांनी घालून दिलेली आहे. सुरूवातीला प्राथमिक शाळेचे वर्ग पुढे माध्यमिक वर्ग, महाविद्यालयातून पदवीपर्यंत मिळणारे शिक्षण त्यापुढे विद्यापीठीय पातळीवर मिळणारे पदव्युत्तर संशोधन शिक्षण अशी ही व्यवस्था होती. १९९७ नंतर यात वेळोवेळी उच्चाधिकार आयोग, समित्या यांची स्थापना करून बदल करण्यात आले. या आयोग व समित्यांनी केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न शासनाने केले. १९८६ सालच्या शैक्षणिक धोरणानुसार प्राथमिक स्तरावरील शिक्षणाचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न केले गेले. भारताच्या शिक्षणप्रणालीला आधुनिक आणि प्रगत स्वरूप आले. ग्रंथ व ग्रंथालये ही आपल्या शिक्षणपध्दतीची अविभाज्य अंगे आहेत. ही जाणीव आपल्या देशातील राज्यकर्त्यांना व शैक्षणिक विचारवंताना होती. डॉ.एस.आर.रंगनाथन यांनी भारतीय ग्रंथालय चळवळीनं शासनाचे मोलाचे मार्गदर्शन केले. आणि विद्यापीठीय व महाविद्यालयीन ग्रंथालये सक्षम बनविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

भारताच्या इतिहासात नालंदा, तक्षशिला, उदंतपुरी इ.ग्रंथालयांचे उल्लेख आढळतात. भारतात ग्रंथालये अस्तित्वात असली तरीही ग्रंथपालनाचा अभ्यासक्रम अस्तित्वात नव्हता. ग्रंथपालाचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा पहिला प्रयत्न बडोदा संस्थानात केला गेला. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराज सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांनी इ.स.१९११ मध्ये श्री. डब्लू सी.बॉर्डन या अमेरिकन ग्रंथपालाला संस्थानात ग्रंथालये स्थापन करण्यासाठी बोलावून घेतले. इ.स.१९१३ मध्ये ग्रंथपालनाचा भारतातील पहिला अभ्यासक्रम नागरी ग्रंथपालांसाठी सुरू करण्यात आला. इंपिरीयल लायब्ररी कलकत्ता (नॅशनल लायब्ररी इंडिया) यांचा पहिला ग्रंथपाल जॉन मॅकफरलेन यांनीही सेवांतर्गत प्रशिक्षणाचे कार्यक्रम व्यवस्थित चालविले होते. आणि हा पहिलाच विद्यापीठ स्तरीय अभ्यासक्रम होता. या विद्यापीठात अमेरिकन ग्रंथपाल व मेलविल ड्युई चे विद्यार्थी डॉन डिकीन्सन यांची नेमणूक करण्यात आली. डिकीन्सनने संपूर्ण ग्रंथालय प्रशासनाची व्यवस्था पाहून विद्यापीठ स्तरावरील ग्रंथालयशास्त्रातील पहिला अभ्यासक्रम भारतात सुरू केला. विद्यापीठा-अंतर्गत ग्रंथालय शास्त्राचे अभ्यासक्रम मद्रास विद्यापीठ (१९३१), आंध्रप्रदेश (१९३७) बनारस (१९४१), मुंबई विद्यापीठ (१९४४) मध्ये सुरू झाले. हे अभ्यासक्रम प्रमाणपत्र स्वरूपातील होते. पुढे मद्रास विद्यापीठाने (१९३७) मध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे रूपांतर १ वर्षाच्या पदविका अभ्यासक्रमामध्ये केले. त्यानंतर मुंबई व बनारस विद्यापीठांनीही पदविका शिक्षणक्रम सुरू केले. मुंबई विद्यापीठाने अनुक्रमे १९४६ व १९४७ ला पदविका अभ्यासक्रम सुरू केला. ग्रंथालयशास्त्रात शिकविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमात वर्गीकरण, तालिकीकरण, ग्रंथसूची, ग्रंथनिवड, संघटन आणि सामान्य ज्ञान या तात्वीक भागाचा तर वर्गीकरण, तालिकीकरण, ग्रंथसूची व ग्रंथनिवड या प्रात्यक्षिक भागांचा समावेश होता. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता प्री.डिग्री किंवा मॅट्रीक उत्तीर्ण अशी प्रवेश पात्रता ठेवण्यात आली होती.

### स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रंथालय शिक्षण

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४९ मध्ये दिल्ली विद्यापीठाने एम.लिब.एस्सी. व पी.एच.डी. हे अभ्यासक्रम सुरू केले. त्यानंतर १९५१ मध्ये अलीगढ मुस्लीम विद्यापीठ, अलीगढ १९५६ मध्ये विक्रम विद्यापीठ उज्जैन, एम.एस. विद्यापीठ, बडोदा व नागपूर विद्यापीठ यांनी ग्रंथालयशास्त्राचे अभ्यासक्रम सुरू केले. आज ८५ विद्यापीठांमधून ग्रंथालयशास्त्राचे

प्रमाणपत्र पदवी व पदव्यूत्तर तसेच काही विद्यापीठांमधून पी.एच.डी. अभ्यासक्रम देण्याची व्यवस्था झाली आहे. दोन मुक्त विद्यापीठे व काही महाविद्यालयेही हा अभ्यासक्रम राबवत आहेत.१९८० मध्ये सेन समितीने सुचवल्याप्रमाणे एम.फिल. अभ्यासक्रम अनेक विद्यापिठांमधून सुरू करण्यात आला. दिल्ली विद्यापीठाने ग्रंथालयशास्त्रातील पहिली पी.एच.डी. १९५८ मध्ये डॉ. बी.बी. कृष्णराव यांना प्रदान केली. १९७० पासून अनेक विद्यापीठांमधून हा संशोधनाचा अभ्यासक्रम सुरू आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विद्यापीठांच्या विकासासाठी भारत सरकारने वेळोवेळी जे आयोग नेमले त्यामुळे ग्रंथालयांच्या ग्रंथालयशास्त्रांच्या प्रगतीस मोठा हातभार लागला आहे.

**डॉ.राधाकृष्णन कमिटी :** भारतात १९४८ मध्ये भारतीय शिक्षण आयोग नेमला त्याचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्णन हे होते. त्यामुळे तो आयोग डॉ. राधाकृष्णन आयोग या नावाने प्रसिध्द झाला. शैक्षणिक विकास साधण्यासाठी या आयोगाची स्थापना करण्यात आली. डॉ. राधाकृष्णन यांनी भारतभर फिरून विविध शैक्षणिक तसेच विशेष ग्रंथालयांना भेटी देऊन त्यांच्या कामकाजाचे निरीक्षण करून त्यांच्या अहवालातून काही शिफारशी मांडल्या.

१.विद्यापीठ ग्रंथालय हे विद्यापीठीय शिक्षणप्रणालीचे हृदय मानले आहे.

२.उच्च शिक्षण, व्यवस्थापन व संघटन यांत ग्रंथालयाचे स्थान महत्वाचे मानले जाते.

३.वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन शैक्षणिक ग्रंथालयांनी वाचनसाहित्यांचा संग्रह करावा.

४.शैक्षणिक ग्रंथालयात काम करण्यासाठी शिक्षित व प्रशिक्षित मनुष्यबळ नेमावे.

विद्यापीठ अनुदान आयोग १९५६ मध्ये या आयोगाची स्थापन झाली. या आयोगामुळे उच्च शिक्षणाच्या वाढ आणि विकासास चालना मिळाली. सुरूवातीपासूनच आयोगाने ग्रंथालयांचे उच्च शिक्षणातील महत्व लक्षात घेऊन पंचवार्षिक विकास योजनांमध्ये ग्रंथालयीन उपक्रमांना प्राधान्य दिले. या आयोगाचे प्रथम अध्यक्ष डॉ.सी.डी. देशमुख यांनी १९५७ मध्ये विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालयांना सुव्यवस्थित कार्यरत ठेवता यावे यासाठी ग्रंथालय समितीची स्थापना केली याचे अध्यक्ष म्हणून डॉ.एस.आर. रंगनाथन यांची नियुक्ती केली. या समितीने १९६५ मध्ये अहवाल प्रसिध्द केला. डॉ. रंगनाथन यांनी प्रत्येक कामासाठी काही प्रमाणके (Standards) तयार केली. ग्रंथालय कर्मचारी नेमणूकीसाठी मार्गदर्शक असा 'स्टाफींग पॅटर्न' सुचवला व्यावसायिक कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक पात्रताही निश्‍चित केली. आजच्या संगणकाच्या युगातही रंगनाथन यांनी ठरवून दिलेली प्रमाणके (Norms) खूप उपयुक्त ठरत आहेत. एज्युकेशन कमीशन (कोठारी कमीशन) १९६४ मध्ये डॉ.डी.एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षणविषयक धोरणांसाठी ही समिती स्थापन केली. या समितीने काही शिफारशी केल्या.

१) ग्रंथालयांवरील खर्च शिक्षण संस्थेच्या एकूण अंदाजपत्रकाच्या ६.५% ते १०% दरम्यान असावा.

२) ग्रंथालयांसाठी वार्षिक वित्त निर्धारीत करीत असताना प्रत्येक विद्यार्थ्यामागे रू.२५ व प्रत्येक शिक्षकामागे रू.३०० याप्रमाणे आकारणी करावी. विद्यार्थी आणि शिक्षक यांना अनुसरून पैश्यांची तरतुद असावी.

३. शैक्षणिक ग्रंथालयांतून प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नेमलेला नसतो. त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था व्हावी. कोठारी कमिशन व त्याआधीचे आयोग यांमुळे उच्च शिक्षणक्षेत्रातील ग्रंथालयांना खूप सहाय्य झाले. ग्रंथालयांना अनुदान, स्टाफ फॉर्मुला व सेवकांची

वेतनश्रेणी या स्वरूपात विद्यापीठ अनुदान आयोगाकडून निश्चित निर्णय मिळाले. पंचवार्षिक योजनांमधून ग्रंथालयांना भरघोस अनुदानही मिळाले.

**रंगनाथन कमिटी :**

१९६० मध्ये ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमाच्या संदर्भात अध्यापन आणि संशोधनाचा आढावा घेण्यासाठी या समितीची स्थापना करण्यात आली. डॉ.एस.आर. रंगनाथन हे या समितीचे अध्यक्ष होते. १९६५ मध्ये Library Science in Indian Universities हा अहवाल UGC ने प्रसिध्द केला. या समितीची पहिली सभा १९६१ मध्ये व दुसरी १९६३ मध्ये UGC च्या कार्यालयात झाली. या समितीने एक प्रश्नावली तयार करून ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमाच्या संदर्भांत भारतीय विद्यापीठांमधली माहिती गोळा केली. त्यानंतर समितीने UGC ला आपला अहवाल सादर केला. त्यात ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमाची उदिष्टये अभ्यासक्रम प्रवेशपात्रता तसेच बी.लीब., एम.लिब व पी.एच.डी. अभ्यासक्रमांबात शैक्षणिक बाबींचा विचार करण्यात आला. या समितीने सुचविलेली कार्ये

१) व्यावसायिक ग्रंथपालांना प्रशिक्षित करावे.

२) व्यावसायिक कर्मचाऱ्यांना पदवी B.Lib.ISC व पदव्युत्तर M.Lib.ISC शिक्षणाची संधी उपलब्ध करून द्यावी.

३) संशोधनाच्या संदर्भात व्यावसायिक कर्मचाऱ्यांना संशोधन करण्यासाठी प्रशिक्षण द्यावे.

हा अहवाल प्रसिध्द झाला तेव्हा भारतात पाच विद्यापीठांमध्ये ग्रंथालय शास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू, अकरा विद्यापीठात पदवी पातळीवरचा अभ्यासक्रम सुरू होता. पण या अभ्यासक्रमांमध्ये सुसूत्रता नव्हती. पी.एच.डी. स्तरावरचे अभ्यासक्रम विद्यापीठाने द्यावेत असे सुचविण्यात आले. या अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी शिक्षक प्रमाण पदवीसाठी १०:१ पदव्युत्तर शिक्षणासाठी ५:१ असावे हे नमुद केले. याबरोबरच पदव्युत्तर पदविकेची समकक्षता पदवीबरोबरच सुचवली असून संशोधनाबाबतचा तपशिल स्वतंत्र प्रकरणात देण्यात आला आहे.

**ग्रंथालय अभ्यासक्रम : पुनर्रचना**

दिल्ली विद्यापीठात १९७३ व १९७७ मध्ये ग्रंथालयशास्त्र शिक्षणावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेतील शिफारशींवर विचार विनिमय करण्यासाठी UGC च्या ग्रंथालय समितीने १९७९ मध्ये दोन दिवसांचे चर्चासत्र भरवले. यात ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेच्या संदर्भात चार महत्वपूर्ण शिफारशी करण्यात आल्या.

१) बी.लिब. व एम.लिब. हे एक वर्षाचे शिक्षणक्रम उपयुक्त आहेत. तथापी दोन वर्षाचा संकलित अभ्यासक्रम (Integrated Course M.Lib) (एम.लिब) असावा.

२) ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासासाठी स्वतंत्र विभाग असावा व तो इतर विभागांच्या समकक्ष असावा.

३) ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रमाचे नाव ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम असे असावे.

४) ग्रंथालयशास्त्र विभागात संशोधनाची सुविधा असावी.

याबरोबरच ग्रंथालयांत संगणकाचा वापर, माहितीचा संग्रह आणि प्रतिप्राप्ती अशा विषयांचा समावेश असावा. अशी शिफारस ही करण्यात आली.

**कौला कमिटी –ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पाठ्यक्रम विकसन समिती**

१९९० मध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयासाठी पाठ्यक्रम विकसन समिती (Curriculam Development Committee) प्रा.पी.एन. कौला यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन

केली. या समितीने १९९२ मध्ये त्यांचा अहवाल प्रसिध्द केला. या अहवालामुळे सर्व विद्यापीठांमध्ये समान अभ्यासक्रम सुरू होण्यास मदत झाली. यात एम.लिब. हा एकत्मिक दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुचविण्यात आला. याशिवाय संशोधनासाठी अभ्यासक्रम उदिष्ट्ये गुणविशेष आणि कार्यपध्दती सूचविली आहे. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाच्या उजळणी वर्गाची (Refresher Course) उदिष्टये आणि कार्यप्रणाली या अहवालात नमूद करण्यात आली. राष्ट्रीय स्तरावर सुसूत्रता आणण्यासाठी करण्यात आलेला हा पहिलाच प्रयत्न होता. या अहवालानूसार पदवी B.Lib साठी आठ अभ्यासक्रम सुचविण्यात आले.

१) ग्रंथालय आणि समाज

२) ग्रंथालय व्यवस्थापन

३) वर्गीकरण तात्विक

४) वर्गीकरण प्रात्यक्षिक

५) तालिकीकरण तात्विक

६) तालिकीकरण प्रात्यक्षिक

७) संदर्भसाधने आणि संदर्भसेवा

८) संगणकाचा ग्रंथालयात उपयोग

याशिवाय सोळा ऐच्छिक (पेपर्स) अभ्यासक्रम देण्यात आले.

**करिसिद्दपा कमिटी –**

१९९७ मध्ये डॉ.सी.आर. करिसिद्दपा यांच्या अध्यक्षतेखाली UGC ने समिती नेमली. विभागवार बैठका, अभ्यासक्रम राबवणाऱ्या संस्थाकडून प्रश्नावलीच्या आधारे माहिती घेऊन एक अहवाल या समितीने मांडला त्यात ग्रंथालयशास्त्राच्या पदवी (B.Lib. ISC) आणि पदव्यूत्तर (M.Lib & ISC) या द्विस्तरीय शिक्षणक्रमाऐवजी दोन वर्षे कालावधीचा एकत्रित पदव्युत्तर (Integrated M.Lib& ISC) अभ्यासक्रमाची शिफारस करण्यात आली. या अभ्यासक्रमात २०% बदल करण्याची मुभा देण्यात आली. साधनसुविधेच्या संदर्भात प्रात्यक्षिकांसाठी वर्गीकरणाच्या सारणी (Classification Schedules) विषयशीर्षक यादी

(Subject Headings List) आणि शब्दलघुकोश Thesauri इ. दोन विद्यार्थ्यांस एक संच या प्रमाणात (२:१) ग्रंथालयशास्त्र विभागात उपलब्ध असावित असे सुचविले. संगणक प्रात्यक्षिकांसाठी सुसज्ज अशी कार्यशाळा असावी व पाच विद्यार्थांसाठी एक संगणक असावा असे सुचविण्यात आले. कौला आणि डा.ॅरंगनाथन कमिटी १९६५ अहवाल हा आधारभूत पाया धरून शिक्षकांची संख्या असावी. माहिती तंत्रज्ञानाच्या अनुषंगाने वाढीव मनुष्यबळाची गरजही यात नमूद करण्यात आली. याचा हा अहवाल दूरशिक्षण देणाऱ्या संस्थांनाही लागू होता.

**सी.डी.सी. नुसार ग्रंथालयशास्त्र अभ्यासक्रम पात्रता**

| क्र. | कालावधी | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश पात्रता | प्रवेश पात्रता |
|---|---|---|---|---|
| १. | १०+२+ ३+१ | बॅचलर ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन सायन्स | कोणत्याही शाखेचा पदवीधर | बी.लिब आय.एस.सी. |
| २. | १०+२+ ३+१+१ | मास्टर ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन सायन्स | बी.लिब. एस.सी. | एम.लिब. |
| ३. | १०+२+ ३+१ | मास्टर ऑफ लायब्ररी इन्फर्मेशन सायन्स (एकत्र) | कोणत्याही शाखेचा पदवीधर | आय.एस.सी. |
| ४. | १०+२+ ३+१ | मास्टर ऑफ लायब्ररी इन्फर्मेशन सायन्स | कोणत्याही पदवीधर (ग्रंथालयशास्त्र ऐच्छिक विषय घेऊन) | एम.लिब.आय. एस.सी. |

स्त्रोत : UGC Model Curriculum library and information Science

एकत्रित एम.लिब. चा अभ्यासक्रम हा १६ पेपर्समध्ये ४ सत्रांत देण्यात आला. पहिल्या वर्षी ८, (२ सत्रे) दुसऱ्या वर्षी ८ (२ सत्रे) असे त्याचे स्वरूप

ठेवण्यात आले.

अशाप्रकारे भारतात ग्रंथालय शिक्षणाची सुरूवात झाली आणि आजपर्यंत ते व्यवस्थितरित्या विविध विद्यापीठे, महाविद्यालये या स्तरांवर अविरतपणे सुरू आहे. यास अद्ययावत संगणक प्रणालींच्या प्रशिक्षणाची जोड आहे. हा अभ्यासक्रम भारतातल्या सर्वांत जुन्या अभ्यासक्रमांपैकी एक असून जवळपास शंभर वर्षापेक्षा अधिक काळ तो भारतात शिकवला जातो. खंत या गोष्टीची आहे. की भारतातील इतर अभ्यासक्रमांप्रमाणे ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यासक्रमाला म्हणावी तेवढी पसंती मिळाली नाही. यात व्यवसायाच्या भरपूर संधी असताना देखिल विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमांकडे नेहमीच पाठ फिरविली आहे. ज्यांना वाचनांची आवड आहे ग्रंथालयाबद्दल ओढ आहे. असेच विद्यार्थी या अभ्यासक्रमाकडे वळत आहेत.

सध्याच्या बदलत्या शिक्षण प्रवाहात नवनवीन अभ्यासक्रम समोर येत आहेत. यात व्यवस्थापन, अभियांत्रिकी, संगणक अभियंता, सॉफ्टवेअर इंजिनिअर, मार्केटिंग विपणन, हॉस्पिटॅलिटी, फार्मसी या विषयांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. त्यामुळे नेहमीप्रमाणे ग्रंथालयशास्त्रात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या साहजिकच कमी झालेली दिसून येते. परंतू कोणत्याही समाजाचे अस्तित्व टिकविण्यासाठी व त्याचा विकास होण्यासाठी अनेक गोष्टींची आवश्यकता असते. त्यापैकी 'ग्रंथालय' आणि 'शिक्षण' या अतिशय आवश्यक अशा दोन एकमेकींशी पूरक अशा सामाजिक संस्था आहेत. आणि सहाय्यक देखिल आहेत. कारण ग्रंथालयांच्या मदतीने शिक्षणाचा प्रसार होतो व शिक्षणामुळे ग्रंथालयांचा उपयोग वाढतो. संपूर्ण मानवी इतिहासामध्ये शिक्षण व ग्रंथालये यांचा एकत्रित विकास झालेला आढळून येतो. ज्या ठिकाणी ग्रंथालय सेवकांची उणिव असते त्या ठिकाणी शिक्षणाचाही अभाव असतो.

बदललेल्या ग्रंथालयांचे व्यवस्थापन अधिक चांगल्या प्रकारे करता यावे यासाठी चांगल्या प्रशिक्षणाची आवश्यकता निर्माण होत गेली. ही आवश्यकता पूर्ण होण्यासाठी ग्रंथालय शिक्षणामध्ये योग्य ते बदल वेळोवेळी होत गेले आणि पुढेही ते असेच होत राहतील.

संदर्भ :

१) डॉ. मधुकर शेवाळे (२०११),
ज्ञानगंगोत्री, जुन–नोव्हेंबर २०११
२) रेवती नरगुंदे (२००७),
ग्रंथालये आणि सामाजिक विकास, पुणे,
युनिव्हर्सल प्रकाशन पृ.१६



# समृध्द वारसा जपणारे शिक्षण

**गुळवे प्राची रामदास** बी.एड्.,द्वितीय वर्ष

शिक्षणाचा इतिहास मनुष्यजातीच्या इतिहासाइतकाच प्राचीन आहे. कारण जेव्हा मनुष्य आपल्या प्रारंभिक अवस्थेमध्ये होता तेव्हाही तो आपल्या मुलांना वन्यप्राण्यांपासून स्वत:चे रक्षण आणि पोटाची खळगी भरण्यासाठी शिकार करण्याचे धडे देतच होता. शिक्षणाचा वारसा कालही होता, आजही आहे आणि उद्याही तसाच असेल. कारण शिक्षण ही व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत चालणारी एक अखंड प्रक्रिया आहे. शिक्षणामुळे मानवी जीवनाचा सर्वांगीण विकास होतो. परंतू शिक्षण म्हटले की आपल्या डोळ्यासमोर येते ती शाळा, शिक्षक, विद्यार्थी, अध्यापन, अध्ययन, परीक्षा वगैरे होणारी प्रक्रिया होय. अशी शिक्षणाबाबातची रूढ कल्पना आहे. शिक्षणाद्वारे शरीरास श्रमाकडे, बुद्धिला ज्ञानाकडे व ह्रदयाला भावनेकडे वळविण्याचा प्रयत्न करणे असा साधारणपणे शिक्षणाचा अर्थ होतो. शिक्षण ही फक्त ज्ञानात्मक पातळीवर चालणारी प्रक्रिया नसून ती शारीरिक व भावनात्मक पातळीवर व्यक्तीचा विकास करणारी प्रक्रिया आहे.

खरे तर शिक्षण ही व्यापक संज्ञा आहे. प्राचीन काळापासून आपल्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी आपल्या जीवनात शिक्षणाने अमुलाग्र बदल घडवून आणले. शिक्षणाचा उदय प्रागैतिहासिक काळात झाला. सुरूवातीच्या काळात कुटूंब हे शिक्षणाचे केंद्र व आई वडील हे बालकाचे गुरू होत. पुढे हळूहळू जीवन–व्यवहाराच्या कक्षा बदलत गेल्या व आई वडीलांना चरितार्थासाठी घराबाहेर वेळ काढावा लागला. त्यामुळे मुलांना शिक्षण देण्यासाठी त्यांना वेळ मिळेनासा झाला. पुढे ‘उपजिविकेपुरते शिक्षण’ हा विचार बदलून लिहिणे वाचणे व अंकज्ञान असे स्वरूप शिक्षणाला प्राप्त झाले. पुढे शाळा ही संस्था उदयास आली आणि शिक्षकी व्यवसायाची सुरूवात झाली. पुढे मानवाच्या विचारांची प्रगती होत गेली आणि जीवनातील समस्यांबाबत विचारवंत वेगवेगळे सिद्धांत मांडू लागले.

शिक्षणाचे स्वरूप गतिमान आहे. त्यामुळे शिक्षणात कायम परिवर्तन व बदल होतात. हे सर्व बदल, बदलांचा परिणाम व बदलांच्या तात्कालीन समस्या यावरून शिक्षणाचा इतिहास निर्माण होतो. शिक्षण हे व्यक्तीच्या उज्वल भविष्यासाठी एक आवश्यक साधन आहे. शिक्षणाचे हे साधन जीवनात वापरून आपण काहीही चांगले साध्य करू शकतो. शिक्षणाचा काळ हा सामाजिक आणि वैयक्तिकरित्या महत्त्वाचा काळ असतो. शिक्षण हे ज्ञान कौशल्ये, मुल्ये, विश्वास व सवयींच्या प्राप्तीची प्रक्रिया आहे. शिक्षण प्रामुख्याने औपचारिक आणि अनौपचारिक या प्रकारे दिले जाते.

पुर्वीच्या काळी शिक्षण आश्रमात दिले जात होते. नंतर शिक्षणासाठी माध्यमे बनवली गेली व त्याद्वारे शिक्षण दिले जाऊ लागले. शिक्षण हे नाट्यीकरण करून विविध प्रकारचे उपक्रम राबवून त्याचप्रमाणे बालसभा आयोजित करून विविध खेळ राबवून आणि संवाद साधून शिक्षण दिले जाऊ लागले.

जग हे गतिमानतेने बदलत आहे. पावलोपावली काही ना काही बदल घडून येत आहे. हे सर्व शिक्षणामुळेच शक्य आहे. आणि विद्यार्थी हे देखील हवामानाच्या गतिप्रमाणे शिक्षण घेतात. शिक्षणाचा प्रभाव इतका प्रचंड आहे की, अनेक देश त्यांच्या नागरिकांना शिकविण्याच्या पद्धती बदलत आहेत. कारण बरेच ज्ञान लवकर अप्रचलित व अयोग्य ठरते.

शिक्षणाचा इतिहास संस्कृतीप्रमाणे बराच जुना आहे. म्हणजेच शिक्षणाचा विकास निश्चित केव्हा झाला हे सांगणे कठीण आहे. शिक्षणाच्या इतिहासाला विविध कालखंडात विभाजित केले जाते.

– वैदिक काळ (इ.स.पूर्व ४५०० ते इ.स. पूर्व ५०० पर्यंत) :

इ.स. पूर्व ४५०० पासून बौद्ध धर्माच्या उदयापर्यंत हा काळ आहे. या काळातील शिक्षणावर ब्राह्मणांचे अधिपत्य होते म्हणून काही लेखकांनी वैदिक कालीन शिक्षणालाच 'ब्राह्मणीय शिक्षण' तर काही हिंदू शिक्षण या संज्ञा दिल्या आहेत.

– बौद्ध काळ (इ.स.पूर्व ५०० ते इ.स. १२०० पर्यंत) :

जवळपास इ.स.पूर्व सहाव्या शतकामध्ये वैदिक धर्मात काही दोष आढळले. याच्या प्रतिकारात्मक स्वरूपात महात्मा बुद्धाद्वारे बौद्ध धर्माचा उदय झाला. ज्यामुळे धार्मिक आणि सामाजिक विचारधारेसोबत तत्कालीन शिक्षण प्रणालीलाही प्रभावित केले.

**–मुस्लिम काळ** (इ.स.१२०० ते इ.स. १७५० पर्यंत) :

मुस्लिम शासकांनी आपली संस्कृती रूजविण्यासाठी एक नवीन शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणली १२ व्या शतकाच्या शेवटी मुस्लिम शासनाला सुरूवात झाली होती. म्हणून या काळापासून मुगल साम्राज्याच्या पतनापर्यंतच्या काळाला मुस्लिम काळ असे संबोधण्यात आले.

**– ब्रिटीश काळ** (इ.स.१७५० ते इ.स. १९४७ पर्यंत):

इंग्रज भारतात इ.स. १६०० मध्ये आले आणि ब्रिटीशांनी भारतात आपली सत्ता प्रस्थापित केली व भारतीय शिक्षणाच्या स्वरूपाला पूर्णत: बदलवून पाश्चात्य शिक्षण प्रणालीच्या आधारावर आधुनिक शिक्षण प्रणालीचा विकास केला.

**–स्वातंत्र्योत्तर काळ** (इ.स.१९४७ पासून ते आजपर्यंत) :

दीर्घकाळानंतर भारताला १५ ऑगस्ट, १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. अनेक अडचणी व समस्या असूनही स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताने इतर क्षेत्रांप्रमाणेच शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय प्रगती केली.

मागील दोन वर्षांत कोरोनाच्या कृष्णछायेने संपूर्ण जग ठप्प झाले, त्याला शिक्षण व्यवस्थाही अपवाद राहिली नाही. 'वर्क फ्रॉम होम', विद्यार्थ्यांना 'लर्न फ्रॉम होम' करावे लागले, शिक्षकांना 'टिचिंग फ्रॉम होम' करावे लागले हा बदल शिक्षण व्यवस्थेसाठी अगदी अनपेक्षित होता. परंतू शिक्षणाचा वारसा तसाच चालू राहिला. कोविड–१९ च्या काळात प्रत्यक्ष वर्गात बसून घेतले जाणारे शिक्षण ते ऑनलाईन शिक्षण हा एवढा मोठा बदल सगळ्यांनी अनेक अडचणींसहित स्विकारला. कोविड–१९ च्या संकटाला संधी मानून वर्गातील आणि ऑनलाईन अशा दोन्ही प्रकारच्या शिक्षणाचा समन्वय साधून सर्वांनी संमिश्र शिक्षणपद्धती अवलंबली.

म्हणजेच शिक्षण ही कधीही न संपणारी चिरंतन प्रक्रिया आहे. ज्या प्रक्रियेवर मानवाचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ अवलंबून असतो. थोडक्यात शिक्षण स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झाले. आणि स्वातंत्र्योत्तर काळातही सुरूच आहे.



# शालेय जीवनात मातृभाषेचे महत्व

**प्रा.आढळराव योगिता शैलेश**

शिक्षणाचा इतिहास हा मनुष्यजातीच्या इतिहासाइतका प्राचीन आहे. कारण मनुष्य जेव्हा आपल्या प्रारंभिक अवस्थेत होता. तेव्हाही तो आपल्या मुलांना वनप्राण्यांपासून स्वत:चे रक्षण आणि पोटाची खळगी भरण्यासाठी शिकार करण्याचे धडे हा मातृभाषेतच देत असतो.

शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी कोणत्या ना कोणत्या माध्यमाची आवश्यकता असते व त्याचे योग्य उदाहरण म्हणजे मातृभाषेतून शिक्षण.

भाषा ही आपले विचार इतरांना पटवून देण्याचा व इतरांचे विचार समजून घेण्याची व आपल्या मनातील विचार समर्थपणे, प्रभावीपणे मांडण्याचे माध्यम आहे. आपली मातृभाषा ही आपली संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नेत असते. भाषेच्या माध्यमातून आपण आपल्या मनातील गोष्टी इतरांजवळ मांडत असतो. त्याच भाषेत आपण आपली स्वप्ने पाहत असतो.

मराठी भाषेचा उदय प्राकृत भाषेच्या महाराष्ट्री या बोली भाषेपासूनच झाला. असे मानले जाते. पैठण (प्रतिष्ठाण) येथील सातवाहन साम्राज्याने महाराष्ट्री भाषेचा प्रशासनात वापर सर्वप्रथम केला. देवागिरीच्या व यादवांच्या काळात मराठी भाषा व संस्कृतीची भरभराट झाली.

''माणसाच्या घरामध्ये बोलली जाणारी भाषा अथवा प्रथम भाषा म्हणजे मातृभाषा होय. ''

भारतातील मातृभाषांची संख्या ही जवळपास १६५२ आहे. नाणेघाटातील २३०० वर्षांपूर्वीचा शिलालेख हा महाराष्ट्री भाषेत आहे.

सातारामध्ये सापडलेली ताम्रपटीका ही इ.स.७३९ मधील आहे. ती ही मराठी भाषेतील आहे. मराठी भाषा साधारणपणे ५ व्या शतकाच्या असापास विभक्त होऊ लागली.

मातृभाषा असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा नेमकी कोणती भाषा? असा प्रश्न निर्माण होतो. महाराष्ट्रातील एखाद्या मुलाला विचारले की, तुझी मातृभाषा कोणती? तर तो म्हणेल मराठी ही माझी मातृभाषा आहे, परंतू आपल्याला माहित आहे की, मराठी भाषेच्या अनेक छटा आहेत, ग्रांथिक मराठी वेगळी असते. तसेच प्रदेशानुसार भाषा वेगळी असते.

आपण आपल्या जन्मापासून आपल्या दररोजच्या जीवनामध्ये मातृभाषेचा उपयोग करत असतो. आपली भाषा ही आपली ओळख असते. अगदी जन्मापासून ती भाषा वारंवार कानावर पडल्यामुळे आपल्याला तिच्याबद्दल प्रेम असते. मातृभाषा ही एक प्रकारे आपली ओळख असते. लहान मुलांच्या कानावर सर्वप्रथम मातृभाषाच पडते. त्यामुळे ते ती कधीही विसरत नाही. मुलांचा सर्वांगीण विकास हा मातृभाषेतूनच होत असतो.

आपले आई वडिल आपल्याला जे संस्कार लावतात. चांगल्या वाईट गोष्टी, नियम सांगतात. ते मातृभाषेतूनच असल्यामुळे ते शिकायला व समजून घ्यायला सोप्या असतात. आपण जेव्हा अनोळख्या ठिकाणी जातो. तेव्हा आपल्याला तेथील भाषा बोलणे न समजल्यामुळे आपल्याला बोलणे अवघड वाटते. पण अनोळख्या ठिकाणी आपली भाषा येणारी, बोलणारी व्यक्ती असते तर आपल्याला खूप बरे वाटते.

मातृभाषेतून शिक्षणाचे फायदे:–

**१) वाचन आणि आकलनात सुधारणा :**

विद्यार्थ्यांना मातृभाषेत शिकविल्यामुळे त्यांचे उच्चार स्पष्ट होतात. शब्द संपत्ती वाढते. त्यामुळे वाचन क्षमता वाढल्यामुळे शिकविलेले लवकर आकलन होते. मातृभाषा चांगल्या प्रकारे आकलन झाल्यामुळे ती मुले विज्ञान, इंग्रजीसारख्या विषयातही प्राविण्य मिळवितात.

**२) परकिय भाषा शिकणे सुलभ :**

मातृभाषेवर चांगले प्रभुत्त्व मिळविले तर

परकीय भाषा शिकणे कठीण जात नाही. वाचन आणि भाषा यांचा घनिष्ट संबंध असल्यामुळे मातृभाषेचे वाचन येऊ लागले की दुसऱ्या भाषेचे वाचन करणे सुलभ होते. कारण वाचनाशी निगडीत कौशल्य एका भाषेतून दुसऱ्या भाषेत सहज हस्तांतरीत करता येतात.

**३) 'स्व' ची ओळख :**

मातृभाषेतून शिकविल्यामुळे मुलांना आपल्या घरातील संस्कृती व परंपरेची चांगल्या प्रकारे ओळख होते. 'स्व' ची जाणीव होते.

**४) पालकांचा सहभाग आणि समाजाचा आधार :**

मातृभाषा किंवा स्थानिक भाषेच्या वापरामुळे समाजाशी नाळ बांधली जाते. शाळा, पालक, समाज एकमेकांशी जोडले जातात. भाषेचा अडसर नसेल तर पालकही आपल्या पाल्यांच्या अभ्यासात लक्ष घालतात. पाल्यालाही त्यामुळे त्याचा आधार वाटतो.

**५) आत्मविश्वासात वाढ :**

मातृभाषेतून शिक्षण दिल्यामुळे मुलांना भाषा नीट कळते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो व अधिक प्रभावीपणे ते स्वत:ला व्यक्त करु शकतात.

**६) ज्ञान संपादन सुलभ :**

शिक्षणाच्या माध्यमाची भाषा ही जर मातृभाषा असेल तर मुले नियमित शाळेत येतात. त्यांना शाळेची गोडी लागते

**७) शाळागळती प्रमाणात घट :**

मातृभाषेतून शिक्षण दिल्यामुळे मुलांना अभ्यासाची गोडी लागते. त्यांना अभ्यासात पालक, शेजारी यांची मदत होते.

जननी आणि जन्मभूमी निसर्गानेच आपल्याला बहाल केली आहे. मातृभाषा ही आपल्याला मिळालेले वरदानच आहे. तिचे महत्त्व जर उलगडले नाही तर जगातील अनेक भाषा नामशेष व्हायला वेळ लागणार नाही.

आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक पालकाचे स्वप्न आहे की, आपले मुल हे इंग्रजी शाळेमध्ये शिकले पाहिजे. कारण इंग्रजी ही जागतिक दर्जा मिळालेली भाषा आहे. उच्च शिक्षणासाठी त्याच भाषेचा उपयोग करावा लागतो. अस सर्वांचच म्हणण आहे. खरच इंगजीतून शिक्षण घेणे इतके महत्ताचे आहे का? मातृभाषेतून शिकलेली मुले आपल्या जीवनात यशस्वी होतच नाहीत का? इंग्रजी भाषा इंग्रजांनी १४ व्या शतकात आपल्या देशात आणली. म्हणजेच त्या आधीच्या काळात आपल्या देशात कोणी विद्वानच नव्हते का?

इंग्रज भारतातून निघून जाऊन जवळपास ७५ वर्षे पूर्ण झाली. इंग्रजी भाषा शिकू नये. असे नाही. परंतू पाल्यांना शिक्षणाचे माध्यम इंग्रजीच असण्याचा आग्रह नसावा. तीन दशकानंतर आपण शिक्षणाकडे पुन्हा एकदा नव्याने पाहत आहोत. शासनाच्या पुढाकाराने एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने देशाची सद्यस्थिती समाजाच्या अपेक्षा व पुढील दिशा यांचा सांगोपांग विचार करुन मसुदा तयार केला. या मसुद्याला भारतीय संसदेने २०२० जुलै महिन्यात मान्यता दिली. हाच मसुदा आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० म्हणून ओळखला जातो. या धोरणाची उल्लेखनीय बाब म्हणजे या धोरणाने मातृभाषेला महत्त्व दिले आहे. यामध्ये प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले पाहिजे. असे म्हटले आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे परक्या भाषेत शिक्षण दिल्यामुळे परकीय भाषेच्या वापराने विद्यार्थ्यांचा शिक्षणातला सहभाग देखील कमी होतो.

प्राथमिक शिक्षण हा शिक्षण प्रणालीचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. केवळ पाया मजबूत केल्याने शिक्षणाच्या टप्प्यात अपेक्षित निकाल तयार करता येतील हे शिक्षण मातृभाषेतूनच

देण्यासाठी सक्रिय सहकार्य आणि समाजातील सर्व घटकांचा सहभाग आवश्यक आहे. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, पाल्यांना मातृभाषेतूनच शिक्षण द्या आणि योग्य वेळी इतर जागतिक भाषांचेही शिक्षण द्या. त्यांची अधिक प्रगती होईल. अन्यथा देशातील सर्व भाषा सर्व संस्कृतीही नामशेष व्हायला वेळ लागणार नाही.

तज्ञांचे मातृभाषेविषयी असणारे मत:–

महात्मा गांधी म्हणतात–

''मातृभाषा शिक्षणाचे योग्य माध्यम आहे व अधिक योग्य माध्यम अनुभव आहे.

ज्येष्ठ शास्त्रज्ञ अनिल काकोडकर म्हणतात.

''मातृभाषाच मुलांच्या शिक्षणाचे स्वाभाविक माध्यम असून त्याच भाषेतून त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो.

श्री.अरुण फिरोदिया म्हणतात.

''मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची आकलन शक्ती वाढते. विषयाची समज येते व शिकविलेले पूर्ण आत्मसात होते. तसेच त्यांच्या चौकस बुध्दी व सृजनशीलतेला अधिक वाव मिळतो''

भाषेला खऱ्या अर्थाने सौंदर्य प्राप्त होते ते विविध अलंकारांनी आणि हे अशा काही अलंकारीक कविता लेखन करणारे कविवर्य कुसुमाग्रज म्हणतात,

''भाषा मरता देशही मरे, संस्कृतिचा दिवाही विझे! ''

गुलाम आणिक होऊन आपल्या प्रगतीचे शीर कापू नका।

संत ज्ञानेश्वर माऊली मातृभाषेविषयी सार्थ अभिमान व्यक्त करताना आपल्या ओंकार स्वरुप सुंदर ओवीत म्हणतात.

माझा मराठीचे बोलू कौतुके।<br>
परि अमृतातही पैजां जिंके<br>
ऐसा अक्षरे रसिके<br>
मेळवीन।।

मातृभाषाही संस्कृतीची जननी आहे. मातृभाषेतून संस्कृतिचा विकास अधिक होतो. मातृभाषेतूनच मुलांचे व्यक्तीमत्त्व घडत असते. वैश्विक संशोधनाच्या मते, सुरुवातीलाच म्हणजे प्राथमिक शिक्षण तरी मातृभाषेतूनच झाले पाहिजे. कमीत कमी ४५ ते ६० शब्द प्रतिमिनिट या वेगाने तरी मातृभाषेतूनच वाचता आले पाहिजे. मुलांना इंग्रजी भाषा शिकणे व सर्व विषय इंग्रजीतून शिकणे यामध्ये गफलत होते व मुलांना मानसिक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे न्यूनगंड निर्माण होतो. मानसिक विकास खुंटतो. आत्मविश्वासाला तडा जातो व त्यातून काही विद्यार्थी चुकीचा निर्णय घेऊन आत्महत्येचा मार्ग स्विकारतात.

देशाच्या सर्वांगीण विकासासाठी भाषा एक शक्तिशाली माध्यम आहे. देशाचे पुनरुज्जीवन केवळ शिक्षणाद्वारे शक्य आहे. शिक्षणात मातृभाषेचा अंगिकार करुन भारताची गौरवशाली सनातन संस्कृती पुन्हा जगात सर्वोच्च स्थानी जाईल व एक सशक्त पिढी तयार होऊन देशाचा विकास होण्यात मदत होईल.



# आत्मनिर्भर भारतातील शिक्षणाची भुमिका

**शेवाळे स्नेहा नवनाथ** बी.एड्.,द्वितीय वर्ष

स्वावलंबन म्हणजे स्वत:च्या पायावर उभे राहण्याची क्षमता मिळवणे. कोणावरही अवलंबून न राहता आर्थिक, राजकीय, सामाजिक दृष्ट्या स्वत:च्या पायावर आपण स्वावलंबी होऊ तेव्हाच आपण जागतिक शक्तींशी स्पर्धा करू शकू, आपल्या आवश्यक असलेल्या गोष्टींसाठी इतर देशांवरील आपले अवलंबित्व कमी होईल. आत्मनिर्भरता हा शब्द 'स्व' आणि 'अवलंबित' या दोन शब्दांपासून बनलेला आहे. ज्यामध्ये 'आत्मा' म्हणजे 'आत्मनिर्भर' म्हणजेच 'स्वावलंबी' म्हणजेच स्वत:वर अवलंबून राहणे. स्वावलंबी असणे हे प्रत्येक व्यक्तींचे, समाजाचे आणि राष्ट्राचे स्वप्न असते.

आत्मनिर्भर भारतातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे शिक्षण, शिक्षणाचा उद्देश स्वतंत्र विचाराचा, नवनिर्मित करणारा, सामाजिक दृष्ट्या संवेदनशिल, श्रम प्रतिष्ठा मानणारा, मानवी मुल्ये जपणारा नागरिक घडवणे हे आहे. अशी भूमिका महात्मा गांधी, जे.पी.नाईक, जे.कृष्णमुर्ती अशा अनेकांनी घेतली आहे. त्या दृष्टीने घटनेच्या मूल्यांवर आधारित दहा गाभा तत्वे 'एनसीईआरटी' ने निश्चित केली आहे. अयोगानेसुद्धा याचा उल्लेख केलेला आहे.

शिक्षणाचे उद्दिष्ट सर्वांगिण शिक्षणाऐवजी साक्षरतेवर भर असे करण्यात आले आहे. शिक्षणावर आंतरराष्ट्रीय नियोजन व नियंत्रण वाढविले गेले आहे. शिक्षणाची, सरकारची घटनादत्त जबाबदारी असूनसही शिक्षणाचे 'एनजीओ' करण करण्यावर भर देण्यात आला आहे. शिक्षणाचा उद्देश स्वतंत्र विचाराचा नवनिर्मित करणारा सामाजिक दृष्ट्या संवेदनशिल, श्रम प्रतिष्ठा मानणारा मानवी मूल्ये जपणारा नागरिक घडविणे हे आहे, अशी भुमिका महत्त्वाची आहे.

भारतात केंद्र व राज्य सरकारांचा शिक्षण हा अग्रक्रमाचा विषय नाही. गुणवत्ता वाढीसाठी विद्यार्थ्यांना शिक्षक उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. पण शिक्षक–शिक्षकेत्तरांची रिक्त पदे भरण्यावर शासन यंत्रणा उपाय करायला तयार नाही. शिक्षकांना शाळेत शिकविण्या व्यतिरिक्त जी इतर सरकारी कामे दिली जातात त्यामुळे शिक्षकांनी शाळेचे काम करायचे कधी असा प्रश्न निर्माण होत आहे.

गुणवत्तावाढीसाठी किमान भौतिक सोयी, प्रयोगशाळा, वाचनालय, संगणक कक्ष इत्यादी चांगल्या अवस्थेत व चालू अवस्थेत असायला हवेत. गुणवत्ता वाढीसाठी ऑनलाईन शिक्षणाची चर्चा सध्या चालू आहे, पण विजेचा लपंडाव, विजेचे भारनियमन इंटरनेट संपर्कात अडथळे, इंटरनेटचे भाडे, पालकांचे जुने मोबाईल अशा अनंत अडचणींमुळे मुलांनी ई–शिक्षण कसे घ्यायचे याचे उत्तर सरकारकडे नाही. 'स्टार' योजनेप्रमाणे गुणवत्ता म्हणजे 'पिसाच्या प्रमाणित परीक्षेसाठी मुलांची तयारी करून घेणे होय. यासारख्या परीक्षा युरोपातील देशात, शालेय विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जातात. या साचेबद्ध व प्रमाणित परिक्षा व त्यातील यश म्हणजे गुणवत्ता असे नवे गुणवत्तेचे सूत्र यातून मांडले जाणार आहे. शिक्षणाचे व अध्यापनाचे उद्दिष्ट 'पिसा'साठी मुलांना तयार करणे असा मर्यादित करण्याचा हा प्रयत्न आहे. या तथाकथित गुणवत्ता सुधार कार्यक्रमात स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, संघटना यांना सामील करून घेतले जाणार आहे. हा सार्वजनिक खाजगी सहकार्याच्या योजनेचा प्रकार आहे. सरकारी शिक्षणाच्या खाजगीकरणाची ही नांदी आहे.

लोकसंख्या हा अतिशय महत्त्वाचा घटक, जो भारताला मदतही करतो, पण त्याचसोबत नुकसानही करू शकतो. आतापर्यंत लोकसंख्या वाढीला सकारात्मक समजा' असेच बिंबवले गेले.

जागतिक बाजारपेठेत, कामगार उपलब्धता किंवा ग्राहकसंख्या, यात भारत नेहमीच

अग्रणी राहिला आहे. त्यामुळे साहजिकच उत्पादन आणि विक्रीसाठी जग भारताकडे आकर्षित होते. पण आता काळ बदलतो आहे. उत्पादन यंत्रणा आता मजूर केंद्रीत नसून तंत्रज्ञानाकडे झुकत चालली आहे. इंटलिजन्स कृत्रिम बुध्दिमत्ता (ए.आय.), मशीन लर्निंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज यांकडे उदयोग क्षेत्राचा कल वाढतो आहे आणि पुढच्या दहा वर्षांमध्ये जगातील अनेक मोठ्या कंपन्यासोबतच भारतीय कंपन्यांनीसुद्धा ५० टक्क्यांहून अधिक या तंत्रज्ञानास यंत्रणेत सामील करून घेतले असेल.

लोकसंख्येच्या बाबतीत जगात दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या भारतासारख्या देशाच्या अन्नधान्य उत्पादनातील वाढीचे प्रमाण लोकसंख्या वाढीच्या प्रमाणापेक्षा जास्त असणे हे कृषीक्षेत्राची कामगिरी उत्तम असल्याचे लक्षण आहे. अन्नधान्य उत्पादनातील या प्रभावी कामगिरीमुळे भारतीय शेतीने माल्यसया लोकसंख्या शास्त्रज्ञाचे भाकीत देखील खोटे ठरविले आहे. यामध्ये भारतीय शेतकऱ्यांबरोबरच हरित क्रांतीसाठी प्रयत्न करणाऱ्या कृषी शास्त्रज्ञांचे आणि ती यशस्वीपणे राबविणाऱ्या राजकीय व प्रशासकीय व्यक्तींचे योगदान देखील तितकेच महत्त्वाचे आहे. असे असले तरी स्वातंत्र्योत्तर सात दशकांनंतरच्या काळात देखील भारतात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आणि अजूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र थांबत नाही. म्हणजेच कृषी विषयक धोरणांच्या पुनर्विचार करण्याची आणि शेती व शेतकऱ्यांच्या विकासाला प्राधान्य देण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

भारतीय संस्कृती 'अन्नदाता सुखी भव' असे म्हणते. परंतू आज आपला अन्नदाता खरोखरच सुखी आहे का? याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. देशाचे सार्वभौमत्व टिकविण्यासाठी देशाच्या सीमांचे संरक्षण करणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच अन्नदात्याचे संरक्षण करणे देखील महत्त्वाचे आहे, कारण असे म्हणतात की सैन्य पोटावर चालते. म्हणजेच पुरेशा अन्नधान्याच्या उपलब्धतेशिवाय सैन्य देखील आपली भूमिका प्रभावीपणे पार पाडू शकत नाही. एखादया सार्वभौम राष्ट्राला अन्नधान्यासारखा मूलभूत गरजांच्या बाबतीत आयातीवर अवलंबून राहणे हे नेहमीच धोक्याचे असते. या दृष्टीने भारतीय कृषी क्षेत्राचे हे योगदान अत्यंत मोलाचे आहे. अलीकडील काळात भारताच्या संरक्षण क्षेत्राकडे

विशेष लक्ष दिले जात आहे. ते गरजेचे देखील आहे, परंतू हे होत असताना कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष तर होत नाही ना? याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विचार प्रक्रियेत कृषी क्षेत्राचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे म्हणूनच २००६ च्या राष्ट्रीय शेतकरी धोरणातील सुधारित आराखड्यात असे म्हटले आहे की, 'केवळ उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा आपले पोषण करणाऱ्या स्त्रिया व पुरुषांच्या आर्थिक कल्याणावर भर देण्याची वेळ आता आली आहे. फक्त उत्पादनाच्या भौतिक परिणामांमुळे शेतीविषयक धोरणे निर्धारित करणे पुरेसे नाही, तर मानवी पैलू हा त्यांचा मुख्य निर्धारक घटक असावा,' असे झाले तरच खऱ्या अर्थाने भारताचा पोशिंदा सुखी होईल.



# स्त्री समानतेविषयक कायदे

**लोहोटे प्राजक्ता बबन** बी.एड्.द्वितीय वर्ष

मागे एकदा समानतेबद्दल वाचण्यासाठी काहीतरी हाती लागलं एका तरुण लेखिकेने अत्यंत नाजूक विषयावर एक संवेदनशील लेख लिहिला होता. स्त्री–पुरुष समानता या विषयावर ती असं लिहित होती की, खरंतर स्त्री–पुरुष यांचा नैसर्गिक भेद सोडला तर अन्य कुठलाही भेद का मानला जावा? अत्यंत सोप्या शब्दांत आणि एकाच वाक्यात ती समानतेबद्दल किती महत्त्वाची भूमिका मांडत होती. मी विचारमग्न झाले.

पूर्वी स्त्रियांना फक्त घरकाम करणारी बाई मानलं जायचं. पूर्वीच्या काळी स्त्रियांबद्दल असे म्हटले जायचे की, ''मुलीने फक्त चूल आणि मूल एवढचं बघावं'' परंतू आजच्या काळात या बोलण्यावर काही अर्थच उरला नाही. स्त्रिया ह्या पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. पूर्वीच्या काळी मोजकी अशी क्षेत्र होती. जिथे स्त्रिया काम करायच्या. परंतू आजच्या या काळात असं एकही क्षेत्र उरलेल नाही. जिथे स्त्रिया काम करत नाहीत.

जेव्हा स्त्री शिक्षणावर पुरुषप्रधान संस्कृतीने बंदी आणली होती. त्या काळात स्त्रियांना साक्षर करण्याचा विडा सावित्रीबाई फुल्यांनी उचलला आणि मुलींची पहिली शाळा सुरु केली. इथूनच सुरुवात झाली. स्त्रियांच्या प्रगतीची. राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, किरण बेदी, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स यांना पाहिले तर आधुनिक स्त्रीची वाटचाल आपोआप आपल्या लक्षात येते.

आज विसाव्या शतकात स्त्री ही पुरुषांपेक्षा अर्थार्जनाच्या क्षेत्रातही समोद आहे. महिलांच्या संघटना तयार झाल्या, आर्थिक विकासाच्या अनुषंगाने विविध व्यवसायात स्त्रिया अग्रणी झाल्या. समाजकारण, राजकारण, खेळ, क्रीडा, शिक्षण कला, साहित्य, वैद्यकशास्त्र, विधी व न्याय यंत्रणा सुरक्षा यंत्रणा देशाच्या शासनकर्त्या म्हणून आजची स्त्री प्रत्येक ठिकाणी पुरुषांच्या बरोबरीने कार्य करत आहे.

राष्ट्राची धुरा सांभाळण्यापासून तर संशोधनापर्यंत समाजकार्यापासून तर कुटुंब प्रमुखापर्यंत स्त्रीच्या क्षेत्राची कक्षा रुंदावली आहे. विज्ञानाच्या क्षेत्रात अनेक संशोधक स्त्रिया आहेत. भारताचे पंतप्रधानपदी इंदिरा गांधी सारख्या स्त्रीने सलग अकरा वर्ष देशाचे नेतृत्त्व सांभाळले. ग्रहावर जाण्यापासून तर एवरेस्ट सर करण्यापर्यंत स्त्री गेली आहे. आता स्त्री चार भिंतींच्या आत राहणं, केवळ पती व कुटुंबाबाबत मर्यादित राहिलेली नाही तर जीवनाच्या विविधांगी क्षेत्रात प्रवेशित झालेली आहे. दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी सक्षम सहचरणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने त्या निभावत आहेत. समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्त्रीकडे सन्मानाच्या व आदराच्या भावनेने पहावे असे कार्य आजच्या स्त्रीचे आहे.

महिलांवर होणारे अत्याचार आणि त्यांना मिळणारी दुय्यम वागणुक यात फारसा बदल झालेला नाही. महिलांवरील अत्याचार कमी व्हावेत, त्यांना योग्य तो न्याय मिळावा म्हणून अनेक कायदे करण्यात आलेले आहेत. घटनेद्वारे नवीन कायदे करुन स्त्रियांना कायदेशीर समानता दिली गेली. परंतू प्रत्यक्षात स्त्रियांची स्थिती उत्साहवर्धक नाही. बहुतांश महिलांना कायद्याची माहिती नाही. त्यामुळे त्या कायद्याचा आधारच घेऊ शकत नाहीत. जरी घटनेने स्त्री–पुरुषांमधील हक्कांची समानता मान्य केली आहे. तरी समाजाने त्यांच्या भूमिकेविषयी व कार्यक्षेत्रामध्ये स्पष्ट फरक मान्य केला आहे. म्हणून लोकांची मने जेव्हा घटनात्मक समानता मान्य करतील. तेव्हाच खरी समानता शक्य होईल. महिलांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी अनेक संस्था प्रयत्नशील आहेत अगदी

खेड्यापाड्यात जाऊन महिलांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांना हक्कांची आणि त्याचबरोबर कर्तव्याचीही जाणीव करुन द्यायला हवी आणि स्त्रियांना समाजात समानता मिळावी यासाठी काही कायदे केले आहेत ते पुढीलप्रमाणे

**महिलांच्या रक्षणासाठी कायदे –**

१) विशेष विवाह कायदा १९५४

हे स्त्रियांना आंतरजातीय विवाह प्रेमविवाहाचा अधिकार देते आणि केवळ १८ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलींना परवानगी आहे.

२) हिंदू विवाह कायदा १९५५

हा कायदा कलम २५ नुसार अर्ज दाखल केल्यानंतर कोर्ट पोटगीची रक्कम देण्याचे आदेश देते. पती–पत्नीच्या वादामध्ये निकाल लागेपर्यंत मधल्या काळातसुध्दा पत्नीच्या उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगी रक्कम देण्याची तरतूद कायद्यात आहे.

३) हुंडा प्रतिबंध कायदा १९६१

हे स्त्रियांना हुंडा घेण्याला आणि देण्याला बेकायदेशीर क्रिया म्हणून घोषित करुन त्यांचे शोषण करण्यापासून संरक्षण करते.

४) हिंदू दत्तक आणि देखभाल कायदा १९५६

हे आपत्यहीन स्त्रिला मूल दत्तक घेण्याचा अधिकार आणि घटस्फोटीत स्त्रीला तिच्या पतीकडून देखभाल मागण्याचा अधिकार प्रदान करतो.

५) हिंदू उत्तराधिकार कायदा १९५६

१९५६ मध्ये निर्माण झालेल्या हिंदू उत्तराधिकारी कायद्यानुसार महिलांना संपत्तीमध्ये व्यापक अधिकार देण्यात आले असून स्त्रीधनाचा उपभोग घेण्याचा आणि ते धन खर्च करण्याचा अनिर्बंध अधिकार स्त्रिला मिळाला आहे. हिंदू स्त्रिला एकत्र कुटुंबाच्या संपत्तीतसुध्दा वाटणी मागता येते. स्त्री धन मिळावे म्हणून स्त्री कोर्टात खटला दाखल करु शकते. स्त्रीला मुलाप्रमाणेच वडिलोपार्जित संपत्तीमध्येही समान हक्क दिला गेलाय.

६) महिला संरक्षण कायदा

कौटुंबिक छळ प्रतिबंधक कायदा स्त्रीला कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व शारीरिक संरक्षण देतो. हा कायदा फक्त पुरुषांविरुध्दच लागू होतो.

७) बालविवाह प्रतिबंध कायदा

बालविवाहाची प्रथा बंद करण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिनियम १९८६ मध्ये सुधारणा झाल्या आहेत. लग्नाच्या वेळी मुलींचे वय किमान १८ आणि मुलाचे वय २१ वर्षाहुन कमी असल्यास शिक्षेची तरतूद आहे. हा कायदा सर्व जातीधर्माच्या लोकांना सारखाच लागू आहे.

८) छेडछाड करणे गुन्हा

स्त्रीची अब्रु लुटणे, हात धरणे, तिच्या वस्त्रांना हात घालणे अशाप्रमाणे विनयभंग करणाऱ्यांना भारतीय दंड संहिता ३५४ खाली शिक्षेची तरतुद आहे. तसेच छेडछाड केल्याबद्दल भारतीय दंड संहिता कलम ५०९ अंतर्गत पोलीसांत तक्रार दाखल करता येते.

९) लैंगिक गुन्हे

लैंगिक गुन्ह्यासंबंधात भारतीय दंडसंहिता कलम ३७५ व ३७३ अनुसार कडक शिक्षा देण्यात येतात. लैंगिक प्रकरणाची सुनावणी कोर्टाच्या बंद खोलीत होते.

१०) अश्लिलताविरोधी कायदा

भारतीय दंड संहितेच्या कलम २९२ ते २९४ मध्ये महिलांशी अश्लील वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे जाहिराती, पुस्तकं, चित्र आदि माध्यमांतून महिलांची विटंबना करणाऱ्या चित्र किंवा लेखनातून अश्लीलता सादर करणाऱ्याविरोधी कायदा १९८७ नुसार वॉरण्टशिवाय

अटक करण्याचा अधिकारही आहे.

११) कौटुंबिक न्यायालय कायदा

दाम्पत्य व कौटुंबिक कलहाची प्रकरणे एकाच ठिकाणी सोडविण्यासाठी कौटुंबिक अधिनियम १९८४ लागू करण्यात आला आहे. कुटुंब न्यायालय नसल्यास तिथल्या जिल्हा कोर्टाना कुटुंब न्यायालयाचा दर्जा देण्यात आला आहे.

१२) गर्भलिंग चाचणी

स्त्री भ्रूण हत्या रोखणे व गर्भाचे लिंग जाणून घेण्याच्या तंत्राचा दुरुपयोग करणे यावर अंकुश ठेवण्यासाठी प्रसूतीपूर्व निदान आणि तंत्रज्ञान विनिमय व दुरुपयोग निवारण अधिनियम १९९४ आहे.

१३) प्रसुती सुविधा कायदा

नोकरी पेशातील स्त्रीयांसाठी बाळंतपणाची आणि नवजात बाळाची देखभाल करण्यासाठी रजेची तरतूद असून त्या काळात स्त्रीला विशिष्ट दिवसांची भर पगारी रजा मिळते. मात्र कायद्यानूसार ती रजा इतर फायदे फक्त दोन बाळंतपणासाठी असतात. गर्भपात झाल्यावरही स्त्रीला भर पगारी रजा मिळण्याची तरतूद कायद्यात आहे.

१४) मुलावर हक्क

एखाद्या स्त्रीचा घटस्फोट झाल्यास तिच्या पाच वर्षांपर्यंतच्या मुलांना ती स्वत:जवळ ठेवू शकते. मात्र पाच वर्षांहून अधिक वयाच्या मुलांच्या बाबतीत कोर्टाचा निर्णयच बांधील असतो.

१५) समान वेतन कायदा

समान वेतन कायद्यानुसार एकाच कामासाठी स्त्री व पुरुष दोघांना समान वेतन मिळाले पाहिजे. विशिष्ट कार्यक्षेत्रातील नोकऱ्या सोडता अन्य ठिकाणी स्त्रियांना रात्र पाळीला कामाला बोलावता येत नाही.

या कायद्यांमुळे आणि स्त्रीयांना प्राधान्य दिल्यामुळे आज स्त्री पोहोचली नाही. असे एकही क्षेत्र नाही. मुळात असं म्हणायला हवं की ज्या ज्या क्षेत्रात स्त्रीने पाऊल ठेवलं त्या त्या क्षेत्रांची उंची तिने वाढवली.

स्त्रीयांमधील हा झालेला बदल संपूर्ण काळ पाहतो आहे. अजूनही स्त्री ही तिच्या संकेतांना झुगारुन पूर्णपणे व पूर्णवेळ तिच्या स्वप्नांवर लक्ष केंद्रीत करेल तेव्हाच खऱ्या अर्थाने तिच्या नव्या युगाचा एक नवा अध्याय सुरु होईल. आज याची सुरुवात तर झालीच आहे. परंतू ही समानतेची सकारात्मकता कित्येक वर्षे जतन करावी लागेल. त्याचवेळी आपल्याला अपेक्षित असलेली स्त्री समानता दिसून येईल.



# स्वातंत्र्योत्तर काळात सेवांतर्गत प्रशिक्षणात झालेले बदल

**भोसले रोहिणी श्रीपती** बी.एड्.द्वितीय वर्ष

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया दर्जेदार होण्यासाठी शिक्षकाचे योगदान महत्त्वाचे आहे. अध्यापन अधिकाधिक परिणामकारक होण्यासाठी शिक्षक सक्षम असायला हवा. त्याचे ज्ञान अद्यावत व कालसुसंगत असायला हवे. अध्ययन-अध्यापन या सतत प्रवाही असणाऱ्या प्रक्रियेमध्ये शिक्षकांच्या अनुभवाचा इतरांना उपयोग होण्यासाठी व स्वत: शिक्षकाला या प्रवाहातील बदलांची माहिती होण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे.

The best way to predict the future is to create it हे विधान वर्तमानात करावयाच्या नेमक्या कृतीवर भर देणारे आहे. संपन्न आणि समृध्द भविष्याची ग्वाही जशी प्रत्यक्ष कृतीत आहे तीच ती आशय समृध्द, व्यवहार कुशल कौशल्याधिष्ठीत शिक्षणात आहे. शिक्षण कशासाठी असा प्रश्न जेव्हा उपस्थित केला जातो. तेव्हा ज्ञानासाठी असेच उत्तर दिले जाते. ज्ञान कशासाठी या प्रश्नाच्या उत्तरात सुख समृध्दीसाठी अशीच अपेक्षा आहे.

विद्या ददाति विनंय विनयाद याति पात्रताम्।

पात्रत्वात् धनमाप्नोती धनात् धर्म तत: सुखम्।।

विद्येचा ज्ञानाचा पर्यायाने शिक्षणाचा संबंध सुखाशी जोडला गेला आहे. मग सुखाच्या परिभाषा काळानुरुप बदलत आहेत. अखंडपणे बदलत जाणाऱ्या या प्रक्रियेत मग शाळा, शिक्षक, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पुस्तके बदलणे हे क्रमप्राप्त आहे. या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक असलेला शिक्षक हा देखील अद्ययावत झाला पाहिजेच. शिक्षकांतील या अपेक्षित बदलासाठी आवश्यकता आहे ती प्रशिक्षणाची.

स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण प्रवाह :-

सन १९४८-४९

भारत स्वतंत्र झाल्यानंतर शिक्षणक्षेत्रासंबंधी विचार करण्यासाठी नेमलेल्या विद्यापीठ शिक्षण आयोग हा पहिला आयोग असल्याने निश्चितच या आयोगाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. यातून शिक्षकांच्या भूमिकेबाबत महत्त्वपूर्ण भाष्य करुन ज्ञानावर अध्यापनाचा दर्जा विशद करत संशोधनावर भर देण्यात आला व अध्यापन व्यवसायात सुधारणेस्तव महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या.

माध्यमिक शिक्षण आयोग:- मुदलीयार आयोग १९५२-१९५४

माध्यमिकशिक्षणाचा सर्वंकष विचार करुन सुधारणा करणेस्तव डॉ.ए.एल.मुदलियार यांचे अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची स्थापना केली व यात

१) शिक्षक प्रशिक्षणासाठी दोन प्रकारच्या संस्था असाव्यात.

- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र प्राप्त शिक्षकांसाठी दोन वर्षे कालावधी प्रशिक्षण
- पदवी प्राप्त शिक्षकांसाठी एक वर्षे कालावधी प्रशिक्षण

२) पदवीधारकांसाठी असणाऱ्या प्रशिक्षण संख्या विद्यापीठाशी संलग्न असावेत.

३) शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयात उजळणी वर्ग, अल्पकालीन अभ्यास वर्ग, कार्यशाळांमधील प्रात्यक्षिक प्रशिक्षण आयोजन करावे.

४) प्रशिक्षण महाविद्यालयात शुल्क आकारले जाऊ नये. प्रशिक्षण कालावधीत शिक्षकांना राज्य सरकारने विना प्रशिक्षण वेतन द्यावे.

कोठारी आयोग १९६४-६६ भारताचे भवितव्य वर्गखोल्यांमध्ये आकारास येत आहे. असे महत्त्वाचे विधान कोठारी आयोगाने शिक्षक प्रशिक्षणाबाबत केले. शिक्षणाच्या गुणात्मक विकासासाठी शिक्षकांची व्यावसायिक तयारी अधिक चांगली असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शैक्षणिक

नियोजनात शिक्षक प्रशिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिले गेले पाहिजे. यात प्रशिक्षणाबाबत पुढील शिफारशी केल्या आहेत.

१) शिक्षण प्रशिक्षणाची अन्य शैक्षणिक कार्याशी सांगड

• शिक्षणशास्त्राला विद्यापीठातील स्वतंत्र शाखा म्हणून मान्यता मिळावी.

• शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम विकासासाठी निवडक विद्यापीठात शिक्षण प्रशाला स्थापन केल्या जाव्यात.

• प्रत्येक प्रशिक्षण संस्थेत विस्तार सेवा विभाग स्थापन केला जावा.

• प्रत्येक स्तरावरील शिक्षकांना पाच वर्षातून एकदा तीन महिन्यांचे प्रशिक्षण द्यावे

२) व्यावसायिक शिक्षणाची सुधारणा:–

• राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळाने प्रशिक्षण कार्यक्रम व अभ्यासक्रम यांची पाहणी करावी.

• मुख्याध्यापक, शैक्षणिक प्रशासक, प्राध्यापक यांना आपल्या क्षेत्राबद्दल नवीन दृष्टी मिळेल असे नवीन अभ्यासक्रम संस्थेत तयार करावेत.

३) प्रशिक्षण संस्थांची सुधारणा:–

अध्यापकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी उन्हाळी अभ्यासवर्ग असावेत.

४) सेवातंर्गत प्रशिक्षण:–

शिक्षकांसाठी सेवातंर्गत प्रशिक्षणाचा विशाल कार्यक्रम हाती घेतला जावा.

५) उन्हाळी प्रशिक्षण:–

वर्गाच्या कार्यक्रमाचा विस्तार केला जावा.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६:–

शिक्षणाच्या विकासाला गती देणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शिक्षण प्रशिक्षणात आधुनिकता आणण्यासाठी विशेष शिफारशी केल्या. यात प्राथमिक शिक्षकांसाठी जिल्हा प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या जातील. या संस्था राज्य शैक्षणिक संस्था स्थापन केल्या जातील. त्यानुसार महाराष्ट्रामध्ये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची (डाएट) स्थापना दोन टप्प्यांत करण्यात आली. १९ जून १९९५ अन्वये १४ जिल्ह्यांमधून अस्तित्त्वात आल्या. ८ ऑक्टोबर १९९६ अन्वये १५ संस्थांपैकी ११ संस्था शासकीय अध्यापक विद्यालय उच्चीकरण निर्माणा झाल्या. सद्यस्थितीत ३३ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था आहेत.

१) तीन आठवडे मुदतीचे सेवांतर्गत प्रशिक्षण

२) अल्पमुदतीचे प्रशिक्षण वर्ग (५ दिवस)

३) क्षेत्र सहभाग व कृतीसंशोधन

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे

राज्य शिक्षणशास्त्र संस्था म्हणून १९६४ साली स्थापन झाली. केंद्रशासनाच्या सूचनेनुसार १९८४ साली राज्य शिक्षणशास्त्र संस्थेची NCERT च्या धर्तीवर पुनर्रनचना करुन SCERT ची स्थापना करण्यात आली. परिषदेशी संलग्न असलेल्या सद्यस्थितीत कार्यरत असणाऱ्या संस्था

१) राज्यस्तरीय विज्ञान संस्था नागपूर

२) महाराष्ट्र राज्य आंग्ल भाषा अध्यापन संस्था, औरंगाबाद

३) व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था मुंबई

४) महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था MEEPA औरंगाबाद

राज्यातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे नवीन प्रशिक्षण धोरण २९ जानेवारी २०१४

राज्य प्रशिक्षण धोरण २०११ द्वारे प्रत्येक प्रशासकीय विभागाने त्यांच्या अधीनस्त असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना पायाभूत प्रशिक्षण व सेवांतर्गत प्रशिक्षण देणे बंधनकारक करण्यात आले. नवीन प्रशिक्षण धोरण २९ जानेवारी २०१४ नुसार सर्व

प्रकारच्या प्रशिक्षणासाठी राज्यस्तरावर, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे ही संस्था म्हणून काम करेल.

१) ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळावे यास्तव पालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार २००९

२) SCERT मार्फत शिक्षकांना निवड व वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षण ऑनलाईन दिले.

३) मुलांमध्ये सर्जनशिलता नैतिकता व कल्पकता निर्माण व्हावी यानुसार २२ जून २०१५ नुसार वार्षिक नियोजन व अंदाजपत्रकानुसार व या बाबींचा विचार करुन निधी देण्यात येतो यात

- समग्र शिक्षा अभियान
- सर्व शिक्षा अभियान
- राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान
- Teacher Education Apprisal Board (TEAB)
- Strengthening Teaching- learning And Result for states (STARS)

प्रशिक्षणाबाबत +३ Approach :-

बदलत्या काळाची गरज म्हणून प्रशिक्षण आवश्यक ठरते, परंतू ठोकळेबाज व एकतर्फी प्रशिक्षण पध्दती आज कालबाह्य झाली आहे. प्रशिक्षणाची गरज म्हणून प्रशिक्षणाबाबत ३ अ Approach वापरणे महत्त्वाचे आहे. यात Asserssnent- Analysis- Action (मूल्यमापन-विश्लेषण-कृती) च्या माध्यमातून प्रशिक्षणाकडे पाहिले जाऊन त्याआधारे प्रशिक्षणांचे आयोजन करणे फायद्याचे ठरेल.

शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी, शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाची गरज अधोरेखित करीत असतानाच प्रशिक्षणाची परिणामकारकताही तितकीच महत्त्वाची ठरते. म्हणूनच शैक्षणिक गुणवत्तावाढीच्या परिणामांसाठी प्रशिक्षणाच्या स्वरुपामध्ये बदल करणेबाबत (जून २०१७ च्या शासन निर्णय, परिणामकारक प्रशिक्षणाच्या आयोजनाबाबत निश्चित दिशा देण्याचे काम करतो.

सदर लेखामध्ये शिकविणे म्हणजे किती बहुस्पर्शी बहुआयामी आणि संवेदनशील प्रक्रिया असते. हे यावरुन समजायला मदत होते आणि म्हणूनच तंत्रज्ञानाचा वापर कितीही वाढला तरीही शिक्षकांची भूमिका ही कायमच महत्त्वाची राहणार आहे. मागील तीन वर्षापासून ऑनलाईन सुरु असलेले दिशा प्लॅटफॉर्म, निष्ठा (NISHTA) व्हर्च्युअल सुविधांचाही वापर वाढलेला आहे. यातूनच नवीन शिकविण्याची प्रक्रिया प्रत्येक वर्गात घडायला वेळ लागणार नाही.

।।प्रशिक्षणात प्रावीण्यम्।।

भूतकाळाचा आढावा + वर्तमानकाळात विकसन+ भविष्यासाठी सज्ज= प्रशिक्षण



# कोरोना काळातील शिक्षण

**मुजावर हिना रशिद** बी.एड्.द्वितीय वर्ष

**प्रस्तावना :**

संपूर्ण जगभरात कोरोना व्हायरसने धुमाकूळ घातलेला आहे. कोरोना व्हायरस या संकटाशी संपूर्ण जग सामना करत आहे. कोरोना विषाणू झपाट्याने वाढत असल्यामुळे ही सर्व परिस्थिती आवाक्यात आणण्यासाठी सर्व जगभरात लॉकडाउन सुरु करण्यात आले. कोरोनाच्या या संकटामुळे आपल्या सर्वांचेच आयुष्य अस्थिर झालेले आहे. कोरोना संकटाने सर्वांनाच ग्रासून टाकले आहे.

**शाळेवर परिणाम :**

कोरोना विषाणूंचा वाढता प्रादुर्भाव कमी करण्यासाठी व कोरोना साखळी तोडण्यासाठी देशभरात कडक लॉकडाउन करण्यात आले. कोरोना काळात खुप मोठे बदल आपल्याला पाहायला मिळत आहेत. आपल्या सरकार ने कोरोना विषाणूंचा सामना करण्यासाठी घेतलेल्या लॉकडाउनच्या निर्णयामुळे शाळा बंद ठेवण्यात आल्या.

कोरोना काळात आपल्याला अनेक संकटांना तोंड दयावे लागत आहे. कोरोनाच्या या संकटाचा परिणाम देशातील सगळ्याच क्षेत्रात झाला आहे. मुलांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेता शाळा बंद करण्यात आल्या. जगभर पसरलेले हे कोरोना संकट कधी टळेल हे कोणीही ठामपणे सांगू शकणार नाही.

कोरोना व्हायरस या संकटाचा सगळ्यात मोठा परिणाम, हा शिक्षणावर झाला आहे. कोरोना संकट येण्याच्या आधीचे शिक्षण अतिशय वेगळे होते. मुलांना सहजपणे शाळांमध्ये जाऊन शिक्षण घेणे शक्य होत नाहीये. पालकांनाही मुलांच्या शिक्षणाची काळजी लागलीये. शाळा बंद असल्यामुळे शिक्षण थांबवून तर चालणार नाही. मुलांचे भवितव्य ही गोष्टसुद्धा खूप महत्त्वाची आहे, मुलांना शाळेत जाऊन शिक्षण घेणे शक्य नाही तर मग मुले शिक्षण कसे घेणार? पुढील वर्गाचा अभ्यास कसा करणार? शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन मुलांना कसे मिळणार? असे अनेक प्रश्न मुलांसमोर, शिक्षकांसमोर व आपल्या सर्वांनाच पडलेले आहे.

**ऑनलाईन शिक्षण :**

आपल्याला दैनंदिन जीवनात जसे मोठे बदल पाहायला मिळाले तसाच एक बदल म्हणजे ऑनलाईन शिक्षण. मुलांचे शिक्षण न थांबता तसेच चालु राहणे गरजेचे आहे. कोरोना संकटाच्या आधी मुले आपल्याला शाळांमध्ये जाताना दिसत होती परंतू तीच मुले आता आपल्याला मोबाईल, लॅपटॉप, टॅबलेट यांचा उपयोग करून अभ्यास करताना दिसतात.

शाळा, कॉलेज बंद असताना ऑनलाईन शिक्षण हा चांगला पर्यायी मार्ग आपल्याकडे आहे. कोरोना काळात मुले ऑनलाइन शिक्षण पद्धतीने भरपूर ज्ञान मिळवू शकतात. कोरोना काळात ऑनलाईन शिक्षण पद्धतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलताना दिसत आहे. शाळा बंद असताना मुले शिक्षण मिळवण्यासाठी डिजिटल माध्यमाचा वापर जास्तीत जास्त करू लागली. मुलांना शाळेत जाऊन शिक्षकांकडून ज्ञान मिळवणे शक्य नसल्याने शिक्षक या ऑनलाईन पद्धतीने मुलांपर्यंत पोहचू शकले.

कोरोना काळात ऑनलाईन वर्ग सुरू करून शिक्षकांनी मुलांना ज्ञान देण्याचा प्रयत्न सुरूच ठेवला. ऑनलाईन शिक्षण पद्धतीमुळे शिक्षकांना मुलांशी पालकांशी संपर्क साधणे सोपे झाले. मुलांनी ऑनलाईन पद्धतीने भरपूर ज्ञान मिळवले. मुलांना शिक्षण घेण्यात आनंद वाटू लागला. नवनवीन पद्धतीने मुले ज्ञान मिळवू लागली. ऑनलाईन शिक्षण पद्धतीची एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे यासाठी फक्त घरातील मोबाईलची गरज असते खूप कमी वेळात आणि खूप कमी खर्चात मुलांनी ज्ञान मिळवले. मुलांना शिक्षण

होत असताना काही अडचणीही येत राहतात. काही मुलांना स्वत: अभ्यास करून काही गोष्टी समजून घेणे अवघड जाते तर काही मुले स्वत: समजून घेऊन अभ्यास करू शकतात. ज्या मुलांना शिक्षण घेताना काही मुद्दे समजत नव्हते त्यांनी ऑनलाइन शिक्षण प्रणालीचा वापर करून शिक्षकांशी संपर्क साधून आपल्याला न समजणारे मुद्दे समजावून घेतले.

शाळा सुरू नसल्यामुळे सर्व विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा वापर करू लागले. गूगल मीट, झूम यांचा वापर करून मुले शिक्षण मिळवू लागली परंतु यातही खूप मुलांना अडचणी येत होत्या. काही मुलांजवळ मोबाईलची अडचण असले तर काहींना इंटरनेट विषयी अडचण असते. ग्रामीण भागात काही ठिकाणी मोबाईलला रेंजसुद्धा नसते. ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी साधने उपलब्ध नसतात. परंतू अशा अडचणीतसुद्धा मुलांनी, शिक्षण मिळवले. कोरोना काळात काही गोष्टी आव्हानात्मक आहेत. या अडचणींवर मात करत मुले शिक्षण घेत आहेत. कोरोना संकट कधी टळेल हे सांगता येणार नाही परंतु मुलांचे शिक्षण सुरु राहण्यासाठी प्रयत्न सुरूच आहेत. आपण सर्वांनी एकत्र येऊन मुलांना शिक्षण मिळवण्यासाठी काही उपक्रम राबवले पाहिजे.

**कोरोनाचा परिक्षांवर परिणाम :**

जेव्हा सर्व शैक्षणिक संस्था कोरोनामध्ये बंद झाल्या, विद्यार्थ्यांसाठी परिक्षा घेणे हे एक मोठे आव्हान बनले. कोरोना संकटामुळे सी.बी.एस.ई. आणि सी.आय.एस.सी.ई. बोर्डाच्या देशभरातील अनेक राज्यांच्या बोर्ड परिक्षा रद्द कराव्या लागल्या. यानंतर सी.बी.एस.ई. आणि सी.आय.एस.सी.ई.सह देशातील अनेक राज्यांच्या शिक्षण मंडळांनी दहावी आणि बारावीच्या परिक्षेचा निकाल परिक्षा न घेता अंतर्गत मूल्यांकनानूसार जाहीर केले. महाराष्ट्रात बारावीच्या परीक्षा झाल्या होत्या. दहावीच्या भूगोलचा पेपर कोरोनाच्या कचाट्यात सापडला. भूगोल परीक्षा रद्द करण्यात आली नंतर विदयार्थ्यांना सरासरीनुसार गुण देण्यात आले.

देशातील सर्वात मोठ्या स्वरूपावरील परीक्षा असणाऱ्या इंजिनिअरिंग, मेडिकलच्या प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट (एन.ई.ई.टी.) आणि जे.ई.ई.परिक्षा ऐन कोरोना काळात, पूरेशी खबरदारी घेऊन प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर आयोजित करण्याचा धाडसी निर्णय सरकारने घेतला. अनेक विद्यार्थी, पालक, संघटना, शिक्षक संघटना, राजकीय पक्षांनी यास विरोध केला. कोणी थेट सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. पण केंद्र सरकार या विरोधाला जुमानले नाही. या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा तितक्याच गांभीर्याने घेतल्या जायल्या हव्यात त्यासाठी आरोग्यविषयक पूर्ण खबरदारी घेतली जाईल, अशी हमी केंद्राने दिली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने या परीक्षा पार पडल्या. चेहऱ्यावर मास्क, हातात सॅनिटायझर अशी आयुध घेऊन मूल परीक्षा केंद्रावर हजर झाली. परीक्षा केंद्राची संख्या वाढवून आणि प्रत्येक केंद्रावर विद्यार्थी संख्या कमी करून सोशल डिस्टन्सिंगचं पालन करत परीक्षा पार पडल्या. १ ते ६ सप्टेंबर दरम्यान जे.ई.ई.ची परीक्षा आणि १३ सप्टेंबर रोजी नीट (एन.ई.ई.टी.) परीक्षा झाली. शीत, दिल्ली विद्यापीठासह अनेक विद्यापीठांनी ऑनलाईन’ परिक्षा आयोजित केली.

**समारोप :**

प्रत्येक विद्यार्थी हा घरीच बसलाच असेही नाही तो बाहेरगावी जातो, फिरण्याचा आनंद घेतो. त्याअर्थी विद्यार्थी व पालक हे फक्त शिक्षणापासून दूर पळत असल्याचे दिसते. काही व्यक्तीच्या दबावाला बळी पडून शाळा बंद ठेवण्याची भूमिका योग्य नाही. शाळा ऐच्छिक केल्यास विद्यार्थी हे निश्चितपणे प्रत्यक्ष शाळेलाच प्राधान्य देतील. ऑनलाईन शाळेचे अप्रूप

संपल्यामुळे वैतागलेल्या विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याची प्रतिक्षा आहे. त्यांना फक्त ऑनलाइनची सक्ती करून वर्षे ढकलण्याचा विचार हा एकदिवस शाळांच्या मुळावर घाव घातल्याशिवाय राहणार नाही. कोरोना असेल किंवा सर्वसाधारण परिस्थिती शिक्षकांचे कार्य हे आयुष्यभर दर्शवत असते. विदयार्थ्यांचे आयुष्य उज्वल करणारे शिक्षकच देशाची भावी पिढी घडवतात. परंतू इतरांच्या आयुष्य घडवणाऱ्या शिक्षकांना स्वतःच्या समस्या सोडवण्यासाठी 'चिरीमिरी' दयावी लागते, तेव्हा खूप दुःख होते. डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक इतकेच नव्हे तर राजकीय पुढारीही शिक्षकांच्या हाताखालून गेलेले असतात, या सर्वांचे गुरू म्हणून शिक्षक हे नेहमी आदर्शस्थानी राहिले पाहिजेत, अशा स्वरूपाचे कार्य शिक्षकांच्या हातून घडत राहावे, हीच माफक अपेक्षा !



**रेखाटन : संदिप भालेराव**

# शाळांच्या विकासासाठी लोकसहभाग हीच संजीवनी

**आढळराव अक्षता भिवाजी** बी.एड्.द्वितीय वर्ष

शाळांमधील शिक्षणाचा दर्जा सुधारावा, विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढावी, अपेक्षा रास्त असली तरी शाळांमध्ये किमान सुविधा असणेही तितकेच गरजेचे आहे. किमान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केवळ शासकिय अनुदान योजनांवर अवलंबून राहणे योग्य नाही. शिक्षणाची गुणवत्ता सुधारूण पालकांनाही शिक्षणात सहभागी करून घेतल्यास त्यामाध्यमातून शाळा सोयी सुविधांनी समृध्द करता येतात. अशा रितीने समृध्द झालेल्या शाळांची उदाहरणे देवून लोकसहभाग किती महत्वाचा आहे हे या मुलाखतीतून सांगितले आहे.



**वैयक्तिक माहिती**

नाव – सुरेश डोके
पत्ता – मु.पो. मंचर, ता.आंबेगाव,जि.पुणे.
शिक्षण – बी.एस्.सी. बी.एड्.
नोकरी – मुख्याध्यापक, श्री शिवाजीराव द. आढळराव पाटील विद्यालय, लांडेवाडी
अनुभव – ३५ वर्षे

**प्रश्न १. आपल्या शाळेचा निकाल अनेक वर्षांपूसन १००% लागत आहे यासाठी सर्वप्रथम तुमचे मनापासून अभिनंदन ! यशाच्या या रहस्यामागे आपणास कोणाची मदत झाली ?**

उत्तर – संस्था, शिक्षक, विद्यार्थी पालक या सर्वांच्या समन्वयातून व परस्पर विश्वासातून शाळेचा निकाल अनेक वर्षांपासून १०० % लागण्यास मदत झाली.

**प्रश्न २. शाळेच्या विकासात कोणते घटक महत्त्वाचे आहेत असे आपणास वाटते? त्या घटकाची भूमिका शाळेच्या विकासामध्ये कशा प्रकारे महत्त्वपूर्ण ठरते ?**

**उत्तर** – संस्था पालक, ग्रामस्थ हे सर्व घटक शाळेच्या विकासात महत्त्वाचे आहेत व या घटकांचा विविध कार्यक्रम व उपक्रमासाठी सक्रिय सहभाग महत्वपूर्ण भूमिका बजावतो.

**प्रश्न ३. शाळेतील वातावरण समृद्धीपूर्ण, स्वच्छ व आनंददायी ठेवण्यासाठी कोणकोणत्या सुविधांची आवश्यकता आहे. यासाठी शासन, पालक, लोकांची कशा प्रकारे मदत होते ?**

उत्तर – स्वच्छ व सुंदर इमारत, मैदान, सुसज्ज ग्रंथालय, आय.सी.टी. लॅब, प्रयोगशाळा, स्वच्छतागृह, शुद्ध पिण्याचे पाणी इ. वैशिष्टपूर्ण बागेची रचना, शासनाकडून मिळणारी मदत, दानशूर व्यक्तींकडून ग्रंथालयासाठी मदत, क्रीडांगण उभारण्यासाठी लोकांच्या श्रमदानातून मिळणारा सहभाग व संस्थेकडून विविध गोष्टींची पूर्तता.

**प्रश्न ४. शालेय विकासासाठी लोकसहभाग मिळवण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती, शाळेतील सर्व शिक्षक कशा प्रकारे कार्यरत असतात ?**

उत्तर – शाळेच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती व संस्था सातत्याने प्रयत्न करून अनेक सुविधा उपलब्ध करून देतात. मासिक सभांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील असतात.

**प्रश्न ५. गावातील सार्वजनिक मंडळे, ग्रामपंचायत यांचा शालेय विकासात कशा प्रकारे सहभाग असतो ?**

उत्तर – राष्ट्रीय सण व कार्यक्रमांत ग्रामस्थ व तरुण मंडळे विविध स्वरुपात, जसे विविध बक्षिसे, प्रोत्साहनपर रोख रक्कम अशी मदत करतात. उदा. एस.एस.सी. परीक्षेमध्ये नंबर मिळवणारे विद्यार्थी, विविध स्पर्धांमधे यश मिळवणारे विद्यार्थी यांचा सत्कार करून प्रोत्साहन दिले जाते. तसेच वृक्षारोपण करून देखील शालेय परीसराची शोभा वाढविण्यासाठी मदत होते.

**प्रश्न ६. गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, व्यावसायिक गट, तरुण वर्ग यांची शालेय विद्यार्थ्यांसाठी कशा प्रकारे मदत होते ?**

उत्तर – आरोग्यविषयक व्याख्याने तसेच विविध प्रकारचे वैद्यकिय साहित्य जसे औषधे, प्रथमोपचारपेटी, मास्क, सॅनिटरी पॅडस् यासांरख्या गोष्टी दिल्या जातात वृक्षारोपण व त्यांच्या संगोपणासाठी तरुण वर्गाची मदत नेहमीच मिळते. वार्षिक स्नेहसंम्मेलनासाठी सर्वच ग्रामस्थांचे सहकार्य लाभते.

**प्रश्न ७. शाळेतील काही गरजू विद्यार्थी, वंचित घटक यासाठी शासनाच्या सोयी पुरेशा पडतात का ? शासनाच्या अशा प्रकारच्या काही योजनांची नावे सांगू शकाल का ?**

उत्तर – शासनाकडून 'शालेय पोषण आहार' पुरविला जातो. तसेच मोफत पाठ्यपुस्तके, विविध शिष्यवृत्ती देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाते, त्यानुसार गरजेप्रमाणे उपचार व साहीत्य पुरविले जाते.

**प्रश्न ८. शिक्षक पालक संघाची शालेय विकासात कशा प्रकारे मदत मिळते ?**

उत्तर – शिक्षक पालक संघाच्या माध्यमातून विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी विद्यार्थी व पालकांचे समुपदेशन केले जाते व अप्रगत विद्यार्थ्यांसाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याविषयी चर्चा करून त्याप्रमाणे कार्य केले जाते. विद्यार्थ्यांना शारिरीक, मानसिक आरोग्याबरोबर चरित्र संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविले जातात. उदा. विज्ञान मेळावा, नाट्यस्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम इ.

**प्रश्न ९. आपल्या संस्थेचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याची अनेक वर्षांपासूनची परंपरा आहे. यामध्ये लोकसहभाग कशा स्वरूपात मिळतो ?**

उत्तर – विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून जे सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात. त्यासाठी पालक व ग्रामस्थ वेळोवेळी सहकार्य करतात. कार्यक्रमासाठी वेगवेगळी वेशभूषा, विविध प्रकारचे साहित्य देऊन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रित्या सहभाग मिळतो.

**प्रश्न १०. सर्व शिक्षा अभियान, शालेय पोषण आहार यांसारख्या योजनांमध्ये लोकसहभागाचे स्वरूप कशा प्रकारे असते ?**

उत्तर – विद्यार्थी उपस्थिती टिकून राहण्यासाठी पालक नेहमीच सतर्क असतात. तसेच शालेय पोषण आहाराचा दर्जा चांगला रहावा यासाठी पालक वेळोवेळी पहाणी करून मार्गदर्शनपर सूचना देतात.

**प्रश्न ११. आपल्या या प्रवासात आपणास अनेक अनुभव आले असतील. त्यातील अविस्मरणीय असा कोणता प्रसंग किंवा अनुभव आपण सांगू शकाल का ?**

उत्तर – शाळेस विविध प्रकारचे मिळालेले पुरस्कार स्वच्छ, सुंदर शाळा, उपक्रमशील शाळा, नाट्य, क्रीडा, समुहनृत्य या स्पर्धांमध्ये जिल्हा पातळीवर मिळालेले अनेक पुरस्कार, तसेच सातत्याने विद्यालयाचा १००% निकाल या मुळे शाळा, संस्था.

ग्रामस्थ, विद्यार्थी यांसर्वांना प्रेरणा व आनंद मिळाला हाच खरा अविस्मरणीय क्षण! राष्ट्रीय स्तरावरील एन.एस.एस. शिबीर, पुणे जिल्हा परीषद आयोजित यशवंत २००० चे यशस्वी आयोजन आणि अनेक नामवंत साहित्यिक, खेळाडू, विविध अभिनेते यांची विद्यालयास भेट हे सर्वच क्षण माझ्यादृष्टीने खुप महत्वाचे होते.

**प्रश्न १२. आपल्या व्यावसायिक कारकिर्दिमध्ये आपण विविध बदल होताना पाहिलेत. उदा. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण किंवा विविध आयोगाच्या शिफारशी असतील, यांच्याद्वारे अंमलात आणले गेलेले बदल याविषयी आपले मत सांगा.**

उत्तर – बदल हा निसर्गाचा नियम असून सर्व गोष्टी सातत्याने बदलतात हे सर्वच क्षेत्रात होतात त्याला अपवाद नाही त्यामुळे शालेय प्रत्येक नविन संकल्पना व धोरणे शिक्षणाच्या प्रगतीसाठी आवश्यक असतात. म्हणून एन.ई.पी. २०२० हे सुद्धा त्या प्रक्रियेचाच एक भाग असून त्याद्वारे शिक्षणक्षेत्रात व विद्यार्थ्यांमध्ये अनुकुल बदल होत आहे व ही चांगली व स्वागतार्ह बाब आहे.

**प्रश्न १३. शाळेच्या विकासामध्ये भौतिक घटक महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. आपल्या शालेय विकासातील भौतिक सुविधांसाठी लोकसहभाग कशा प्रकारे मिळाला?**

उत्तर – इमारत व क्रीडांगण उभारणीसाठी सुरुवातीच्या काळात ग्रामस्थ व पालक यांचा सक्रीय सहभाग व मदत मिळाल्याने हे सर्व शक्य झाले, विविध लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून विविध शैक्षणिक व क्रीडा साहित्य मिळण्यास मदत झाली.

**प्रश्न १४. शाळेच्या विकासासाठी आपण सतत प्रयत्नशील असता हे जोखमीचे कार्य करताना आपणांस कोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले?**

उत्तर – बदलत्या काळात समाज व्यवस्था व विद्यार्थी यांच्यात बदल होत असताना काळानुरूप विदयार्थ्यांच्या अनेक समस्या सोडविताना कसरत करावी लागते.

**प्रश्न १५. येणाऱ्या नविन पिढीसाठी शालेय विकासाच्या दृष्टीने आपण कोणत्या उपाययोजना सांगाल ?**

उत्तर – वाचन संस्कृती कमी होत आहे तसेच मोबाईल व इतर प्रसारमाध्यमांच्या अविवेकी वापर वाढल्यामुळे विद्यार्थी ज्ञानापासून दूर जात आहे. शिवाय त्याच्या ध्यानधारणा व शिक्षकांप्रती आदराची भावना कमी होत आहे व हा अडथळा शिक्षणासाठी बाधक ठरत आहे, याची विद्यार्थ्यांना जाणिव करून देणे ही काळाची गरज आहे. तसेच मैदानी व कसरतीचे खेळ यापासून विद्यार्थी दूर जात आहे त्यामुळे त्याच्या शारिरिक, मानसिक, भावनिक स्वास्थ्यावर परीणाम होत आहे. म्हणून विद्यार्थ्यांमध्ये विविध खेळांची आवड निर्माण केल्यास तो टी.व्ही., मोबाईल यापासून दूर राहील व त्याची शैक्षणिक प्रगती होण्यास नक्कीच मदत होईल. नविन तंत्रज्ञानाचा विवेकी वापर केल्यास तो काळासोबत प्रगती करण्यास यशस्वी ठरेल.

**प्रश्न १६. आजच्या मुलाखतीव्दारे आम्हा सर्वांसाठी काय संदेश देऊ इच्छिता?**

उत्तर – वाचन, मनन, चिंतन याव्दारे विदयार्थ्यांची प्रगती तसेच शाळा, समाज, देश याप्रती त्यांची तळमळ, निष्ठा या गुणांची जोपसणी व्हावी आणि एक सुसंस्कृत आदर्श नागरीक तयार व्हावा म्हणून सर्वांनी प्रयत्नशील राहूया. हे सर्व सर्वांच्या सहकार्यातूनच घडून येईल असे मला वाटते.

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० - आकृतीबंध

**प्रा.आढळराव योगिता शैलेश** सहाय्यक प्राध्यापक

भारत हा विकसनशिल देश आहे. एकविसाव्या शतकाच्या गरजा आणि भावी पिढयांच्या आकांक्षा यांची पूर्तता करणारे नवीन शैक्षणिक धोरण केंद्र सरकारने जाहिर केले. ते धोरण बालवाडीपासून उच्चस्तरीय शिक्षणापर्यंत सर्व स्तरांना लागू आहे. प्रत्येक विदयार्थ्यांमध्ये अंतर्भूत असलेल्या अद्वितीय क्षमतांना समोर आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे.

जग हे जागतिक खेडे होत असताना समाजाच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार महत्वपूर्ण आहेत. पुढील पिढी आत्मनिर्भर होण्यासाठी भारतासाठी नवनिर्मितीच्या दृष्टीने सज्ज होण्यासाठी त्या दिशेने टाकलेल एक पाऊल म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० होय.


गरीब व श्रीमंत शिक्षणातील विषमता ही नवीन शैक्षणिक धोरणात विचारात घेतली आहे. म्हणून सरकारी आणि खाजगी शाळेमध्ये शिक्षणात समानता आणण्याची भूमिका प्रामुख्याने मांडण्यात आली आहे.

शिक्षण हा भारतीय संस्कृतीत १६ संस्कारांपैकी एक आवश्यक संस्कार मानला जातो. शिक्षणाला जीवन जगण्याची तयारी असेही संबोधले जाते. या अर्थाने शिक्षण हा विषय प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक घटकाशी निगडीत आहे. त्यादृष्टीने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० वर समाजातील सर्वच स्तरावर सखोल आणि समृध्द चर्चा होणे गरजेचे आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० येण्यापूर्वी इ.स. १९६८ मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अस्तित्वात आले. त्यानंतर इ.स. १९८६ मध्ये केंद्र सरकारने मसुदा तयार केला. इ.स. १९९२ मध्ये त्यावेळच्या केंद्र सरकारने यात काही सुधारणा करत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे नुतनीकरण केले. शैक्षणिक धोरणाचा मसुदा स्विकारणे ही काही अचानक घडलेली घटना नाही. पूर्व कॅबिनेट सचिव टी.एस्. आर्. सुब्रहमण्यम् यांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती स्थापन करत त्यांच्याकडे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा तयार करण्याची जबाबदारी सोपवली. सुब्रह्मण्यम समितीने आपला आराखडा २७ मे २०१७ रोजी शासनाला सादर केला त्या आधारे २४ जून २०१७ रोजी इस्त्रोचे प्रमुख वैज्ञानिक के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली ९ सदस्यीय समितीचे गठन करण्यात आले. या समितीने नविन राष्ट्रिय शैक्षणिक धोरणाचा मसूदा तयार करुन ३१ मे २०१९ रोजी मा. मनुष्यबळ विकास मंत्र्यांकडे सोपविण्यात आली. सुमारे दोन लाख सुचना समाजाच्या विविध स्तरातून प्राप्त झाल्या असल्याचे कळले. २९ जुलै २०२० रोजी ऐतिहासिक क्षेत्रात नोंद व्हावी अशी शिक्षण क्षेत्रात एक उल्लेखनीय घटना घडली. म्हणजे सुमारे साडेतीन दशकांनतर भारताच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बदल करत तयार केलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मसुदयाला केंद्रिय मंत्रिमंडळाने मंजूरी दिली व त्यात शिक्षणाचा आकृतिबंध ठरविण्यात आला.

१९८६ च्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार संपूर्ण शिक्षणाचा आकृतीबंध १०+२+३ असा होता. १० वर्ष शालेय शिक्षण २ वर्षे उच्च माध्यमिक शिक्षण आणि ३ वर्षे पदवी शिक्षण यात १० वर्षीय शालेय शिक्षणात इयत्ता पहिली ते पाचवी प्राथमिक शिक्षण सहावी ते आठवी निम्न माध्यमिक शिक्षण असे विभाजन करण्यात आले होते. यात शिशू म्हणजेच शाळापूर्व शिक्षणाचा विचार केलेला नव्हता. तसेच शालेय शिक्षणादरम्यान दोन बोर्ड परिक्षा इ. १० वी व इ. १२ वी घेण्याची तरतूद होती. +२ स्तरावर शाखानिहाय शिक्षण व्यवस्था करण्यात आलेली होती आणि विदयार्थ्यांना निवडलेला विषय शाखांतून

आवडीनुसार विषयांची निवड करण्यात येत होती. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार संपूर्ण शिक्षणाचा आकृतिबंध ५+३+३+४ असा असून पहिली तीन वर्ष शिशु शिक्षण त्यानंतर इयत्ता पहिली व दुसरी अशी ५ वर्षे हा एक टप्पा व इयत्ता सहावी सातवी आठवी हा ३ वर्षाचा तिसरा टप्पा असेल. या दोन्ही टप्प्यांवर प्राथमिक स्तर आहे. त्यापुढे नववी ते बारावी हा ४ वर्षाचा माध्यमिक स्तर असणार आहे. इयत्ता सहावी पासून व्यवसायिक कौशल्य विकसन अभ्यासक्रम घेता येणार आहे. आणि पदवीचे शिक्षण ४ वर्षाचे असेल, अशी तरतूद आहे. पदवी परिक्षांसाठी बोर्ड परिक्षेतील गुणांबरोबरच प्रवेश परिक्षांसाठी स्वतंत्र प्राधिकरण (National Assessment Center) असेल. दप्तराचे ओझे कमी करण्यावर भर असेल. तसेच विदयार्थ्यांच्या अभिव्यक्तीला वाव देणारी परिक्षापध्दती अवलंबण्यात येणार आहे. संपूर्ण देशात एकसारखा अभ्यासक्रम असणार आहे.



**नवा आकृतीबंध (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ऑक्टोबर २०२०)**

**५+३+३+४ नवा आकृतीबंध–अभ्यासक्रम आणि अध्यापनशास्त्र यांचे पुनर्गठन**

| कोठारी आयोग–आकृतिबंध | | NEP 2020–आकृतिबंध | |
|---|---|---|---|
| २ वर्षे | इ.११ वी. व १२ वी. | माध्यमिक वर्ग ९ ते १२ | ४ वर्षे |
| | | वर्ग ६ ते ८ | ३ वर्षे |
| २ वर्षे | इ.१ ली. व १० वी. | वर्ग ३ ते ५ | ३ वर्षे |
| | | २ वर्षे–प्राथमिक वर्ग १ व २<br>३ वर्षे–पूर्व प्राथमिक | ५ वर्षे |
| | शाळा प्रवेश वय–६ वर्षे | शाळा प्रवेश वय–३ वर्षे | |

भारतीय शिक्षण ISSN २२३१–६४९३ ऑक्टोंबर –२०२० अ.अश्विन/ नि.अश्विन–शके १९४२

# भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रा. आढळराव विजया प्रदिप** सहाय्यक प्राध्यापक

एखाद्या घटनेला ७५ वर्ष पूर्ण झाल्यास अमृत महोत्सव साजरा केला जातो. आपल्या भारत देशाला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले आहे आणि म्हणून भारत देशाने २०२२ मध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला आहे.

**उंची शान तिरंगे की, संघर्षो में भी लहराया ।**
**भूलो मत उन्हे जिन्होने,देश के खातिर लहू बहाया ।**

इ.स. १७७० पासून भारतावर इंग्रजांचे राज्य होते. १९ व्या शतकापासूनच सर्व राज्यांना इंग्रजांनी आपल्या सैन्यबळावर ताब्यात ठेवले होते. १८५७ च्या स्वातंत्र्य समरानंतर ब्रिटीशांनी त्यांची व्यवस्था अजूनच शिस्तीची केली. १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटीशांना लक्षात आले की आपल्याला भारतावरचे राज्य व युद्ध हे संभाळता येणार नाही तसेच दुसऱ्या बाजूला भारतीय क्रांतीकारकांचा जोर वाढला आणि त्यामुळेच अखेर दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य लढ्यात अनेकांनी आपले योगदान दिले या सर्वांच्या योगदानामुळेच भारताला स्वातंत्र्य मिळाले. जगातील सर्वात प्रसिद्ध नेत्यांपैकी एक मोहनदास करमचंद गांधी ज्यांना आपण महात्मा गांधी ''बापू'' अशा नावांनी ओळखतो. महात्मा गांधी हे स्वातंत्र्य लढ्याचे प्रणेते होते. महात्मा गांधींनी अहिंसा आणि सत्याचा मार्ग वापरून भारताला गुलामगिरीच्या बंधनातून मुक्त केले. तरूणांच्या मनात स्वातंत्र्याची भावना जागृत करणारे भगतसिंह आपली जिद्द आणि साहस यांच्या जोरावर इंग्रजांना हादरून टाकणाऱ्या भगत सिंह यांच्या नसा–नसात देशभक्ती होती, क्रांती होती.

देशाच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी कायम अग्रणी राहिलेला असे जहालमतवादी क्रांतीकारक 'स्वातंत्र्यवीर सावरकर' यांच्या 'मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला' या काव्य पंक्तितून त्यांच देशप्रेम दिसून येत. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी 'चंद्रशेखर आझाद' यांनी संपूर्ण आयुष्य दिले. अखेरपर्यंत ते इंग्रजाशी लढत राहिले अल्फ्रेड पार्क मध्ये इंग्रजांशी लढताना त्यांना वीरमरण आले.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच' आणि तो मिळवून दाखवला असे 'बाळ गंगाधर टिळक' यांनी भारताला ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी ब्रिटीशांविरूद्ध आझाद हिंद फौजची स्थापना केली. असे 'सुभाषचंद्र बोस'. ब्रिटीश राजवटीविरूद्ध लढण्यासाठी आपल्या सैन्याचे नेतृत्व केले असे 'तात्या टोपे' आणि सर्व भारतीय क्रांतीकारक यांच्यामुळेच आज आपण ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून सुटून भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करू शकत आहोत. या सर्व भारतीय क्रांतीकारकांना मनापासून शतश: नमन.

आज या अमृत महोत्सवी वर्षात आपल्या देशाने खूप काही यश मिळवले आहे. आपल्या देशाने सध्या विज्ञान–तंत्रज्ञान वापर, कृषी, उद्योग, दळण–वळण, शिक्षण, आरोग्य, संशोधन, क्रिडा, संरक्षण अशा असंख्य क्षेत्रात लक्षणीय यश मिळवले आहे. आपला भारत देश प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. आज आपण खूप भाग्यवान आहोत की आपण आपल्या भारत या लोकशाही असणाऱ्या देशात आनंदाने आणि एकोप्याने राहत आहोत. आपल्या भारत देशात विविध जाती –धर्माचे लोक एकोप्याने व गुण्यागोविंदाने एकत्र राहत आहे. अमृत महोत्सवी वर्ष हा आपल्या भारत देशासाठी खूप मोठा आहे. या आपल्या देशाच्या गौरवसाठी व तिरंगा राष्ट्रध्वजाच्या सन्मानासाठी, जन–जागृतीसाठी या वर्षी 'हर घर तिरंगा' हे अभियान १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान राबवले गेले. या अमृत महोत्सवासंदर्भात कृष्णा

नदीच्या काठावरील माई घाटावर जलसंपदा विभागाने अवघ्या दहा मिनिटात पाच हजार दिवे लावून माई घाट दिव्यांनी उजळून टाकला. या दिव्यांतून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव हे शब्द साकारले. अमृत महोत्सवा निमित्त राज्यस्तरीय निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विविध वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मॅरेथॉन, चित्रांचे प्रदर्शन, कार्यशाळा, चर्चासत्रे, जाणीव व जागृती, सांस्कृतीक उपक्रम असे कितीतरी उपक्रम राबवले गेले. हुतात्मा स्मारकांचे सुशोभीकरण करण्यात आले. अमृत महोत्सवा निमित्त भारतीय स्वातंत्र्य सैनिकांचा सन्मान करण्यात आला.

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाली. आपण सर्वांनी उत्साहात अमृत महोत्सव साजरा केला. खरंतर स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बरीचशी स्वप्ने सर्वच स्वातंत्र्य योद्धांनी पाहिली होती. त्यात गरिबी हटवणे, भारताला अन्न धान्यबाबत आत्मनिर्भर करणे व भारताचे मागासलेपण दूर करून भारताला सर्वच दृष्टीने समृद्ध करणे हा प्रमुख उद्देश होता. निश्चितच यातील अन्यधान्यबाबत 'आत्मनिर्भर 'होण्याचे स्वप्न पूर्ण झालेले आहे असे म्हणता येईल. कृषी उत्पादनात वाढ करून आयातक म्हणविला जाणारा देश आज कृषी उत्पादन निर्यातक झाला आहे. हे गेल्या ७५ वर्षांच्या श्रमाचे फलित आहे हे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव समयी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

आपला भारत देश हा संतांची पावन भूमी असलेला देश आहे. तो नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध असा सुंदर देश आहे. आपण सर्वांनी मिळून या देशाला अधिक सामर्थ्यशाली देश बनवण्याचा प्रयत्न करूया..!

**उत्सव तीन रंगांचा,**
**आकाशाने आज लपेटून घेतला...!**
**अभिमान आहे या मातीचा,**
**गर्व बाळगूया भारतीय असल्याचा...!**

# विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिक समाज

**केदारी गोरक्षनाथ दादाभाऊ** (बी.एड्, द्वितीय वर्ष)

आजचे युग हे विज्ञानयुग आहे. मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रचंड प्रगती केल्याने मानवी सामर्थ्य वाढलेले दिसून येत आहे. विसाव्या शतकात अनेक क्रांतीकारी शोध लागले. त्यातून अनेक नित्योपयोगी उपकरणे मानवी जीवनात गरजेची बनली. अनेक दुर्धर रोगांवर उपचार होऊ लागले. मानवाचे एकंदरीत आयुर्मान वाढले. पण सर्वसामान्य समाजात आधुनिक विज्ञाननिष्ठा तेवढ्या प्रमाणात दिसत नाही. लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होणे आवश्यक आहे. त्यासाठी दृष्टी महत्त्वाची आहे. वैज्ञानिक दृष्टी असेल तर तशीच सृष्टी दिसेल.

शिल्पात दगड असतो असे म्हणण्यापेक्षा दगडात शिल्प असते असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. सामान्य असलेले दगड म्हणविले गेलेले अनेकजण कालांतराने शास्त्रज्ञ, उद्योजक म्हणून नावारूपास आले. संशोधनात्मक कार्यास आज सर्व जगात मान्यता मिळत आहे. नाविन्यपूर्ण संशोधन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना करिअरच्या उत्तमोत्तम संधी, देश परदेशात सुध्दा होत आहेत.

स्टीव जॉब्ज महाविद्यालयीन वयात अत्यंत हुशार मुलांपैकी एक असा मुलगा नव्हता. हायस्कूलमध्ये असतानाच त्याला एका कंपनीत पार्ट टाईम जॉब करावा लागला. 'ऑडिटिंग'च्या प्रथम सत्र परीक्षेत तो नापास झाला. तोपर्यंत त्याचे पदवीपर्यंत शिक्षण झाले होते. मात्र ऑडिटिंगच्या वर्गात बसता यावे म्हणून स्टीव मित्राच्या खोलीवर आणि कोकच्या बॉटल विकून मिळणाऱ्या पैशातून गुजराण करायचा. स्टीव जॉब्जने 'ॲपल' नावाचा संगणक तयार केला. लगेच दुसऱ्या वर्षी अत्याधुनिक सोयी–सुविधायुक्त असा 'ॲपल' संगणक तयार केला.  मध्ये स्टीव यांनी ग्राफिक युजर इंटरफेस, आयकॉन्स, विंडोज आणि माऊसने कर्सर फिरवता येणारा संगणक तयार केला.  मध्ये स्वस्त आणि जलदगतीने काम करणारा संगणक बाजारात आणला. यातून आपल्याला माहिती आणि तंत्रज्ञानात झालेली प्रगती दिसून येते.

यापुढे इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीवरून आपल्याला नॅनो इन्फॉर्मेशनचा व नॅनोटेक्नॉलॉजीमुळे मनुष्याला अनेक प्रश्न सोडविता येतील. त्याचा उपयोग मानवी शरीरातील असाध्य रोगांवरील उपाय, मटेरियल इंजिनिअरींग, रसायन इतकेच काय तर घरच्या घरी वीजसुध्दा या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तयार करता येईल. काहीही असले तरी नॅनो तंत्रज्ञान हे मानवी जीवन व्यापून टाकील हे नक्की. विज्ञानात लागणाऱ्या या शोधांमागे, त्यातील तत्त्वामध्ये शास्त्रीय विचार पद्धती आहे. सखोल माहिती मिळवून त्यातील सर्व बाजू तपासूनच त्यावर निष्कर्ष काढले जातात आणि मग त्यातून योग्य तो निर्णय घेतला जातो. शास्त्रीय पद्धतीत पूर्वग्रहदूषित दृष्टी न ठेवता नवनवीन कल्पनांचा स्वीकार होतो. या निर्णयांची पुन्हा पुन्हा पडताळणी करता येते, ते तपासता येते, ग्रंथ आणि व्यक्तींचे मत हेच प्रमाण न मानता ते तपासून स्वीकारणे ही शास्त्रीय दृष्टी आहे.

एकविसावे शतक हे वेगवान शतक असल्याने बुद्धीसंपदा श्रेष्ठ ठरणार आहे. ज्ञान हे समाजात साधन व साध्य राहणार आहे. ज्ञानावर आधारीत व्यवसाय, सेवा, शासन, प्रशासन आणि संपत्ती असणार आहे. ज्ञान, व्यवस्थापन व ज्ञानाधिष्ठित समाजात ज्यांच्याकडे ज्ञान आहे, सर्जनशीलता आहे, विद्वत्ता आहे त्यांच्याकडे संपत्ती धाव घेईल व पुढील काळात ते नेतृत्त्व करतील. बदलत्या परिस्थितीत सर्वसामान्य लोकांना विज्ञानाभिमुख व्हावेच लागेल. आतापासून विद्यार्थी आणि युवक यांनी स्वतःमध्ये वैज्ञानिक जाणीव निर्माण केली पाहिजे. आपल्या कुटूंबात आणि पर्यायाने समाजात आधुनिक जीवनदृष्टी अंगीकारून वैज्ञानिक दृष्टिकोनाचा परिकोष होईल यासाठी प्रत्येक व्यक्तीने धार्मिक रूढी, प्रथा, परंपरा यांची विधायक

वृत्तीने चिकित्सा केली तरच त्यासंबंधीची यथार्थ ज्ञान प्राप्ती होईल. योग्य आणि अयोग्य यातील भेद स्पष्ट होईल. मानवी व्यक्तिमत्त्व हे मनाशी संबंधित असल्याने अत्यंत गुंतागुंतीचे आहे. बुद्धी आणि भावना यातून ते बनलेले आहे. त्यामुळे काही वेळा व्यक्तींकडून भावनेच्या आहारी जावूनही निर्णय घेतला जातो. वस्तुनिष्ठतेची जागा दैववाद घेतो. अंधश्रद्धा निर्मूलनातील थोर कार्यकर्ते डॉ. अब्राहम कोवूर म्हणतात जो चमत्कार करतो, तो बदमाश असतो, जो चमत्कारावर विश्वास ठेवतो, तो मूर्ख असतो आणि जो चमत्काराला विरोध करीत नाही तो भ्याड असतो. यासाठी कोणत्याही चमत्काराला नमस्कार करण्यापूर्वी आपला विवेक पूर्णपणे जागृत ठेवून त्यातील सत्याचा शोध अत्यंत चिकित्सकपणे घेतल्यास व्यक्तींचे आणि व्यक्ती व्यक्तीतून समाजप्रबोधन होईल यात शंका नाही. विवेकवादी समाज श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात नक्कीच भेद करील.


विज्ञानाला आपण कल्पतरू, कामधेनू किंवा अल्लाउद्दीनचा जादूचा दिवाही म्हणू शकतो. कारण विज्ञानामुळे मानवाच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. भौतिक जगाशी विज्ञानाचा प्रत्यक्ष संबंध आहे. विज्ञानाने भौतिक अभावांना दूर करून मानवी जीवनाला सुखमय बनविले. विज्ञानाने मानवाला विजेवर चालणारी घरगुती उपकरणे दिली. मनोरंजनासाठी रेडिओ, व्ही. सी. आर., सिनेमा इत्यादी साधने विज्ञानाचीच देणगी आहे. टपाल, तार, दूरध्वनी, फॅक्स व इलेक्ट्रॉनिक मेलसारखी संपर्क माध्यमे असल्यामुळे सगळे जग एकमेकांशी जोडले गेले, जग जवळ आले. रेल्वे, विमान, जहाजे यासारख्या प्रवासाच्या साधनांमुळे राष्ट्रांमधील भौगोलिक दुरावा कमी केला आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ज्यामुळे प्रगती झाली ते ज्ञान म्हणजे विज्ञान, ज्या ज्ञानामुळे सर्वांचे आयुष्य सुखकर झाले ते ज्ञान म्हणजे विज्ञान.

आज घराघरांमध्ये मिक्सर, फिल्टर, फ्रिज, कुलर, टॉवर फॅन, दूरचित्रवाणी संच, दूरध्वनी तसेच संगणक यांचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला आहे. विज्ञानाने निर्मिलेल्या या साधनांचा स्विकार केला म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन त्या व्यक्तिंनी स्वीकारला असे होत नाही मात्र व्यक्तीच्या मनामध्ये वैज्ञानिक वृत्तीची जोपासना होणे आवश्यक आहे. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिकतेची रुजवणूक होणे सद्यस्थितीत जरूरीचे आहे. प्राप्त ज्ञान आणि कौशल्ये यांची सांगड घातली गेली पाहिजे. विद्यार्थी जीवनातच या सवयी लागल्या तर असे विद्यार्थी सभोवतालच्या घटनांचे बारकाईने व अचूक निरीक्षण करून योग्य पुराव्यांशिवाय कोणतेही मत स्वीकारणार नाहीत.

विज्ञानाने मानवाची चिंतनप्रवृत्तीसुद्धा बदलली, आपल्या समाजाचे स्वरूप बदलले. शहरीकरणाची प्रवृत्ती वाढली आणि राज्ये अधिक शक्तिशाली बनली व मोठी झाली. आजचा मानव जीवनाचा पूर्ण आनंद लुटीत आहे. ज्याप्रमाणे फुलाबरोबर कांटे असतात त्याचप्रमाणे विज्ञानाची एक दुसरीही बाजू आहे विज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे आपणांस अनेक सुखसोयी उपलब्ध झालेल्या आहेत तसेच त्याचे परिणामही भोगावे लागत आहेत.

जेव्हा २१ व्या शतकात विशुद्ध विज्ञानाच्या विकासातून औद्योगिक क्रांती झाली. तेव्हा तिचे युरोपात जंगी स्वागत झाले. या क्रांतीमुळेच कित्येक कुटुंबे विखुरली कित्येकांचे शोषण झाले. औद्योगिकीकरणामुळे पाश्चात्य राष्ट्राच्या व्यापाराच्या स्पर्धा वाढल्या, हुकूमशाहीचा जन्म झाला व शेवटी विश्वयुद्ध झाले. विज्ञानाने शोधून काढलेली विविध घातक शस्त्रे, अणुबॉम्ब जेव्हा विध्वंस करण्यासाठी वापरली जातात तेव्हा विज्ञानाच्या शोधाचा तो उपहास उडविला जातो. संपूर्ण मानवता संपुष्टात आणली जाते व मानव हा मानव न राहून तो

काळराक्षस ठरतो. विज्ञान न शाप आहे न वरदान ते एक निर्भेळ ज्ञान आहे. ज्याचा उपयोग मानवाच्या विवेक बुद्धीवर आधारित आहे आणि त्याचा सदुपयोग करून त्याला वरदान करण्यात मानवाचाच हात आहे. आपण हे सर्व अंगीकारताना मानवी जीवनमूल्ये आणि नीतिमूल्ये यांचीही जाणीव ठेवली पाहिजे. तरच विज्ञाननिष्ठ, आधुनिक जीवनदृष्टी असलेला ज्ञानाधिष्टित समाज निर्माण होईल.



# Virtual Open Schools in India
# A move towards future of Education : Abstract

**Gadave Rakesh Jayvant** (S.Y. B.Ed)

Covid 19 Pandemic changed the way education was being imparted throughout the world. ICT or the Information and communication technology helped in easy transition from offline (asynchronous) to online (synchronous) education during the lockdown period. Now days the online education has become the new normal at least for skills which can easily be learned through audio-visual formats. Students have become independent learners with the use of online learning platforms such as Youtube, Ebooks, Social media channels, MOOC' like Udemy, courser, etc. Government has been taking lot of efforts to increase the reach of education to masses through the digital India initiatives like PM eVidya, ePathshala, etc as well as open and distance learning. Virtual Open Schooling can be defined as an educational practice that provides opportunity to learners to study a formal school-based course online and gain credit for certification purpose. The three most important factors of accessibility, affordability, and quality, provided by virtual schools constitute the foundation on which the future of Indian education depends. With the help of these schools, the educational system of the country is progressing steadily to realise the dream of Digital India. The improvements in communication technology are addressing the concerns being brought up about virtual schools, and the advantages are proving to be more than the disadvantages.

**Introduction: How Technology Has Changed Teaching and Learning:**

Today, innovation assumes an undeniably significant part in the public arena. Practically all parts of our lives are changing or will be changing from now on. Thus, it is changing the way that we associate, carry on with work, learn and educate, and even the way in which our brains work. Because of the introduction of innovation, the learning environment is evolving. There are currently more choices accessible to students than any other time in recent history. Previously, students just had the choice of concentrating on in a classroom. In the present day, access to the web and mobile are necessities. The students learn at home or at a café at their leisure. As students' skills, knowledge, and requirements change, the educator's job changes too.

**Access to Education – Anywhere, Anytime Learning:**

Technology and the internet have made it easier for students to access all types of information. In the past, it was difficult for everyone to obtain books. There were always few and expensive, and only the well-off could afford them. A variety of educational content is now available online, including books, podcasts, blogs, videos, and more. There's something for everyone. Students may also earn a degree and an education by enrolling in online

degree programs and platforms. Technological advancements have opened up almost endless opportunities for education.

**Collaborative Learning:**

With today's technology, students can collaborate more effectively because it offers such versatility in learning. Technology can greatly enhance collaboration. Collaborative learning refers to the process by which two or more individuals learn or attempt to learn something together. Students participate actively in the learning process through problem-based learning, conversations, and reflection. Laptops and mobile devices, on the other hand, can be used for remote collaboration and online education outside the classroom. Due to the use of technology, students are developing new approaches to problem solving and learning how to collaborate with peers, which is a valuable skill for their future careers.

**Government Initiatives:**

Under the Digital India initiative, the government has taken extensive steps to boost digital education activities. Few of the ICT initiatives for school education are:

- PM eVIDYA Programme2 – it unifies efforts related to digital/online education so as to enable multi-modal access to education, with 12 eVidya TV channels, based on the line of One Class-One Channel for class 1 to 12;
- National Digital Educational Architecture (NDEAR)3 – a digital platform to support activities related to education planning;
- DIKSHA4 – a platform offering school curriculum-based learning materials;
- ePathshala Portal5 – a portal that acts as a storehouse of audios, videos, epubs, flipbooks etc.;
- NISHTHA6 – an integrated teacher training programme, widespread use of radio and podcast; QR codes in textbooks. etc.
- As per the Union Budget 2022-23, PM eVIDYA will be expanded from 12 to 200 TV channels so as to enable all states to provide supplementary education in regional languages, for classes 1-12.

WHAT IS OPEN AND DISTANCE LEARNING (ODL)?

Today two terms that are being used almost inter-changeably are 'Open Learning' and 'Distance Education' and they are often combined to be known as Open and Distance Learning (ODL). Open learning is a philosophy and Distance Education is the mode used for translating it into reality as the two are complementary to each other.

DISTANCE EDUCATION (DE)

It is an umbrella term which describes all the teaching-learning arrangements in which the learner and the teacher are separated by space and time. In fact, it is a mode of delivering education and instruction to learners who are not physically present in a traditional

setting of classroom. Transaction of the curriculum is effected by means of specially prepared materials (learning materials) which are delivered to the learners at their doorstep through various media such as print, audio/videotapes, Internet and World Wide Web, etc.

OPEN LEARNING

Open learning, which covers a wide range of innovations and reforms in the educational sector that advocates flexibility to the learner with regard to entry and exit; pace and place of study; method of study and also the choice and combination of courses; assessment and course completion. Thus, ODL is a term that accepts the philosophy of "openness" and uses the "distance mode" of learning

HOW?

The National Institute of Open Schooling (NIOS) formerly known as National Open School (NOS) was established in November,1989 as an autonomous organisation in pursuance of National Policy on Education 1986 by the Ministry of Education (MOE), Government of India. Anybody irrespective of caste, creed and location can seek enrolment in the courses/programmes offered by NIOS.

Its prioritized target groups are:

- Rural and urban people
- Disadvantaged groups
- Underprivileged sections of the society
- Unemployed and partly employed people
- School dropouts
- People with special needs i.e., physically and mentally challenged persons
- Minorities

What Is Virtual Open School In NIOS India

Virtual Open Schooling can be defined as an educational practice that provides opportunity to learners to study a formal school-based course online and gain credit for certification purpose. The courses are based on existing Open Educational Resources, and are built around a learning management system with content stored on online data centres. Digital media integration would facilitate effectiveness of curriculum. Synchronous and asynchronous technologies would facilitate interaction - with students, with teachers, and with course content.

In India, NIOS has initiated to launch and start VOS in collaboration with CEMCA (Commonwealth Educational Media Centre for ASIA) to serve learners to continue their education and skill development. Currently, NIOS is offering two vocational courses under the Virtual Open Schooling (VOS) system i.e. ICT Applications and Rural Technology which are already developed in the form of NIOS OER and will be used the same material for the learners to complete the course.

After the successful completion of the course learners will appear in final examination (term end) for certification. Virtual Open Schooling systems are beneficial in the following manners: they offer

1.Personalized, tailored content: suited to individual learning

2.Flexibility: Anywhere Anytime access, students can enrich their skills in learning a new subject or take up a course or class normally not available at their schools

3.Lower costs: Saves on permanent infrastructure costs

4.Access to high quality education: Access to quality teachers and peers, increases collaboration

Establishing virtual open schooling in India would address the urgent need of expanding the education base at secondary and senior secondary level. It would integrate the facilities of physical institution with virtual learning environment to provide quality education on controlled expenses. The platform would be a blend of synchronous and asynchronous technologies as delivery mechanisms.

Most important characteristics of a Virtual School are:

• Real-Time Operation– Virtual Schools operate on real time wherein all students log in at the same time for their learning activities with their teachers.

• Two-way Learning Process – As opposed to e-learning, which is a one-way learning, virtual schools provide a two-way learning process as the classes are interactive.

• Uses Simple Technology – Virtual classrooms can be created using internet/Wi-Fi connection and any smart device like smartphones and laptops/desktops.

Benefits of a Virtual School:

• Remote Learning – It makes learning possible for students without requiring them to travel to schools. They can continue their schooling and learning from the comfort of their homes.

• Two-Way Learning– Virtual schooling makes two-way communication feasible between the teachers and the students, making teaching-learning process interactive. This enhances the e-learning experience by taking it to another level.

• Learning Flexibility – It provides flexibility to students, especially those of higher grades who are busy preparing for upcoming exams. In case they are involved in preparing for a particular subject, they have the option to skip/join a live class and benefit from the recorded session at another time. This flexibility is very helpful for students who are focused on other crucial career-building activities like athletics, sports, acting, and various forms of arts, by providing them the time to attend these classes elsewhere.

• Working at Own Pace – Students who are fast learners or slow learners get the opportunity to work at their own pace, without having to match their speed with others.

• Saves Travelling Time– This is one of the biggest advantages given the time spent on travelling back and forth from school in the congested city roads with traffic jams.

• Affordable – Since certain expenditures like transport fee, infrastructure development fee, and other additional costs are not required, it results in less expenditure for all stakeholders including parents and school management alike.

• Diversity in Education – Concept, communication, clarity, innovation, confidence, compassion, application, and effective teaching-learning strategies being the primary areas of focus in these schools leads to diversity in education.

• Increased Parent-Involvement – As the students log in to virtual classrooms from their homes, virtual schooling increases the involvement of parents in the learning process of their children. This increased involvement helps them to understand their children better and overcome any challenges that arises on the learning journey.

However, as with every new advancement, there are always new issues that rise with it. The following are a few disadvantages of online or distance learning:

• May Create a Feeling of Isolation – While some students have no difficulty learning independently, others may understand and learn better in a more social setting with their classmates and teachers physically present around them. Thus, virtual schools need to work harder to create a sense of community and engagement.

• Increased Screen-Time – It is a well-known fact that more screen time leads to several ailments such as eyestrain, dry eyes, poor posture, or headaches. Besides this, an increased amount of screen-time also means easier access to virtual distractions such as social media, video games, and other entertainment.

• Technical Issues– Internet connection issues is the leading cause of disruption in online learning. When this happens too often, students start to lose interest and the virtual class begins to feel like a waste of time. Initially, online learning also required the downloading of applications, and systems were not equipped to handle that. Fortunately, as technology advances and more platforms are developed, these problems become a smaller issue.

• Additional Training for Instructors– The shift from offline to online classes was messy, largely due to the inexperience of the teachers and students with online learning platforms. Thus, additional training for the instructors is needed, causing higher expenses.

The three most important factors of accessibility, affordability, and quality, provided by virtual schools constitute the foundation on which the future of Indian education depends. With the help of these schools, the educational system of the country is progressing

steadily to realise the dream of Digital India. Parents from smaller towns feel that online schools are a better option for their children, as it allows them to learn under better qualified and trained teachers, who are not always available in these towns. Many online schools also have several international Indian students as their parents say that it would be easier for them to adjust to the Indian curriculum once they return. The improvements in communication technology are addressing the concerns being brought up about virtual schools, and the advantages are proving to be more than the disadvantages.

**References:**


1. virtual.nios.ac.in
2. dsel.education.gov.in
3. www.nios.ac.in
4. www.education.gov.in
5. www.aiplusinfo.com
6. www.ecpi.edu
7. www.edweek.org
8. www.pib.gov.in
9. www.wikipedia.org
10. www.vikaspedia.in




# Holistic and Multidisciplinary Education

**Bhor Ekta Navnath** (S.Y. B.Ed)

India has a long tradition of holistic and multidisciplinary learning, from universities such as Takshashila and Nalanda, to the extensive literatures of India combining subjects across fields. A holistic education paves way for entry into the student's choice of professional, vocational and technical disciplines. The choice-based subjects in the school curriculum provide for in-depth learning for the students and also develop a well-rounded personality.

Such type of education system was advocated by scholars like Kautilya, Banabhatta, Plato and Aristotle among many others.

Ancient Indian literary works such as Banabhatta's Kadambari described a good education as knowledge of the 64 Kalaas(types of arts) and among these 64 arts were not only subjects included like singing, dancing, crafting and painting, but also scientific fields like physics, chemistry, biology and mathematics, vocational fields like carpentry, carving, making of artifacts and clothes-making, professional fields like accounting, medicine and engineering, as well as 'soft skills' such as communication, discussion, and debate. The very idea that all branches of creative human endeavour, including mathematics, science, vocational subjects, professional subjects, and soft skills should be considered 'arts', has distinctly Indian origins. This notion of a 'knowledge of many arts' or what in modern times is often called the 'liberal arts' (i.e., a liberal notion of the arts) must be brought back to Indian education, as it is exactly the kind of education that will be required for the 21st century.

**What is Holistic and Multidisciplinary Education?**

A multidisciplinary and holistic learning is an integral education model that will relax the discipline boundaries for learning and make the system flexible enough for students to learn sciences, mathematics with humanities, languages, social sciences, professional skills, soft skills, ethics, morality, human values etc. in combination according to their needs and interests with the aim towards integrated competencies development including intellectual, aesthetic, social, physical, emotional, and moral. With such approach a student is no longer required to be confused on: Whether he can learn Mathematics and Psychology together. Now the answer lies in his interest only. If he wants to learn, he can not only learn but can choose an appropriate career option for him as well.

It is imperative for Higher Education Institutes to inculcate 21st century skills in the learners that comprises active learning, out-of-box thinking, critical thinking, effective communication, collaboration, technological skills and life skills in various fields, and a comprehensive education system is the path of the skills development.

In Today's world of technology and globalization, skills play more important role in real-life than mere knowledge.

Multidisciplinary and Holistic Approach in Higher Education aims to develop following skills and over-all personality building in the youth:

**Critical ability:**
With multiple discipline knowledge, a student will become able to think beyond the horizon of single discipline and can think about the logical connections between different ideas.

**Self-governance:** With the choice of their own subjects, students will become able to set their priorities and knowledge landscape for a disciplined learning.

**Problem Solving:** Quick and Effective solution to a problem, is the skill that the employers searching in the current time. The knowledge of different subjects in multidisciplinary approach will develop the logical and analysis skills in students to handle difficult situations.

**Communication:**
Knowledge is the confidence, and an effective communication is the result of wide knowledge. With multidisciplinary and holistic learning students will be able to share ideas, express their feelings and contribute to national progress.

As per NEP-2020 there have to be no hard separations between arts and sciences, between curricular and extra-curricular activities, between vocational and academic streams. In order to eliminate pointless hierarchies among disciplines and dismantle silos between different areas of learning, NEP-2020 promotes multi-disciplinary and holistic education with a broader aim to foster unity and integrity of knowledge besides duly recognizing, identifying and nurturing the unique capabilities of every student, by sensitizing teachers as well as parents to promote each student's holistic development in both academic and non-academic domains.

**Conclusion:**
So far as National Education Policy 2020 is concern, it can be said that before stepping forward in this direction government has not only to find the answer to the above questions but also ensure protective measures for the welfare of the students in particular and the educational system as a whole. While the document proposes all the right moves to reform education, it does not have a legal status. To execute the provisions in their true spirit the government will need iron will, fund facility, infrastructure (particularly in rural areas, in case of providing vocational skills at school level), regulatory mechanisms, grievance redress cells, professionally trained teachers and so on. It is also needs to be taken into account that this step towards holistic education does not lead to the commercialization of education as there is a lack of appropriate infrastructure to provide practical education in government

institutions and private players can take advantage of this.

**References:**


1) International Bureau of Education-UNESCO. The Global Centre of Excellence in Curriculum and related matters, 5, Routedes Morillons, 1218 Le GrandSaconnex, Geneva, Switzerland. Le Grand-Saconnex, Geneva, Switzerland. 2021. Available from: http://www.ibe.unesco.org/en.

2) Dochshanov MA, Tramonti M, Tramonti L. Multidisciplinary Strategies in Education. International Conference -Future of Education EU-Track Association,Italy. 2019. Available from: https://www.academia.edu/39871582/The_Future_of_Education_Conference_Proceedings_2019.

3) Gavhane S. India's New Education Policy 2020. A Critical Appraisal, MGM University Aurangabad, India. 2020. Available from: https://mgmu.ac.in/wp-content/uploads/NEP-Indias-New-Education-Policy_2020-final.pdf

4) https://www.indjst.org/

5)https://www.academics4nation.org/post/nep-2020-towards-a-holistic-and-multidisciplinary-approach-to-education



# National Education Policy- 2020 and Reforms in Curriculum Design and Development

**Belhekar Sonakshi Sunil** (Second Year, B.Ed)

The National Policy on Education was framed in 1986 and modified in 1992. Since also several changes have taken place that calls for a modification of the Policy. The NEP 2020 is the first education policy of the 21st century and replaces the thirty-four year old National Policy on Education (NPE), 1986. Based on the foundational pillars of Access, Equity, Quality, Affordability and Responsibility, this policy is aligned to the 2030 docket for Sustainable Development and aims to transform India into a vibrant knowledge society and global knowledge superpower by making both academy and council education more holistic, flexible, multidisciplinary, suited to 21st century requirements and aimed at bringing out the unique capabilities of each pupil.

Ensuring Universal Access at all situations of academy education

NEP 2020 emphasizes on icing universal access to academy education at all situations- pre academy to secondary. Structure support, innovative education centres to bring back dropouts into the mainstream, shadowing of scholars and their literacy situations, easing multiple pathways to learning involving both formal and non-formal education modes, association of counselors or well- trained social workers with seminaries, open literacy for classes,5 and 8 through NIOS and State Open Schools, secondary education programs original to Grades 10 and 12, vocational courses, adult knowledge and life- enrichment programs are some of the proposed ways for achieving this. About 2 crore out of academy children will be brought back into main sluice under NEP 2020.

Early Childhood Care & Education with new Curricular and Pedagogical Structure

With emphasis on Early Childhood Care and Education, the 10+2 structure of academy classes is to be replaced by a 5+3+3+4 curricular structure corresponding to periods 3- 8, 8- 11, 11- 14, and 14- 18 years respectively. This will bring the uncovered age group of 3- 6 years under academy class, which has been recognised globally as the pivotal stage for development of internal faculties of a child. The new system will have 12 years of training with three years of Anganwadi/ pre training.

NCERT will develop a National Curricular and Pedagogical Framework for Early Childhood Care and Education( NCPFECCE) for children up to the age of 8. ECCE will be delivered through a significantly expanded and strengthened system of institutions including Anganwadis and pre-schools that will have preceptors and Anganwadi workers trained in the ECCE pedagogy and class. The planning and perpetration of ECCE will be carried out concertedly by the Ministries of HRD, Women and Child Development( WCD), Health and Family Welfare( HFW), and Tribal Affairs.

The academy classes and pedagogy will aim for holistic

development of learners by equipping them with the crucial 21st century chops, reduction in curricular content to enhance essential literacy and critical thinking and lesser focus on existential literacy. Scholars will have increased in flexibility and choice of subjects. There will be no rigid separations between trades and lores, between curricular and extra-curricular conditioning, between vocational and academic aqueducts.

The NEP is well-suited to bolstering our education system and transforming India into a global education hub. I think it is about time that school leaders across the country embrace the digital aspect of learning and use it to optimize the in-class and at-home learning experience. I believe that these steps will help transform India into an active learning nation by making both school and college education more comprehensive, adaptable, and flexible. The National Education Policy is a guiding path to bring advancement in the learning landscape, by making education holistic, and further developing a solid foundation for the Atmanirbhar Bharat Mission. The pandemic created an urgent need for Indian educators to constantly upskill themselves in order to stay relevant. Hence, bringing integrated programmes such as NISHTHA 2.0 for teacher training which have been designed by the NCERT, will protect teachers from becoming obsolete and will help make the education industry more accessible for teachers, aiding in their overall development." It would be ideal for SAFAL too (Structured Assessment For Analyzing Learning Levels), a competency-based assessment framework for Grades 3, 5 and 8 in CBSE schools, to be extended to pre-primary classes to formalize and strengthen foundational learning. These assessments should, of course, be focused on making sure the child is gaining access to the right resources rather than from the angle of performance pressure.

"The National Education Policy 2020, introduced with the purpose of bringing about path-breaking reforms in the Indian education system, is a blueprint for an 'Aatmanirbhar India'. It is poised to create opportunities for multidisciplinary and holistic learning environment and make education accessible for all. The emphasis now, should be on the effective implementation of the new education policy which will provide a strong foundation for our students to transform themselves, earn competitiveness of global standards and enhance their future prospects. In the current scenario, where we need to focus on is in the seamless integration of technology with Higher Education which will foster innovation in learning. Moreover, NEP provides ample scope for experiential learning. This is critical for 360-degree development of students and should be actively encouraged. I am optimistic on NEP and the profound impact it can have on

Indian education. While the aspects connected to social- emotional skills find mention in the NEP for the first time and indeed was a great opportunity for us to address adverse childhood experience plaguing over 160 million poor children of India, with the disruption that we have seen with COVID 19, it is urgent for the NEP to recognise and build an educational ecosystem that firstly addresses the trauma that our young children have suffered in the last 2 years or so, then moves away from traditional concepts of success, to truly work on ways to ensure thriving of children.



## स्त्री आणि समाज

**प्रा. योगिता आढळराव शैलेश**

आता मनाशी ठरवा पक्क, शिक्षण हा मुलींचाही हक्क
मुलगा मुलगी दोघे समान, दोघांनाही शिकवू छान
मुलींचे शिक्षण, स्त्रीशक्तीचे विकसन
बंधनाची भिंत फोडू, अज्ञानाचा अंत करु.
शिक्षण घेऊन होऊ विचारी, घेऊ आम्ही उंच भरारी
घडविण्या राष्ट्राचा विकास, मुलींच्या शिक्षणा हवा ध्यास
कळी उमलणार नाही जीवन रसावाचून, मुली बहरणार नाही शिक्षणावाचून
शिक्षण करा रे धारण सर्व सिध्दीचे कारण
सोडून द्या वाईट चालीरिती, आता सर्वांच्या शिक्षणाला देऊया गती
मोळी विका पण, शाळा शिका
जन्म दिला मातेने, पालन केले पित्याने, उध्दार झाला शिक्षणाने

## साक्षरतेच्या वर्गाला

**देवडे मोनिका प्रभाकर** बी.एड्.द्वितीय वर्ष

एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ, दहा, अकरा, बारा,
चला आता उशिर नको जाऊ या साक्षरतेच्या वर्गाला हाताशी पाटी घेऊनी।
त्यावरी बाराखडी लिहून साक्षर करु भारताला।
अज्ञानाच्या अंधारातून ज्योत लावू,
ज्योत लावू ज्ञानाची आता चला ज्योत लावू
एक दोन तीन चार..... ।।१।।
हुंडाबळीला आळा घालूनी।।
अंधश्रध्दा दूर करोनी मुक्त करुया भारताला।।
जादू टोण्याच्या नादातून वाट चालू वाट चालू विज्ञानाची चला आता वाट चालू।।
एक दोन तीन चार..... ।।२।।
एकात्मतेचा संदेश घेऊन।
हिंदू–मुस्लीम एक होऊनी दूर करु या झगड्याला।
विद्योही रक्तपातातूनी नाश करु,
नाश करु विद्रोहीचा आता नाश करु, बिमोड करु।।
एक दोन तीन चार..... ।।३।।

देश धरम पर मिटने वाला शेर शिवा का छावा था,
महापराक्रमी परमप्रतापी एक ही शंभू राजा था !!



रेखाटन : मोरडे प्रतिक्षा बाबाजी

# – अहवाल विभाग –



| अ.क्र. | अहवाल नाव | विभागप्रमुखाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | ॲकॅडमिक कॅलेंडर २०२१–२२ | डॉ. संजय चौधरी | ७६ |
| २ | सूक्ष्म अध्यापन विभाग | प्रा. विजया आढळराव<br>प्रा. योगिता आढळराव | ७६ |
| ३ | सरावपाठ विभाग | प्रा. विजया आढळराव<br>प्रा. तेजस्वी फदाले | ७७ |
| ४ | छात्रसेवाकाल विभाग | प्रा. योगिता आढळराव<br>प्रा. यमुना यरोळकर | ७७ |
| ५ | परीक्षा विभाग | प्रा. तेजस्वी फदाले | ७८ |
| ६ | विद्यार्थी विकास मंडळ | प्रा. शामल चौधरी | ७९ |
| ७ | सांस्कृतिक विभाग | प्रा. योगिता आढळराव | ८२ |
| ८ | आरोग्य शिक्षण व योग | प्रा. तेजस्वी फदाले | ८२ |
| ९ | प्रसिध्दी विभाग | प्रा. शामल चौधरी | ८२ |
| १० | ग्रंथालय विभाग | प्रा. अनिकेत गायकवाड | ८३ |
| ११ | प्रयोगशाळा विभाग | प्रा. तेजस्वी फदाले<br>प्रा. विजया आढळराव | ८३ |
| १२ | प्लेसमेंट सेल | प्रा. तेजस्वी फदाले | ८४ |
| १३ | समुपदेशन समिती | प्रा. विजया आढळराव<br>प्रा. योगिता आढळराव | ८४ |
| १४ | अंतर्गत गुणवत्ता सुधार समिती | प्रा. तेजस्वी फदाले | ८५ |
| १५ | भित्तीपत्रक | प्रा. यमुना यरोळकर<br>प्रा. योगिता आढळराव | ८५ |
| १६ | महिला तक्रार निर्मुलन समिती | प्रा. शामल चौधरी | ८६ |
| १७ | शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम | प्रा. तेजस्वी फदाले | ८७ |
| १८ | शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची माहिती | | ८८ |





## ॲकॅडमिक कॅलेंडर २०२२-२३

**डॉ. चौधरी संजय श्रीरंग**

बी. एड्. कोर्स अंतर्गत विविध तात्विक व प्रात्यक्षिक कार्यक्रमांचा समावेश असतो. एक वर्षाच्या कालावधीचा विचार करता बी.एड्. प्रथम वर्ष व व्दितीय वर्षाच्या सर्व उपक्रमांचा आराखडा तयार करावा लागतो त्या आराखडयास शैक्षणिक किंवा ॲकॅडमिक कॅलेंडर असे म्हणतात.

श्री भीमाशंकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये बी.एड्. प्रथम वर्ष १४ फेब्रुवारी २०२२ व व्दितीय वर्ष २० सप्टेंबर, २०२१ पासून सुरु झाले. शैक्षणिक आराखडयामुळे आपण वर्षभरामध्ये तात्विक भागाचे नियोजन कसे करणार आहोत, तसेच प्रात्यक्षिक भागाचे नियोजन कसे करणार आहोत याचा अंदाज बांधता येतो. बी.एड्. कोर्स हा शिक्षक प्रशिक्षणाचा भाग आहे व या प्रशिक्षणात प्रात्यक्षिकावर विशेष भर दिलेला असतो. शैक्षणिक आराखडयामुळे प्रशिक्षणाच्या नियोजना बाबत योग्य कार्यवाही करणे सोपे जाते. तसेच सर्व कामाच्या नियोजनाचा व कार्यवाहीचा संभाव्य आराखडा आपल्या समोर राहतो. शैक्षणिक आराखडयामुळे प्रत्येक कोर्स प्रमुखास व विभागप्रमुखास त्यांच्या त्यांच्या कोर्स व विभागाचे वर्षभराचे नियोजन करता येते व बी.एड्. प्रशिक्षणार्थ्यांच्या मार्फत त्यांची योग्य कार्यवाही करता येते.

अशा प्रकारे शैक्षणिक वर्ष २०२१ –२२ मध्ये संपूर्ण शैक्षणिक वर्षातील तात्विक व प्रात्यक्षिक कामाची रुपरेषा तयार करुन ती यशस्वीरित्या पूर्ण करता आली.

## सूक्ष्म अध्यापन विभाग

**प्रा.आढळराव विजया प्रदिप व प्रा.आढळराव योगिता शैलेश**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बी.एड. अभ्यासक्रम अंतर्गत विविध अध्यापन पाठ घेण्यात येतात. यामध्ये सूक्ष्म अध्यापनाने सुरूवात होते, म्हणूनच सूक्ष्म अध्यापन हा अध्यापन पाठाचा गाभा/आत्मा आहे.

सूक्ष्म अध्यापन विभागामध्ये बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांनी विविध अध्यापन कौशल्य यशस्वीरित्या पूर्ण केली. यामध्ये प्रामुख्याने प्रस्तावना, फलक लेखन, स्पष्टीकरण, कथन/दिग्दर्शन, प्रश्न कौशल्य, चेतकबदल या ५ मिनीटांच्या कौशल्याचे अध्यापन व पुनराध्यापन केले.

त्यानंतर सेतूपाठ घेतले. सेतूपाठांमध्ये सर्व अध्यापन कौशल्यांची गुंफण असते. असे १५ मि.चे. सेतूपाठ सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी यशस्वीरित्या घेतले. सेतूपाठानंतर अभिरूप पाठ घेतले. अभिरूपता म्हणजे कृत्रिमरित्या घडून आणलेली हुबेहुब वाटणारी घटना. असे ३० मि.चे अभिरूप पाठ बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले.

सदर विभागाचा कालावधी हा २१/०२/२२ ते ०७/०३/२२ पर्यंत सूक्ष्म अध्यापन कौशल्ये तसेच ०९/०३/२२ ते १४/०३/२२ पर्यंत सेतूपाठ व १६/०३/२२ ते १९/०३/२२ या कालावधीत अभिरूप पाठ घेतले.

तसेच प्रशिक्षणार्थ्यांना विविध पाठांचा अनुभव यावा, यासाठी ३० मिनिटांचे ६ विविध पाठ घेण्यात आले. प्रशिक्षणार्थींनी तंत्रज्ञानावर आधारित पाठ, सांघिक व विविध प्रतिमानांचे पाठ यशस्वीरित्या पूर्ण केले.

## सरावपाठ विभाग

**प्रा.फदाले तेजस्वी यशवंत व प्रा.आढळराव विजया प्रदिप**

बी.एड्.अभ्यासक्रमातील प्रात्याक्षिकाचा गाभा म्हणजे सरावपाठ होय. बी.एड. प्रथम वर्ष अभ्यासक्रमात प्रत्येक विद्यार्थ्यास प्रत्येक अध्यापन पद्धतीचे ०३ सरावपाठ असे एकूण ०६ सरावपाठ परिसरातील उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये घ्यावे लागतात. त्याचप्रमाणे बी.एड्. द्वितीय वर्ष अभ्यासक्रमात प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास प्रत्येक अध्यापन पद्धतीचे ०२ असे एकूण ०६ सरावपाठ परिसरातील उच्च प्राथमिक, माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये घ्यावे लागतात. सदर सरावपाठ बी.एड्. प्रशिक्षणार्थ्यांनी खालील माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने पार पाडले.

**श्री शिवाजीराव दत्तात्रय आढळराव पाटील विद्यालय,** लांडेवाडी

**संत ज्ञानेश्वर विद्यालय,** चास

**श्री मुक्तादेवी विद्यालय,** नारोडी

**न्यू इंग्लिश स्कूल,** लांडेवाडी

**डेक्कन मराठा कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड सायन्स,** लांडेवाडी

## छात्रसेवाकाल विभाग

**प्रा.आढळराव योगिता शैलेश व प्रा.यरोळकर यमुना शिवाजी**

बी.एड्.अभ्यासक्रमातील अत्यंत महत्वाचा विभाग म्हणजे छात्रसेवाकाळ विभाग होय. बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांना शालेय वातावरणात प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव हा छात्रसेवाकाळात मिळत असतो. बी.एड. प्रथम वर्षातील प्रशिक्षणार्थ्यांनी दिनांक ११ जुलै २०२२ ते ६ ऑगस्ट २०२२ या कालावधीत पाठ टाचण निर्मिती, छात्रसेवाकाळ प्रत्यक्ष पाठ, अनुभवी शिक्षक पाठ निरीक्षण, सहशालेय उपक्रम त्याचप्रमाणे शालेय शिक्षक सहाय्यक कार्य हे उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले.

बी.एड्. द्वितीय वर्ष प्रशिक्षणार्थ्यांनी दिनांक २२ नोव्हें. २०२१ ते १२ मार्च २०२२ या कालावधीत गट अध्यापन, मूल्यमापन, घटक नियोजन, शालेय नोंदी, सहशालेय उपक्रम, इतर शालेय उपक्रम, विद्यार्थी शिक्षक पाठ निरीक्षण हे उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले. हा छात्रसेवाकाळ परिसरातील खालील विद्यालयांमध्ये यशस्वीरित्या पूर्ण झाला.

**श्री. शिवाजीराव दत्तात्रय आढळराव पाटील विद्यालय,** लांडेवाडी

**श्री मुक्तादेवी विद्यालय,** नारोडी

**संत ज्ञानेश्वर विद्यालय,** चास

**न्यू इंग्लिश स्कूल,** लांडेवाडी

**भीमाशंकर विद्या मंदिर,** शिनोली

## परीक्षा विभाग

**प्रा.फदाले तेजस्वी यशवंत**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बी.एड् अभ्यासक्रमातील बी.एड्. प्रथम वर्ष व द्वितीय वर्षाच्या अंतर्गत मूल्यमापनातील व अभ्यासक्रमातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे वर्षभरात घेतल्या जाणाऱ्या परीक्षा होय.

*** बी.एड्. द्वितीय वर्ष ***

बी.एड्. द्वितीय वर्षाच्या कोर्स २०१ ते २०५ या कोर्ससाठी

**उपक्रम – २** मध्ये MCQ परीक्षा, Tutorial परीक्षा ह्या परीक्षांचा भाग आहे. या विविध परीक्षा अंतर्गत कोर्स २०३ व कोर्स २०४ साठी MCQ परीक्षा १६ जानेवारी २०२२ रोजी पार पडली तर कोर्स २०५ मराठी, इंग्रजी, जीवशास्त्र, कॉमर्स, अर्थशास्त्र, भूगोल, या अध्यापन पद्धतींसाठी Tutorial परीक्षा १९ जानेवारी २०२२ रोजी पार पडली.

उपक्रम ३ अंतर्गत लेखी परीक्षा घेण्यात आली. विद्यापीठाच्या अंतिम परीक्षेच्या धर्तीवरच अंतर्गत लेखी परीक्षा दिनांक २८ मार्च २०२२ ते १ एप्रिल २०२२ या कालावधीत २०१ ते २०५ या कोर्ससाठी संपन्न झाली.

**अंतिम विद्यापीठ परीक्षा –** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची बी.एड्. द्वितीय वर्षाची अंतिम लेखी परीक्षा दिनांक २७ जून २०२२ ते ११ जुलै २०२२ या कालावधीत संपन्न झाली.

*** बी.एड्. प्रथम वर्ष ***

बी.एड्. प्रथम वर्षाच्या कोर्स १०१ ते १०७ साठी

**उपक्रम – २** मध्ये MCQ परीक्षा, Tutorial परीक्षा, या परीक्षांचा भाग समाविष्ट करण्यात आला आहे. या परीक्षा अंतर्गत कोर्स १०१ साठी MCQ परीक्षा ११ जुन २०२२, कोर्स १०३ साठी MCQ परीक्षा १८ जुन २०२२ रोजी राबविण्यात आली.

**उपक्रम – ३** अंतर्गत लेखी परीक्षा घेण्यात आली. विद्यापीठाच्या अंतिम परीक्षेच्या धर्तीवरच अंतर्गत लेखी परीक्षा ही दिनांक ८ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट २०२२ या कालावधीत कोर्स १०१ ते १०७ ची संपन्न झाली.

**अंतिम विद्यापीठ परीक्षा –** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची बी.एड्. प्रथम वर्ष अंतिम परीक्षा दि. ०८सप्टेंबर २०२२ ते १६ सप्टेंबर २०२२ या कालावधीत संपन्न झाली.

# विद्यार्थी विकास मंडळ

**प्रा.चौधरी शामल संजय**

'ज्ञानाचे माहेर घर' समजल्या जाणाऱ्या पुणे जिल्हयातील सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाच्या कक्षेत येणारे पुण्यापासून ६५ कि.मी. अंतरावर असलेले आंबेगाव तालुक्यातील लांडेवाडी, हे गाव खासदार मा. श्री शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या शिक्षण विषयक आस्थेतून ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना आधुनिक व अद्ययावत शिक्षण मिळावे या विचारांनी श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाची श्री. शिवाजीराव आढळराव पाटील माध्यमिक विदयालयाच्या माध्यमातून झाली. एखादया रोपटयाचे वृक्षात परिवर्तन व्हावे त्याप्रमाणे संस्थेच्या ब्ल्यू बेल प्रायमरी स्कूल, न्यू इंग्लिश स्कूल, बी.एड्., एम.बी.ए., डेक्कन मराठा ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड सायन्स अशा शाखा वाढतच गेल्या.

सन २००८ – ०९ मध्ये श्री भीमाशंकर शिक्षणशास्त्र महाविदयालयाची स्थापना झाल्यापासून आजतागायत विविध क्षेत्रात शैक्षणिक व सामाजिक नावलौकिक मिळवले आहे. उत्कृष्ठ निकालाची परंपरा अबाधित राखून गुणवत्तेला प्राध्यान्य दिले जात आहे. विदयार्थी समाजात स्वयंपूर्ण बनूनच पाय ठेवतील यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहेत म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाच्या विदयार्थी कल्याण मंडळाची **'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना', 'निर्भय कन्या अभियान योजना',** 'विशेष मार्गदर्शन योजना' यशस्वीपणे राबविल्या जात आहेत.

**निर्भय कन्या अभियान योजना :**

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ च्या सुरुवातीला निर्भयकन्या अभियान योजनेच्या मान्यतेसाठी संचालक, विदयार्थी विकास मंडळ यांच्याकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर दि. २८ जानेवारी, २०२१ रोजी विदयार्थी विकास मंडळाकडून सदर योजनेस मंजुरी देण्यात आली.

**उपक्रम १ – हिमोग्लोबीन तपासणी शिबीर**

**प्रथम सत्र –**

दि. ०९ जुलै, २०२२ रोजी सकाळी ९.०० ते १०.०० वा. प्रथम सत्र सुरु झाले या सत्रात बी.एड्. प्रथम व व्दितीय वर्षाच्या ६५ विदयार्थ्यांची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. मंचर येथील श्री साई पॅथॉलॉजी लॅब च्या सहकार्याने श्री सचिन पारधी व श्री. निखील पिंगळे या लॅब असिस्टंट यांच्या मदतीने ६५ विदयार्थ्यांची हिमोग्लोबीन तपासणी करण्यात आली. प्रत्येक विदयार्थ्यांस चहा व नाष्टयाची सोय करण्यात आली होती.

**व्दितीय सत्र – हिमोग्लोबीन व अहार**

दुपारी २.०० ते ५.०० वा. दुसऱ्या सत्रास सुरुवात झाली. या सत्रात मंचर येथील प्रांजल हॉस्पिटलच्या संचालक स्त्री रोग तज्ञ डॉ. सीमा खिवंसरा यांचे हिमोग्लोबीन व आरोग्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनात हिमोग्लोबीन हा रक्तातील सर्वात महत्वाचा घटक आहे. व हिमोग्लोबीनच्या कमतरतेमुळे थकवा येणे, शरीरातील लोहाचे प्रमाण कमी होते व अशक्तपणा येतो. त्याचबरोबर हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविण्यासाठी आहारात कोणते पदार्थ समाविष्ठ करावे व कोणते अन्नपदार्थ टाळावे याचे सखोल मार्गदर्शन केले. त्याचबराबर विदयार्थ्यांच्या अनेक प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली व मार्गदर्शन केले.

**उपक्रम २ – मानसिक व भावनिक आरोग्यासाठी भावनिक विकासातून निर्भयता:**

निर्भय कन्या अभियानांतर्गत दिनांक २६

फेब्रुवारी, २०२२ रोजी सकाळी १०.३० ते १२.३० या वेळेत विदयार्थीनीना मानसिक व भावनिक दृष्टया सक्षम करण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी पुणे येथील मानशास्त्रज्ञ श्रीमती फरनाज सय्यद या उपस्थित होत्या. त्यांनी सध्याचे युग हे ताणतणावाचे युग आहे. कोणत्याही छोटया गोष्टीचा ताण घेवून आजची पिढी आपले मानसिक व भावनिक आरोग्य ढासळून घेते. ताणाचे व्यवस्थापनाने आयुष्य अधिक सकारात्मक दृष्टीकोनातून जगता येते त्यामुळे मानसिक व भावनिक विकास ही काळाचीगरज बनली आहे. असे मत त्यांनी व्यक्त केल.


**उपक्रम ३ – कराटे विषयक मार्गदर्शन व्र प्रशिक्षण –**

निर्भया अभियान अंतर्गत शनिवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२२ रोजी व्दितीय सत्र दुपारी ०२.००ते ३.०० या वेळेत विदयार्थीनीना शारिरीक दृष्टया सक्षम करण्यासाठी तसेच स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षणाचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिकासाठी मंचर येथील 'ब्लॅक बेल्ट' धारक श्री जयेश थोरात यांना निमंत्रित करण्यात आले होते. या एकदिवसीय प्रशिक्षणातून विदयार्थ्यीनी लगेचच कराटे तज्ञ होणार नाहीत मात्र दैनंदिन व्यवहार करताना त्या निश्चितच निर्भय होऊन काम करतील. थोडक्यात निर्भय कन्या अभियान अंतर्गत राबविलेल्या सदर उपक्रमांचा विदयार्थीनींना निश्चितच फायदा होईल.

**उपक्रम ४ – विशेष मार्गदर्शन योजना –**

शिक्षण पध्दतीमध्ये सर्वसाधारण शैक्षणिक अभ्यासक्रमाचे अविभाज्य अंग असले तरी, खास अभ्यासाचे क्षेत्र म्हणून काही विषय निवडावे लागतात. अशा विषयांच्या सखोल उध्ययनासाठी काही प्रमाणात सरावाची आवश्यकता असते. जे विदयार्थी विषय कठीण वाटतो म्हणून त्या विषयाच्या अभ्यासात मागे राहतात, अशा विदयार्थ्यांच्या शिक्षणाच्या संगोपांग विकासाकरीता, शिक्षण पध्दतीला आधारभूत असलेल्या विशेष मार्गदर्शनाची गरज असते. अशा विदयार्थ्यांना सहाय्यभूत ठरु शकेल अशी विशेष मार्गदर्शन योजजना विदयापीठाने सुरु केली व श्री भीमाशंकर शिक्षणशास्त्र महाविदयालयाने शैक्षणिक वर्ष २०२१ –२२ मध्ये तीचे यशस्वीरित्या आयोजन केले.

सदर उपक्रमांतर्गत ३० वेगवेगळया विषयावर ३० तज्ञ मार्गदर्शकांच्या व्याख्यानाचे आयोजन महाविदयालयात वर्षभर करण्यात आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने मुलाखत तंत्र, योग प्रशिक्षण व सैध्दांतिक माहिती, ( जीवन कौशल्य), वाचन आणि आशयाव्दारे परामर्श उदयोजकता विकास यातील भेद, माराठी भाषा सद्यस्थिती व तिचा दर्जा, इंग्रजी संभाषण कौशल्य या विषयांवर मार्गदर्शन करुन हा उपक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.



## सांस्कृतिक विभाग

**प्रा.आढळराव योगिता शैलेश**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत बी.एड. अभ्यासक्रमात सहशालेय उपक्रमांना अतिशय महत्व आहे. सहशालेय उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देऊन व्यक्तिमत्व विकास साधला जातो. शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये प्रामुख्याने गणेशोत्सव, नवरात्रौत्सव, दिवाळी उत्सव, सावित्रीबाई फुले जयंती, युवा दिन, मराठी दिन, विज्ञान दिन, महात्मा फुले जयंती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, जागतिक पर्यावरण दिन, राजर्षी शाहू महाराज जयंती इ. कार्यक्रम महाविद्यालयात साजरे करण्यात आले.

## आरोग्य, शिक्षण व योग

**प्रा.फदाले तेजस्वी यशवंत**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत बी.एड्. अभ्यासक्रमात आरोग्य शिबीराचे आयोजन केले जाते. आरोग्य शिक्षण व योग विभागअंतर्गत छात्रशिक्षकांना आरोग्यपूर्ण जीवशैलीचा अंगीकार करावा याचे प्रात्यक्षिकांद्वारे सहज आकलन होते.

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये महाविद्यालयामध्ये नियोजनाप्रमाणे सर्व व्यायाम प्रकार सुर्यनमस्कार, प्राणायाम त्याचबरोबर क्रिडा स्पर्धा ही घेण्यात आल्या.

क्रिडा स्पर्धेमध्ये कबड्डी, व्हॉलीबॉल, धावणे, क्रिकेट, थाळीफेक, गोळाफेक अशा वेगवेगळ्या स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच दिनांक १३ ऑगस्ट २०२२ रोजी आरोग्य शिक्षण व योग या विषयांची लेखी परीक्षा घेण्यात आली.

अशा प्रकारे संबंधित विभागातील विविध उपक्रम, प्रात्यक्षिके यशस्वीपणे पार पडले.

## प्रसिध्दी विभाग

**प्रा.चौधरी शामल संजय**

महाविद्यालयात वर्षभर शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत अनेक उपक्रम राबविले जातात. जसे शिक्षक दिन, गणेशोत्सव, रासदांडिया, व भोंडला, हिंदी दिन, मराठी दिन, विज्ञान दिन, समाजसेवा, वृक्षारोपण, सांस्कृतिक कलामहोत्सव इ.

शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये महाविद्यालयात शिक्षक दिन, रासदांडिया, गणेशोत्सव, छात्रसेवाकाल, समाजसेवा शिबीर, मराठी दिन, हिंदी दिन, आरोग्य शिबीर, पदवी ग्रहण समारंभ इ. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या विविध उपक्रमांची प्रसिद्धी समाज माध्यमातून व वर्तमानपत्रांमध्ये वेळोवेळी करण्यात आली. जसे लोकसत्ता, लोकमत, सकाळ, पुढारी, प्रभात, इ. वर्तमान पत्रांमध्ये वरील उपक्रमांस प्रसिद्धी देवून महाविद्यालयाच्या समाज उपक्रमांचा लेखाजोखा समाजापर्यंत पोहचवला.

# ग्रंथालय विभाग

**गायकवाड अनिकेत हेमंत**

श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री भीमाशंकर बी.एड् कॉलेज २००८ साली संस्थेचे संस्थापक मा.खासदार श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी लांडेवाडी या गावात सुरू केले. सुरूवातीपासूनच ग्रंथालयात वेगवेगळ्या विषयांवरील वाचनसाहित्य घेण्यास सुरूवात झाली. यात आत्मचरित्रे, कादंबऱ्या, कथा, ललितलेख तसेच बी.एड्. अभ्यासक्रमाशी संबंधित क्रमिक तसेच संदर्भ पुस्तके आहे. आत्तापर्यंत जवळपास ७५०० पुस्तके ग्रंथालयात असून त्याचा वापर कॉलेजचे प्राध्यापक, छात्राध्यापक यांच्याकडून होत आहे. पुस्तकांबरोबरच ग्रंथालयात नियतकालिके, वर्तमानपत्रे, नकाशे, सी.डी., भौमितिक साधने उपलब्ध आहेत.

ग्रंथालयात विद्यार्थ्यांना मुक्तद्वार (Open Acess) पद्धती देण्यात आली. त्यामुळे कपाटात जाऊन हवं ते पुस्तक वापरकर्ते वाचण्यासाठी घेऊ शकतात. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील वर्तमानपत्रे ग्रंथालयात आहेत. ग्रंथालयाचा वाचनकक्ष हवेशीर आणि प्रकाशमय असा असून कृत्रिम प्रकाशाचीही व्यवस्था आहे. वाचन कक्षामध्ये एकावेळी साधारण १०० जण बसून वाचन करू शकतील एवढी क्षमता आहे. तसेच संस्थेचे कर्मचारी व इतर विभागाचे शिक्षक व कर्मचारी सभासद आहेत.

# प्रयोगशाळा

**प्रा.फदाले तेजस्वी यशवंत व प्रा.आढळराव विजया प्रदिप**

श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे, श्री भीमाशंकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विविध प्रयोगशाळा आहेत. यामध्ये मानसशास्त्र प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा अशा विविध प्रयोगशाळा आहेत.

**मानसशास्त्र प्रयोगशाळा**

मानसशास्त्र प्रयोगशाळेत विविध मानसशास्त्रीय चाचण्यांची साधने उपलब्ध आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ मध्ये अध्ययन, अवधान, मानसिक कार्य व थकवा हे मानसशास्त्रीय प्रयोग घेण्यात आले. मानसशास्त्रीय चाचण्यांद्वारे विद्यार्थ्यांना सखोल ज्ञान दिले गेले.

**विज्ञान प्रयोगशाळा**

विज्ञान प्रयोगशाळेत शैक्षणिक प्रयोगा संबंधी विविध उपकरणे आहेत. विज्ञान प्रयोगशाळेचा वापर हा विद्यार्थ्यांना सूक्ष्मअध्यापन, सरावपाठ संदर्भात पाठ घेण्यासाठी करण्यात आला. त्याचबरोबर बी.एड् च्या प्रशिक्षणार्थ्यांना, प्रयोगशाळेसंदर्भात, चिकित्सक माहिती मिळवून अभिरूची वाढवण्यासाठी मदत झाली. या प्रयोगशाळेमधून प्रथम व द्वितीय वर्षातील बी.एड् प्रशिक्षणार्थ्यांना संबंधित विषयासंदर्भात प्रयोगांद्वारे सखोल ज्ञान दिले गेले.

या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सखोल ज्ञान तर वाढलेच तसेच त्यांची संबंधित विषयामधील रूची व कौशल्य वाढण्यासाठी मदत झाली.

## प्लेसमेंट सेल

**प्रा.फदाले तेजस्वी यशवंत**

श्री भीमाशंकर बी.एड. कॉलेज अंतर्गत विद्यार्थ्यांनी बी.एड. कोर्स पुर्ण केल्यानंतर महाविद्यालयांमार्फत व इतर काही शैक्षणिक संस्थेकडून प्रशिक्षणार्थ्यांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे प्लेसमेंट केली जाते. विद्यार्थ्यांची इंग्रजी, मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय व पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्येही प्लेसमेंट केली जाते.

शैक्षणिक वर्ष २०१३–२०१४ मध्ये इंटरनॅशनल स्कुल कळवण, ता.कळवण, जि.नाशिक या संस्थेमार्फत ४ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट केली गेली होती. याशिवाय संस्थे अंतर्गत संस्थेच्या इतर शाखांमध्येही विद्यार्थ्यांची दरवर्षी प्लेसमेंट केली जाते. शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मध्ये न्यू इंग्लिश स्कुल, लांडेवाडी या शाळेत ७ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट केली गेली. परिसरातील विद्यालयांमध्ये ३८ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट केली गेली. शैक्षणिक वर्ष २०१७–१८ व २०१८–१९ मध्ये न्यू इंग्लिश स्कुल, लांडेवाडी या शाळेत ६ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट केली गेली व परिसरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये एकूण १५ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट केली गेली. शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये न्यू इंग्लिश स्कुल, लांडेवाडी या शाळेत ४ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट केली गेली व परिसरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये एकूण ०५ विद्यार्थ्यांची प्लेसमेंट केली गेली.

## समुपदेशन समिती

**प्रा.आढळराव विजया प्रदिप व प्रा.आढळराव योगिता शैलेश**

शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ मध्ये श्री भीमाशंकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये समुपदेशन समिती कार्यरत होती.

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | प्रा. संजय श्रीरंग चौधरी |
| समन्वयक | – | प्रा. शामल चौधरी |
| सदस्य | – | प्रा. विजया आढळराव |
| | – | प्रा. योगिता शैलेश आढळराव |

या समुपदेशन समितीच्या माध्यमातून बी.एड् प्रशिक्षणार्थ्यांशी सल्ला–मसलत, एकमेकांच्या मतांचे आदान–प्रदान केले जाते. सर्व विद्यार्थी वेगवेगळ्या सामाजिक वातावरणातून आलेले असतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांची मानसिकता, विचारक्षमता ही वेगवेगळी असते आणि म्हणूनच या समितीद्वारे महाविद्यालयामध्ये वेळोवेळी प्रशिक्षणार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. त्याचबरोबर प्रशिक्षणार्थ्यांना स्वत:ची बलस्थाने, कुवत, पात्रता, यांची जाणीव करून दिली गेली. जेणेकरून प्रशिक्षणार्थ्यांना स्वत:च्या प्रगतीआड येणाऱ्या समस्या सोडवणूकीसाठी मार्गदर्शन व्हावे व त्यांचा सर्वांगीण विकास होऊन प्रशिक्षणार्थी यशस्वी व्हावेत यासाठी ही समिती कार्यरत होती.

यामुळे बी.एड् प्रशिक्षण अगदी उत्तम प्रकारे पूर्ण करून एक यशस्वी व सक्षम शिक्षक म्हणून तयार करण्याचा प्रयत्न केला.

## अंतर्गत गुणवत्ता सुधार समिती

**प्रा.फदाले तेजस्वी यशवंत**

कोणत्याही अभ्यासक्रमामध्ये गुणवत्ता हा एक महत्वाचा भाग असतो.

अंतर्गत गुणवत्ता समिती अंतर्गत प्राध्यापक प्रबोधिनीद्वारे जून महिन्यात वेगवेगळ्या विषयांवर चर्चासत्रे घेतली जातात. यामध्ये शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक समस्यांवर विषय सादर केले जातात. तसेच प्रशिक्षणार्थ्यांसाठी चर्चासत्र, मार्गदर्शनपर व्याख्याने आयोजित केली जातात.

## भित्तिपत्रक

**प्रा.यरोळकर यमुना शिवाजी व प्रा.आढळराव योगिता शैलेश**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत बी.एड् अभ्यासक्रमात ''भित्तिपत्रक विभाग'' हा महत्वाची भूमिका पार पाडत असतो. भित्तिपत्रकाची सुरूवात प्रसिद्ध इंग्रजी कादंबरीकार 'चार्ल्स डिकेन्स' यांनी केली. बी.एड् महाविद्यालयात 'शलाका' भित्तिपत्रक विद्यार्थ्यांचे रचनात्मक व अंतरिक भावनांच्या अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम आहे. या माध्यमातून त्यांना सशक्त उर्जा मिळते. यातून विद्यार्थ्यांची वैचारिक पातळी समृद्ध होण्यास मदत मिळते.

'शलाका' भित्तिपत्रकाच्या माध्यमातून महाविद्यालयामध्ये दरवर्षी वेगवेगळ्या विषयांवर भित्तिपत्रक सादर केली जातात. यामध्ये विविध क्षेत्रात विशेष कार्य करणारे व्यक्ती, शिक्षणतज्ज्ञ, असे विषय मांडले जातात. वर्षभर विविध विषय, वैचारिक, सामाजिक तसेच विज्ञान दिन, मराठी दिन, हिंदी दिन यांविषयी नाविन्यपूर्ण लेखासंदर्भात भित्तिपत्रक लावली जातात.

यावर्षी १५ ऑक्टोंबर वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'शलाका' भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवन, त्यांचे कार्य या विषयीचे विचार भित्तीपत्रकात मांडले.

# महिला तक्रार निर्मूलन समिती

श्री भीमाशंकर बी.एड् कॉलेज लांडेवाडी, शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ मध्ये तयार करण्यात आलेल्या महिला तक्रार निवारण समितीत पुढील सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

| क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | प्रा.संजय श्रीरंग चौधरी | अध्यक्ष |
| २. | प्रा. शामल संजय चौधरी | सचिव |
| ३. | प्रा. तेजस्वी यशवंत फदाले | सदस्य |
| ४. | प्रा. यमुना शिवाजी यरोळकर | सदस्य |
| ५. | प्रा. विजया प्रदिप आढळराव | सदस्य |
| ६. | प्रा. योगिता शैलेश आढळराव | सदस्य |
| ७. | श्री. अक्षय शिवाजीराव आढळराव | सदस्य व्यवस्थापन समिती |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत श्री भीमाशंकर बी.एड् कॉलेज, लांडेवाडी महाविद्यालयात महिला विद्यार्थ्यांशी संबंधित तक्रारींचे प्रशिक्षण करण्यासाठी दि. १७/०७/२०२१ रोजी महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करण्यात आली.

संबंधित समिती मुलींच्या शारीरिक व मानसिक छळासंबंधीच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी व त्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्थापन केली शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ मध्ये तक्रारींवर चर्चा करण्यासाठी वेळोवेळी सहविचार सभा घेण्यात आल्या.

विद्यार्थिनींच्या आत्मनिर्भरतेसाठी महाविद्यालयामध्ये तज्ज्ञ व्यक्तिंचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. तसेच विद्यार्थी व्यक्तिमत्व विकासाअंतर्गत विद्यार्थिनींसाठी कराटे प्रशिक्षण देण्यात आले.

अशा प्रकारे संपूर्ण वर्षभरामध्ये विद्यार्थिनींसाठी बी.एड् महाविद्यालयामध्ये वेगवेगळे उपक्रम घेतले गेले.



# शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम

**Diploma in School Management (DSM)**

**प्रा. तेजस्वी फदाले**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक अंतर्गत श्री भीमाशंकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तराच्या प्राचार्य, मुख्याध्यापक पर्यवेक्षक, शिक्षक यांच्यासाठी शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम (Diploma in School Management) शैक्षणिक वर्ष २०११–१२ पासून राबविला जात आहे.

उद्याचे भविष्य शाळांमधून घडत आहे. त्यामुळे शाळा हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्यामुळे शाळेच्या व्यवस्थापनाचा विचार गांभीर्याने करणे गरजेचे आहे. हे मर्म ओळखून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेने शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम सुरू केला. महाराष्ट्र शासनाने सदर उपक्रमाची गरज, उपयुक्तता व महत्व ओळखून माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांच्या प्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षकांनी नियुक्ती पासून पाच वर्षाच्या काळात सदर उपक्रम पूर्ण करणे अनिवार्य केले आहे. या शिक्षणक्रमाच्या माध्यमातून शाळेच्या कार्याला व विद्यार्थी विकासाला विकासात्मक दिशा मिळण्यासाठी शालेय कार्याच्या वेगवेगळ्या बाबींचा समावेश केला आहे.

श्री भीमाशंकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अभ्यासकेंद्रात सदरशिक्षणक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. वर्षभरामध्ये तीन संपर्क सत्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला ती पुढीलप्रमाणे –

**अ) उद्‌बोधन सत्र –**

या सत्रात विद्यार्थ्यांना अध्ययन साहित्य वाटप, शिक्षणक्रम, अभ्यासक्रम माहिती व परिचय प्रात्यक्षिक व स्वाध्याय विषयक माहिती देण्यात आली.

**ब) मुख्य संपर्क सत्र –**

सदर संपर्क सत्रात प्रत्येक अभ्यासक्रमाचे विहंगमावलोकन करण्यात आले. तसेच कृती संशोधन समस्या निश्चिती आराखडा लेखन हा उपक्रम पूर्ण करण्यात आला.

**क) अंतिम संपर्क सत्र –**

या सत्रात स्वाध्याय व प्रात्यक्षिक यावर चर्चा, सूचना, शेरे याविषयी मार्गदर्शन करून मौखिक परीक्षा व अंतिम लेखी परीक्षा यावर मार्गदर्शन करण्यात आले.

मे २०२१ मध्ये विद्यापीठाची अंतिम लेखी परीक्षा संपन्न झाली. शैक्षणिक वर्ष २०२१–२२ च्या या शिक्षणक्रमात अभ्यास केंद्राचा निकाल १००% लागून सर्व विद्यार्थी गुणवत्ता श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले.



# शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी
# यांची माहिती

| अ.क्र. | शिक्षकाचे नाव | हुद्दा व शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | डॉ. संजय श्रीरंग चौधरी | – प्राचार्य(एम.ए.,एम.एड्. सेट, पी,एच.डी.) |
| २ | प्रा. शामल संजय चौधरी | – सहाय्यक प्राध्यापक (एम.ए., एम.एड्.सेट) |
| ३ | प्रा. तेजस्वी यशवंत फदाले | – सहाय्यक प्राध्यापक (एम.ए., एम.एड्.सेट) |
| ४ | प्रा. यमुना शिवाजी यरोळकर | – सहाय्यक प्राध्यापक (एम.ए.,सेट, एम.एड्.सेट) |
| ५ | प्रा. पल्लवी दिपक गुप्ते | – सहाय्यक प्राध्यापक (एम.एस्सी, एम.एड्.सेट) |
| ६ | प्रा. विजया प्रदीप आढळराव | – सहाय्यक प्राध्यापक (एम.एस्सी.,एम.एड्.) |
| ७ | प्रा. योगिता शैलेश आढळराव | – सहाय्यक प्राध्यापक (एम.ए.,एम.एड्.) |
| ८ | प्रा. तेजश्री दत्तात्रय सैद | – शारीरिक शिक्षण संचालक (बी.ए.,बी.पी.एड्.) |
| ९ | प्रा. संदिप दिगंबर भालेराव | – कला शिक्षक (एम.एफ.ए) |
| १० | प्रा. सचिन दादाभाऊ गाडे | – संगीत शिक्षक (संगीत विशारद) |
| ११ | प्रा. अनिकेत हेमंत गायकवाड | – ग्रंथपाल (बी.ए.एम.लिब.,नेट) |

| अ.क्र. | शिक्षकेतर कर्मचारी | हुद्दा व शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | श्री. निलेश रामदास घोडेकर | – लेखापाल |
| २ | श्री. सुनिल शिवाजी शेवाळे | – वरिष्ठ लिपीक |
| ३ | कु. पुजा कमलेश शिंदे | – भांडारपाल |
| ४ | कु. शिला ज्ञानेश्वर कराळे | – तंत्रज्ञ सहाय्यक |
| ५ | श्री. विपुल सुहास नांगरे | – प्रयोगशाळा सहाय्यक |
| ६ | श्री. संतोष नामदेव हुले | – प्रयोगशाळा परिचर |
| ७ | सौ. मंगल दत्तात्रय विश्वासराव | – परिचर |

# - विविध उपक्रम -




संत ज्ञानेश्वर विद्यालय चास –छात्र सेवाकाल



न्यु इंग्लिश लांडेवाडी –छात्र सेवाकाल



डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सांस्कृतिक उपक्रम साजरा करताना




श्री मुक्तादेवी विद्यालय नारोडी –छात्र सेवाकाल



ग्रंथालय दिन साजरा करताना




क्षेत्रभेट– बालकाश्रम पळस्टिका




निर्भय कन्या अभियान अंतर्गत विचार मांडताना डॉ. संजय चौधरी



शिक्षक दिन प्रसंगी संस्थापक/ अध्यक्ष, मार्गदर्शन करताना

# - विविध उपक्रम -



'ताणतणाव व्यवस्थापन' व्याख्यान देताना प्रा.शामल चौधरी



मुक्तादेवी विद्यालय नारोडी येथे सरावपाठ घेताना प्रशिक्षणार्थी



शिवाजीराव द.आढळराव पा. विद्यालय येथे
छात्रसेवाकाल अंतर्गत पाठ घेताना



आरोग्य व योग उपक्रमांतर्गत योगा सादरीकरण



क्षेत्रभेट रांजणखळगे-चास



लांडेवाडी येथे समाजसेवा अंतर्गत आरोग्य व स्वच्छता रॅली



चास येथे समाजसेवा उपक्रमाअंतर्गत ग्रामस्वच्छता करताना



सांस्कृतिक उपक्रम-महात्मा ज्योतीराव फुले जयंती

# भावपूर्ण श्रध्दांजली

२०२१-२२

गजानन महाराज संस्थान विश्वस्त व अध्यक्ष शिवशंकर भाऊ, अभिनेते दिलीप कुमार, कवी सतीश काळसेकर, कादंबरीकार- भारत काळे, प्रदीप धोंडिबा पाटील, कॉम्रेड विलास सोनवणे, आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त समाजशास्त्रज्ञ मराठी साहित्य, संस्कृती व पुरोगामी चळवळीच्या अभ्यासक डॉ. गेल ऑमवेट, डिजिटल क्रांतीचे संशोधक प्रा.कॅन कॅटरमॉल, कृषितज्ज्ञ पद्मश्री बी.व्ही. निमकर, नगर नियोजन व स्वस्त घरे विषयक अभ्यासक व तज्ज्ञ शरद महाजन, महाराष्ट्र केसरी अप्पालाल शेख, कवी आणि चित्रकार दिनेश रोडे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ अप्लाईड आर्टिस्ट आदरणीय रॉबी डिसिल्व्हा, 'हंस' दिवाळी अंकाचे साक्षेपी संपादक व लेखक आनंद अंतरकर, कथालेखक व नाटककार जयंत पवार, प्रख्यात भारतीय इतिहासतज्ज्ञ आणि लैंगिकतेच्या इतिहासाचे जाणकार अभ्यासक सलीम किडवाई, शिल्पकार सदाशिव साठे, माजी क्रिकेटपटू वासू परांजपे, प्रसिद्ध बंगाली लेखक बुद्धदेव गुहा, ऊस तज्ज्ञ डॉ.ज्ञानदेव हापसे, अभिनेता सिद्धार्थ शुक्ला, ज्येष्ठ संस्कृततज्ज्ञ डॉ.त्रि.ना.धर्माधिकारी, चित्रकार देविदास पेशवे, हिंदी कवी मंगलेश डबराल, वृत्त निवेदक यशवन्त वैद्य, छायाचित्रकार व लेखिका सरोज परुळकर, 'समाज' या उडिया दैनिकाच्या प्रमुख संपादक मनोरमा महापात्र, लेखिका आणि समाज कार्यकर्त्या कमला भसीन, सुलेखन आणि छायाचित्रकार कुमार गोखले, नाट्यअभिनेत्री विद्या भागवत, योगाचार्य पद्मश्री सदानंद निंबाळकर तमाशाचे जाणकार व फडमालक हरिभाऊ बडे, ज्येष्ठ विनोदी लेखक द. मा. मिरासदार, इतिहासतज्ज्ञ व विनोदी लेखक ज्ञानेश्वर दमाहे, चित्रकार नयन बारहाते, अभिनेते अरविंद त्रिवेदी, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. एस.एन. सुब्बाराव, अभिनेते युसूफ हुसेन, शाहीर लीलाधर हेगडे, रहस्यकथाकार गुरुनाथ नाईक, चित्रकार प्रकाश विश्वासराव, तमाशा व्यवस्थापक आणि वग नाट्यलेखक मोमीन कवठेकर, ज्येष्ठ हिंदी पत्रकार विनोद दुवा, नोबेल विजेते वर्णभेदी विरोधी चळवळीचे नेते डेसमंड टुटू, स्त्रीवादी कार्यकर्ती बेल हुक्स, चित्रकार बाळ ठाकूर, ज्येष्ठ गायक-अभिनेते रामदास कामत, प्रकाशक सुनील मेहता, तमाशा कलावंत/शाहीर राजा पाटील कवठेमहांकाळकर, टीव्ही पत्रकार कमाल खान, प्रकाशक- सुनील मेहता, अरुण जाखडे, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते, रयत शिक्षण संस्थेचे आधारवड डॉ. एन. डी. पाटील, नृत्यसम्राट पंडित बिरजू महाराज, ज्येष्ठ पत्रकार दिनकर रायकर, ज्येष्ठ गायिका कीर्ती शिलेदार, ज्येष्ठ समाजसेवी लेखक अनिल अवचट, अभिनेते रमेश देव, भारतरत्न गानसम्राज्ञी लता मंगेशकर, अभिनेते प्रवीण कुमार, बजाज समुहाचे उद्योगपती राहुल बजाज, मुक्तपत्रकार आणि ग्रंथालय चळवळ कार्यकर्ते नरेंद्र लांजेवार, गायिका संध्या मुखर्जी, माजी शिक्षणमंत्री सुधीर जोशी, क्रिकेटपटू शेन वॉर्न, अभिनेत्री वत्सला देशमुख, मार्क्सवादी विचारवंत ऐजाझ अहमद, 'मागोवा' चळवळीचे कार्यकर्ते सुधीर, कामगार नेते सायन्ना येनगंदुल, मुस्लिम सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते सय्यदभाई, अभिनेता शिव सुब्रमण्यम, अभिनेत्री व निर्मात्या मंजू सिंग, मराठी जैन साहित्य प्रसारक आणि प्रकाशक श्रेणीक अन्नदाते, माजी केंद्रीय गृहसचिव माधव गोडबोले, लोकगीतकार हरेंद्र जाधव, अभिनेत्री प्रेमा किरण, ज्येष्ठ कवयित्री रजनी परुळेकर, संतूरवादक पंडित शिवकुमार शर्मा, ज्येष्ठ नेते हुसेन दलवाई, कादंबरीकार दिनकर दाभाडे, चित्रकार आणि सुलेखनकार नंदू गवांदे, पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला, गायक केके उर्फ कृष्णकुमार कुन्नथ, तसेच विविध दहशतवादी हल्ल्यात ठार झालेले लष्करी जवान, पोलीस तसेच विविध दुर्घटना अपघात व कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत मृत्यूमुखी पडलेले अनेक अभागी जीव या सर्वांना महाविद्यालयाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली...

**संस्था गीत**

शिक्षणाचे सार आहे घडविणे माणसाला
बदलूनी अंतराला उभारणे माणसाला ।। धृ ।।

ध्येय प्रगतीचे द्वार उघडिले ग्रामभागी
जोडलेले राहू आता उन्नतीच्या उच्च जागी
लाभो सर्व ज्ञान, मान मातीतल्या माणसाला ।। १ ।।

झेप घेऊनी उडावे सर्व जगत पाहण्या
पंख इथल्या मातीचे चराचरास व्यापण्या
सर्व काही लाभ होवो कष्टणाऱ्या माणसाला ।। २ ।।

आशीर्वाद भैरवाचे आहे माझ्या पंचक्रोशी
आज नोंद होत आहे त्याची मोठ्या ज्ञानकोशी
शिवसंकुलात माझ्या मिळो सिध्दी माणसाला ।। ३ ।।



## श्री भीमाशंकर बी.एड्. कॉलेज, लांडेवाडी

लांडेवाडी (चिंचोडी), ता.आंबेगाव, जि.पुणे ४१० ५०३




शिवाजीराव आढळराव पाटील प्रेक्षागृह